CMYK


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, ११ जानेवारी २०२५ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ६६ । पाने १२ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विनम्र अभिवादन



माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा आज स्मृतिदिन

# धोका पत्करण्याची माझी अफाट क्षमता

### देशसेवेसाठी आणखी बरेच काही करण्याची तयारी ● पंतप्रधान मोदींची पहिल्या पॉडकास्टमधील भावना

◆ **नवी दिल्ली, १० जानेवारी**

लोक जीवनात धोका पत्करण्यास घाबरतात. माझ्यात धोका पत्करण्याची अफाट क्षमता आहे, असे मला वाटते आणि अजूनही त्याचा पूर्ण वापर झालेलाच नाही. फारच कमी वापर झाला. यापेक्षाही कितीतरी पटीने जास्त क्षमतेने धोका पत्करून मी काम करू शकतो, अशी भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली.

पंतप्रधान मोदी यांनी प्रथमच पॉडकास्टला दिलेल्या मुलाखतीत अनेकविध विषयांवर बेधडक आणि बिनधास्त उत्तरे दिली. शेअर ट्रेडिंग ॲप झिरोधाचे संस्थापक निखिल कामथ यांनी पंतप्रधानांची मुलाखत घेतली. आपल्या आयुष्यातील पट उलगडताना पंतप्रधान म्हणाले, मी जीवनात बरेच धक्के सहन केले. मी प्राथमिक शाळेत शिकत असताना आमच्या राज्यात एक सैनिक शाळा सुरू झाली. मला वर्तमानपत्र वाचण्याची सवय होती. अगदी जाहिरातीसुद्धा मी वाचून काढायचो.



गावातील वाचनालयात वाचण्यासाठी जात असे. सैनिक शाळेची जाहिरात पाहून मी एक ते दीड रुपयात त्याविषयीची माहिती पुस्तिका मागवली आणि ती घेऊन लांब अंतरावर राहणाऱ्या मुख्याध्यापकांच्या घरी पोहोचलो. त्यांना हे सर्व दाखवले आणि सैनिक शाळेत जाण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी माझ्या वडिलांकडे हा विषय काढला असता वडील म्हणाले की, माझ्याकडे पैसे नाहीत आणि कुठेही जाण्याची गरज नाही. आयुष्यात ती खंत राहून गेली. देशासाठी काम करण्याची इच्छा तेव्हापासून माझ्या मनात होती.

◀(वृत्तसंस्था)

### मी कधीच कम्फर्ट झोनमध्ये राहिलो नाही

आयुष्यातील अशा चांगल्या-वाईट अनुभवांनीच आयुष्य बहरत जाते. मी कधीही कम्फर्ट झोनमध्ये राहिलो नाही. कम्फर्ट झोनबाहेर आलो, तेव्हाच मला नेमके जगायचे कसे, हे समजले, असेही पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले. ■

### चुकांमधून शिकवण मिळते

आयुष्यातील अपयशांनी तुमचे व्यक्तिमत्त्व घडवले आहे का, याविषयी बोलताना मोदींनी आपले अनुभव कथन केले. ते म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघासाठी काम करताना संघाने एक जीप घेतली होती. मी नव्यानेच वाहन चालवणे शिकलो होतो. आदिवासी क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांना घेऊन प्रवास करीत होतो. उकाई धरणाहून परत येत असताना उतार असणारा रस्ता दिसला. पेट्रोल वाचविण्यासाठी मी गाडी बंद केली. मला माहिती नव्हते की, यामुळे काय गडबड होईल... गाडी अनियंत्रित झाली, ब्रेक दाबले तर आणखी संकट वाढले; कारण गाडीचा वेग वाढला. जीव कसाबसा वाचला; पण चुकीतून शिकता आले. ■

# इस्रोने 'डॉकिंग' चाचणी पुन्हा पुढे ढकलली

◆ **बंगळुरू, १० जानेवारी**

अवकाशातील दोन उपग्रहांना जोडण्यासाठी होणाऱ्या इस्रोच्या स्पेस डॉकिंग प्रयोगाला आता आणखी विलंब लागणार आहे. शुक्रवारी होणारी स्पॅडेक्स 'डॉकिंग' चाचणी तांत्रिक बिघाडामुळे पुढे ढकलण्यात आली. इस्रोने ही चाचणी पुढे ढकलण्याची दुसरी वेळ आहे. इस्रोने अधिकृत सोशल मीडिया एक्सवरून ही माहिती दिली.


स्पेसएक्स मिशनच्या चेसर आणि लक्ष्य उपग्रहांमधील अंतर ५०० मीटरवरून २२५ मीटरपर्यंत कमी करण्यासाठी तांत्रिक समस्या उद्भवली. ज्या वेगाने उपग्रह एकमेकांच्या जवळ येत आहेत, तो वेग निर्धारित वेगापेक्षा जास्त झाला. त्यामुळेच डॉकिंग थांबवण्यात आल्याचे इस्रोने सांगितले. स्पेसएक्स उपग्रहांमधील अंतर सुमारे पाच किलोमीटर आहे. डॉकिंग चाचणीची पुढील तारीख इस्रोने जाहीर केली नाही. यापूर्वी इस्रोने ७ जानेवारी रोजी डॉकिंग चाचणी घेण्याची योजना आखली होती. तांत्रिक कारणांमुळे ती पुढे ढकलण्यात आली होती. ◀(वृत्तसंस्था)



## महत्त्वाचे

### जोरदार विक्रीसह बाजारात घसरण

**मुंबई** : बँक शेअर्स, मिडकॅप इंडेक्स आणि स्मॉलकॅपमध्ये जोरदार विक्रीसह शेअर बाजारात मोठी घसरण झाली. सलग तिसऱ्या दिवशी बाजार घसरला आणि लाल रंगात बंद झाला. निफ्टीत ९५ अंकांची तर निर्देशांकात २४१ अंकांची घसरण झाली. दिवसभरातील घसरणीत इंडसइंड बँकेचे शेअर्स सर्वाधिक दबावाखाली होते. सोबतच एनटीपीसी, अल्ट्राटेक सिमेंट, एसबीआय आणि सन फार्मा यांचे शेअर्सही खाली आले. या मंदीमुळे बाजाराचे एकूण भांडवल ४२९.७९ लाख कोटी रुपयांपर्यंत खाली आले. म्हणजेच बाजार भांडवल ५.७ लाख कोटी रुपयांनी कमी झाले. ■



### इंडोनेशियाच्या राष्ट्रपतींना प्रजासत्ताक दिनासाठी निमंत्रण

**नवी दिल्ली** : येत्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जगातील सर्वांत मोठ्या मुस्लिम देशाचे राष्ट्रपती भारतात प्रमुख पाहुणे म्हणून येणार आहेत. परंतु, त्यांच्या येण्यापूर्वीच पाकिस्तानने ते आपल्याकडेही येणार आहेत, असा दावा केल्याने हा दौरा वादात सापडण्याची चिन्हे आहेत. इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबावो सुबियांतो हे प्रजासत्ताक दिनी भारतात येणार आहेत. ही त्यांची पहिलीच वेळ नाही, यापूर्वीही इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रजासत्ताक दिनाला प्रमुख पाहुणे म्हणून आले आहेत. मात्र, यावेळचा पेच जरा वेगळा आहे. भारत-पाकिस्तानचे ताणलेले संबंध सर्व जगाला माहिती आहेत. पाकिस्तानी मीडियाने सुबियांतो २६ जानेवारीला पाकिस्तानातही जाणार असल्याचा दावा केला आहे. भारत येत असताना सुबियांतो यांनी पाकिस्तानचाही दौरा करावा, अशी भारताची इच्छा नाही. यामुळे सुबियांतो यांच्या भारत दौऱ्याची घोषणा करण्यात आली नाही. ■

### कॅलिफोर्नियातील आग ४० हजार एकर परिसरात पसरली

कॅलिफोर्निया : अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यात लॉस एंजेलिसच्या आसपास लागलेल्या आगीमुळे सुमारे १० हजार घरे जळून खाक झाली आहेत. ४ दिवसांपासून धुमसत असलेली ही आग सुमारे ४० हजार एकर परिसरात पसरली आहे. यात २९ हजार एकर जमीन जळून खाक झाली आहे. याशिवाय सुमारे ३० हजार घरांचे नुकसान झाले आहे. शुक्रवारी आगीतील मृतांची संख्या सातवर गेली. लॉस एंजेलिस आणि आजूबाजूच्या परिसरात लागलेली ही सर्वांत मोठी आग आहे. येथील शेरीफ रॉबर्ट लुना यांनी आगीमुळे झालेल्या विनाशाची तुलना अणुबॉम्बशी केली.

### तांत्रिक बिघाडामुळे सिंगापूरला जाणारे विमान परतले

चेन्नई : चेन्नई येथून शुक्रवारी सिंगापूरला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानात वैमानिकांना हवेत तांत्रिक बिघाड आढळून आला. त्यानंतर ते शहरात परतले, असे विमानतळ अधिकाऱ्यांनी सांगितले. वैमानिकांनी समस्या शोधल्यानंतर विमानतळावर संपर्क साधला. सुमारे १७० प्रवासी सुरक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. ही समस्या तपासण्यासाठी अभियंते तेथे उपस्थित होते.

# महिला आरक्षण कायद्याविरोधातील सर्व याचिका फेटाळल्या

### सुप्रीम कोर्टाचा सुनावणीस नकार

◆ **नवी दिल्ली, १० जानेवारी**

महिलांना ३३ टक्के आरक्षण देणाऱ्या नारी शक्ती वंदन कायद्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर सुनावणी करण्यास शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने नकार देत याचिका फेटाळून लावल्या.

यावेळी महिला आरक्षण कायद्यालाच नाही, तर विधेयकाला आव्हान देणारी याचिका निर्थक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. जया ठाकूर आणि नॅशनल फेडरेशन ऑफ इंडियन वुमेन यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्या. बेला एम. त्रिवेदी आणि न्या. पी. बी. वराळे यांच्या न्यायासनाने म्हटले की, जया ठाकूर यांच्या याचिकेत नारी शक्ती वंदन विधेयकातील तरतुदींना आव्हान देण्यात आले, पण विधेयकाला संसदेची मान्यता मिळाली आहे, त्यामुळे ही याचिका अर्थहिन आहे. तर, नॅशनल फेडरेशनच्या याचिकेत कायद्यातील परिसीमनाच्या मुद्यावर आक्षेप घेण्यात आला, त्यामुळे ही याचिका सुनावणी योग्य नाही. महिला आरक्षणाचा एक भाग रद्द करणे अशक्य आहे.

◀(वृत्तसंस्था)

### जनगणनेनंतर लागू होणार कायदा

नारी शक्ती वंदन कायद्यांतर्गत लोकसभा, राज्याच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी एकूण जागांपैकी एक तृतीयांश जागा आरक्षित असतील. त्याचप्रमाणे अनुसूचित जाती आणि जमातींसाठी आरक्षित जागा ठेवण्यासंदर्भात हा नियम लागू होतो. पॉण्डेचरीसारख्या केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी जागा राखून ठेवल्या जाणार नाहीत. जनगणनेनंतर लोकसंख्येची आकडेवारी जाहीर होईल आणि त्यानंतरच हा कायदा लागू होणार आहे. ■



वैकुंठ एकादशीच्या पर्वावर शुक्रवारी असंख्य भाविकांनी थिरुवनंतपुरम् येथील श्री पद्मनाभस्वामी मंदिराला भेट दिली. यावेळी पद्मतीर्थम् सरोवरात या मंदिराचे प्रतिबिंब असे दिसत होते

# महाकुंभाला समर्पित 'कुंभवाणी'चे लोकार्पण



कुंभवाणीचे लोकार्पण करताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ

◆ **महाकुंभ नगर, १० जानेवारी**

सध्या उत्तरप्रदेशसह संपूर्ण देशात कुंभमेळ्याची धूम आहे. त्यातच प्रसार भारतीने कुंभमेळ्याला समर्पित असणाऱ्या 'कुंभवाणी' या एफएम चॅनेलचे शुक्रवारी लोकार्पण केले.

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते या कुंभवाणीचे लोकार्पण करण्यात आले. सध्या मुख्यमंत्री प्रयागराज दौऱ्यावर आहेत. या दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी सर्किट हाऊस येथे त्यांनी कुंभवाणीचे लोकार्पण केले. ओटीटीवर आधारित कुंभवाणी एफएम चॅनेलवर कुंभमेळ्याशी संबंधित सर्व माहिती मिळू शकणार आहे. १० जानेवारीपासून सुरू झालेली ही वाहिनी २६ फेब्रुवारीपर्यंत कार्यरत राहणार आहे. दररोज पहाटे ५.५५ ते रात्री १० वाजून पाच मिनिटांपर्यंत याचे प्रसार सुरू राहणार आहे.

यावेळी आदित्यनाथ म्हणाले की, कुंभवाणी लोकप्रियतेचे नवे विक्रम प्रस्थापित करेल, याचा आम्हाला विश्वास आहेच, सोबतच अशा अनेक लोकांसाठी हे चॅनेल महाकुंभातील घडामोडी पोहोचविण्यास मदतनीस ठरेल, जे इच्छा असूनही यात सहभागी होऊ शकले नाहीत. असंख्य लहान-मोठ्या गावातील लोकांना इच्छा असूनही महाकुंभाला येणे जमत नाही. त्यांच्यासाठी कुंभवाणी म्हणजे येथे असल्याचा अनुभव देणारी वाहिनी ठरेल. यातून महाकुंभाची लोकप्रियताही वाढेल. विशेष म्हणजे, याद्वारे नव्या पिढीपर्यंत आपला सनातन धर्म पोहोचण्यास मोठा हातभार लागेल. ◀(वृत्तसंस्था)

### मेरठ हत्याकांड : पलंगात सापडले मुलांचे मृतदेह

**मेरठ** : आठ वर्षांच्या तीन मुलांसह एका कुटुंबातील पाच सदस्यांचे मृतदेह पोत्यात भरून पलंगात ठेवले. यात चार आणि एक वर्षाच्या मुलांचाही समावेश होता. त्या सर्वांचा मृत्यू घरातच झाल्याचे पोलिसांनी शुक्रवारी सांगितले. या हत्येप्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. आई-वडिलांचे मृतदेह चादरीत गुंडाळून ठेवले होते. या पाचही जणांच्या डोक्याला खोल जखमा आणि मानेवर माराच्या खुणा होत्या. मृत महिलेच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे, तीन जणांविरुद्ध आणि काही अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बार्शीत दोन किलो बनावट सोने देऊन १० लाखाला गंडवले

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० जानेवारी-**

शहरातील तेजस इंडस्ट्रीज इलेक्ट्रीक व हार्डवेअर स्टोअरच्या मालकासोबत बनावट दोन किलो सोन्याच्या मण्याच्या माळा विकून १० लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे. याबाबत शहर पोलिसांत स्वप्निल हिरालाल जैन यांनी त्या दोन्ही अनोळखी महिला व पुरुषाविरुद्ध फिर्याद दिली आहे.

फिर्यादीचे हिरेमठ हॉस्पिटलनजीक तेजस इंडस्ट्रीज इलेक्ट्रीक व हार्डवेअर स्टोअरचे दुकान आहे. दि ७ जानेवारी २०२५ रोजी दुपारी एक अनोळखी पुरुष आणि महिला दुकानात बकेट घेण्यासल आले होते. त्यांनी त्यांना पत्नीला दवाखान्यात दाखवायचे आहे. उपचारासाठी पैशाची गरज असल्याचे सांगत माझेकडे जुने सापडलेले सोने आहे. ते मला विकायचे आहे. कुणी घेणार असेल तर मला कळवा, असे म्हणून त्याने त्याचा मोबाईल नंबर देत वडिलांजवळ १ सोन्याचा मणी दिला व तो निघून गेला. त्यानंतर फिर्यादीने तो सोन्याचा मणी सोनारकडे चेक केला असता दिलेला मणी सोन्याचाच होता.



९ रोजी दुपारी १२.१५ वा. च्या सुमारास फिर्यादी दुकानामध्ये काम करीत असताना दुकानामध्ये सोन्याचा मणी दिलेले अनोळखी पुरुष व महिला दुकानात आले. तेव्हा त्याने फिर्यादीकडे आणखीन २ सोन्याचे मणी दिले. त्यानंतर फिर्यादी व वडिलांनी ते मणी सोनारकडे चेक केले असता, तेही मणी सोन्याचेच होते. तेव्हा ते सोनेच असल्याची खात्री झाल्याने त्या एक अनोळखी पुरुष व एक अनोळखी महिलाकडून यांना जवळील दहा लाख रुपये रोख रक्कम देऊन त्यांच्याकडील २ किलो वजनाचे सोन्याच्या मण्याचे माळा ताब्यात घेतले. त्यानंतर ते दोघेही अनोळखी तेथून निघून गेले. त्यानंतर दिलेले २ किलो सोने चेक केले असता सोने बनावट असल्याबाबत खात्री झाली. त्यानंतर त्या दोघांचा शहरात परिसरात शोध घेतला. तसेच त्यांचा मोबाईल नंबरवर फोन केला असता तो बंद लागत होता. त्यावेळी खात्री झाली की, सदर अनोळखी पुरुष व अनोळखी महिलांनी आम्हाला खोटे सोने देऊन आमच्याकडील १० लाख रुपये रोख रक्कम घेऊन फसवणूक केल्याची गुन्हा त्या दोन्ही अनोळखी व्यक्ती विरोधात दाखल झाला असून अधिक तपास पोलीस करत आहेत.

# डोनाल्ड ट्रम्प निर्दोष मुक्त

### ● मॅनहॅटन न्यायालयाचा नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्षांना दिलासा

**न्यू यॉर्क, १० जानेवारी,**

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची हस्तक्षेप याचिका फेटाळून लावत, शिक्षेची तारीख पुढे ढकलण्याची विनंती अमान्य केली. यानंतर काही वेळातच मॅनहॅटन न्यायालयाने ट्रम्प यांना निर्दोष मुक्त केले.

पॉर्न स्टार स्टॉर्मी डॅनियल्सला शांत ठेवण्यासाठी पैसे देण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपात ट्रम्प यांच्या प्रकरणी सुनावणीचा न्यूयॉर्कच्या मॅनहॅटन न्यायालयाचा मार्ग मोकळा झाला. २० जानेवारी रोजी ट्रम्प यांचा शपथविधी होणार आहे. त्यांना शिक्षा सुनावली जाण्याची शक्यता असताना न्यायालयाने मात्र त्यांना निर्दोष मुक्त करण्याचा निकाल दिला. या निर्णयामुळे ट्रम्प यांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्या शपथविधी सोहळ्याच्या मार्गातील मोठा अडथळाही दूर झाला आहे.



मॅनहॅटन न्यायालयाने यापूर्वी आपण शुक्रवारी ट्रम्प यांच्या शिक्षेवर निर्णय देणार असल्याचे सांगितले होते. निर्णयाची तारीख पुढे ढकलावी, यासाठी ट्रम्प यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. गुरुवारी झालेल्यासुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प यांची याचिका फेटाळली. सुनावणीत ट्रम्प यांची बाजू मांडणारे वकील डी. जॉन सॉयर यांनी सांगितले की, मॅनहॅटन न्यायालयाने यापूर्वीच स्पष्ट केले की, या प्रकरणात ट्रम्प यांना तुरुंगवास किंवा दंडही होणार नाही. तरीही शपथविधीपूर्वी त्यांच्या शिक्षेवर निर्णय देणारा प्रकार राजकीय हेतूने प्रेरित आहे.

### काय आहे प्रकरण

पॉर्न स्टार स्टॉर्मी डॅनियल्सला नाते उघड न करण्यासाठी १.३ लाख डॉलर्स देण्यासाठी व्यवसायिक ताळेबंदात फेरफार केल्याच्या आरोपात ट्रम्प यांना मॅनहॅटन न्यायालयाने दोषी ठरवले आहे. शिक्षेचा निर्णय पुढे ढकलण्यात यावा, यासाठी ट्रम्प यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, मात्र त्यांची मागणी अमान्य करण्यात आली होती.

### राजद आमदार व इतरांवर ईडीचे छापे

**पाटणा** : राज्य सहकारी बँकेतील कथित निधी गैरव्यवहाराशी संबंधित अवैध सावकारी प्रकरणाच्या चौकशीचा भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडीने शुक्रवारी बिहारसह अनेक राज्यांमध्ये राष्ट्रीय जनता दलाच्या आमदाराच्या निवास व प्रतिष्ठानांवर छापे टाकले.

बिहार, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, दिल्ली येथील सुमारे १८ ठिकाणी झडती घेण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

यामध्ये राजदचे आमदार व बिहारचे माजी मंत्री आलोक कुमार मेहता यांच्याशी संबंधित जागेचा समावेश आहे. मेहता हे बिहारस्थित वैशाली शहरी विकास (व्हीएसव्ही) सहकारी बँकेचे संचालक आहे व काही इतर संबंधित संस्था आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### यमाईदेवी आश्रमशाळेत नंदीध्वज, नागफणीची सवाद्य मिरवणूक

**सोलापूर दि. १० जानेवारी-**

यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी तालुका (उ.सोलापूर) येथे श्री सिध्देश्वर यात्रा निमित नंदीध्वज व नागफणीची मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी सिध्देश्वर सहकारी बँकेचे संचालक शिवानंद कोनापुरे, महेश सिंदगी यांच्या हस्ते श्री सिध्देश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे व नंदी ध्वजाचे पूजन करण्यात आले. यावेळी संस्थापक अशोक लांबतुरे, सचिव मधुकर गवळी, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती रुक्मिणी लांबतुरे - गवळी, ज्येष्ठ शिक्षक नानासाहेब लोखंडे, महादेव करे, तानाजी तानगावडे, संगीता व्हनकोळे- जाधव विद्या हराळे - लांबतुरे, अशोक देशमुख, विनोद कोळेकर, अमोल गुरव, बसवराज तुळजापूरे, संदीप चव्हाण व विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी पारंपारिक बाराबंदी पोशाख परिधान केला होता. तसेच बाणेगावचे स्वामी यांच्या हस्ते विधिवत पूजा व आरती करुन पालखी सोहळा मिरवणुकीस सुरवात करण्यात आली. लेझीम ढोल ताशांच्या गजरात सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. ग्रामीण भागात आशा प्रकारचा कार्यक्रम घेणारी ही एकमेव आश्रम शाळा आहे, असे उद्गार प्रमुख पाहुण्यांनी व्यक्त केले.



### सातत्य, संघर्ष, सराव या त्रिसुत्रीद्वारे यशप्राप्ती : प्रा. कुर्री

**सोलापूर दि. १० जानेवारी-**

विविध उपक्रम, कार्यक्रम, स्पर्धामुळे विद्यार्थ्यांमधील कर्तृत्व व नेतृत्वगुण उदयास येते. सातत्य, संघर्ष, सराव या त्रिसुत्रीद्वारे यश हमखास मिळते, असे प्रतिपादन प्रा. रोहन कुर्री यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित मातोश्री जनाबाई जनार्दन बिटला प्रशालेच्या वतीने आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. श्रीनिवास कयातम अध्यक्षस्थानावरुन बोलताना म्हणाले, बिटला प्रशाला जरी छोटी असली तरी शिक्षणाच्या दर्जाबाबत खूपच मोठी आहे. शिक्षण संस्थेचे सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, देणगीदार सुरेश बिटला यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. श्रध्दा पुला या विद्यार्थिनीने सावित्रीबाई पुले यांच्या ओवींचे वाचन केले. मुख्याध्यापिका शारदा गोरट्याल यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. निर्मला शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. पद्मावती वल्लाल यांनी पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन केले. अभिज भानप यांनी सूत्रसंचालन केले. लक्ष्मी कोंडा यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चिलवेरी, कामत, पुंजाल या शिक्षिकांसह जालिंदर शिंगण, राहुल ताटे, अतुल गंभीरे, वनदेव खडके, अविनाश आडम, कांचना दासरी आदींनी परिश्रम घेतले.



### वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजच्या १९७७ बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग १९७७ बॅच सिव्हिल अभियंते माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा राजेंद्र मायनाळ यांच्या पुढाकाराने तीन दिवसांचा स्नेहमेळावा पार पडला. बसवराज कंटेकुरे, दिलीप दूधनकर, एस. एम. पाटील, बाजी देशपांडे, उदय पत्की यांनी नियोजन केले. सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, मुंबई येथून माजी विद्यार्थी उपस्थित होते. पहिल्या दिवशी परिचय, दुसऱ्या दिवशी श्री स्वामी समर्थ अक्कलकोट येथे दर्शन घेण्यात आले. अन्नक्षत्र मंडळात कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांनी त्यांचा सत्कार केला. रिसॉर्ट येथे हुरडा पार्टी, अस्सल गावरान जेवणाचा आस्वाद घेता. संध्याकाळी सर्व अभियंत्यांनी मिमिक्री, मराठी गाणी, हिंदी गाणी, कविता सादर केल्या. अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. सर्वांना आठवण म्हणून ग्रुप फोटोची प्रत व राजेंद्र मायनाळ लिखित महातपस्वी कुमारस्वामीजी व जीवन कार्य हा ग्रंथ भेट म्हणून देण्यात आला. ग्रंथ भेटीचे योगदान बसवराज कंटेकुरे यांच्याकडून देण्यात आले. पुढील स्नेहमेळावा वालचंद इंजिनिअरिंग कॉलेज, सांगली येथील प्रांगणात घेण्याचे निश्चित करण्यात आले.

# पारदर्शी, गतिमान शासन प्रतिमा निर्मितीसाठी महसूल यंत्रणेने कार्य करावे

**महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची अपेक्षा**

**सोलापूरसह पुणे महसूल विभागाच्या कार्याचा महसूल मंत्र्यांनी घेतला आढावा**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जानेवारी-**

महसूल खाते शासनाचा चेहरा म्हणून ओळखले जाते. लोकाभिमुख प्रशासनासाठी महसूल यंत्रणेतील जिल्हाधिकारी यांच्यासह उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांनी आठवड्यातील किमान दोन दिवस आपल्या कार्यक्षेत्रात ग्रामीण भागापर्यंत दौरे करावे आणि नागरिकांच्या प्रलंबित प्रकरणांचा आढावा घ्यावा आणि ती प्राधान्याने निर्गत करावी.

महसूल यंत्रणेने आपली कार्यपद्धती गतिमान करून तत्परतेने जबाबदारी पार पाडावी ज्यायोगे नागरिकांमध्ये शासनाची पारदर्शी आणि गतिमान शासन अशी प्रतिमा निर्माण होईल, असे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

पुणे विभागातील महसूल अधिकाऱ्यांच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी विधान भवन येथे आयोजित बैठकीत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, अपर आयुक्त कविता द्विवेदी, अपर आयुक्त समीक्षा चंद्रकार, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील, सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ.राजा दयानिधी, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, अतिरिक्त मुख्य सचिवांचे विशेष कार्य अधिकारी राजेंद्र मुठे, मंत्रालयातील विशेष कार्य अधिकारी प्रविण महाजन, अरविंद अंतुलीकर, मुद्रांक विभागाचे उपसचिव सत्यनारायण बजाज तसेच विभागातील अतिरिक्त जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यावेळी उपस्थित होते.

बावनकुळे म्हणाले, शासकीय कार्यालयाच्या कार्यपद्धतीची व नियमांची नागरिकांना माहिती नसते त्यामुळे त्यांची विविध प्रकरणे शासकीय कार्यालयात प्रलंबित राहतात. शासनाच्या १०० दिवसांच्या महत्वाकांक्षी कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून महसूल यंत्रणेने कालबद्ध मोहिमेद्वारे अशी प्रलंबित प्रकरणे निकाली काढावी. त्यामुळे जनतेमध्ये सकारात्मक संदेश जाईल आणि थकीत महसुलाची वसुली होईल. नवीन वाळू धोरणावर शासन स्तरावर काम सुरू असून देशातील सर्वोत्तम असे सर्वंकष वाळू धोरण अंमलात आणण्यात येणार आहे., असे सांगितले.

**वार्षिक मूल्यमापन अहवाल उत्कृष्ट दर्जाचा ठेवावा**

अधिकाऱ्यांनी महसूल वसुलीचे उद्दिष्ट साध्य करतानाच महसुलात वाढ होण्यासाठी नावीन्यपूर्ण कल्पना सादर कराव्या. शासनाकडून त्यावर सकारात्मकपणे निर्णय घेण्यात येईल. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सचोटीने काम करून वार्षिक मूल्यमापन अहवाल उत्कृष्ट दर्जाचा ठेवण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले. नवीन पदनिर्मिती, पदोन्नती आणि कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक अडचणी सोडवण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येतील. भूसंपादन केलेल्या जमिनींचे कमी जास्त पत्रक तयार करणे व अधिकाराची अभिलेखात नोंद घेणे यास प्राधान्य देण्यात यावे असे निर्देश बावनकुळे यांनी दिले.



## शिवसेना महिला आघाडीतर्फे ममता दिन उत्साहात साजरा

**सोलापूर, दि. १० जानेवाारी-**

स्वर्गीय मासाहेब मीनाताई ठाकरे यांची ९४ वी जयंती तमाम शिवसैनिक ममता दिन म्हणून साजरा करतात. सोलापूर शिवसेना महिला आघाडीच्यावतीने ममता दिन करण्यात आला.

स्व. मासाहेब मीनाताई ठाकरे यांचा आदर्श घेऊन प्रेरणा घेऊन म हिला आघाडीने एकजुटीने कार्यरत रहावे, असे आवाहन शिवसेनेच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड यांनी केले. सर्वप्रथम अस्मिता गायकवाड व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यावेळी शहर प्रमुख प्रीती नायर, उपशहर प्रमुख मीना सुरवासे, दिपाली पवार, श्रीदेवी बगले, विधानसभा क्षेत्र प्रमुख सुनंदा माने, ललिता सावंत, सुजाता गाळे, शांताबाई डोकळे, राजश्री उमराणे, वनिता सोनकांबळे, विद्या काळे, कोमल कांबळे, आम्रपाली मस्के, प्रीती सुरवसे, वैशाली बनसोडे, लक्ष्मी माशाळकर, सुरेखा क्षीरसागर आदी उपस्थित होते.

## वारद नगर येथे एकाची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

शहरातील पुणे रोडवरील म डकी वस्तीजवळील वारद नगरात एकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.

शरीफ हैदरसाब मुजावर (वय ४९) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. १० जानेवारी रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास शरीफ मुजावर यांनी राहत्या घरातील पत्र्याच्या लाकडी वाशाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यावर त्यांना फौजदार चावडी पोलिस ठाण्यातील पालिस हवालदार बी जे कसबे यांनी खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. आकाश माने यांनी मुजावर यांस मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## वालचंद महाविद्यालयात स्थानिक लेखक परिसंवाद उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्समध्ये महाराष्ट्र शासनातर्फे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा-२०२५' या उपक्रमांतर्गत येथील स्थानिक ग्रामीण कथा लेखक व सुप्रसिध्द कथाकथनकार डॉ.अर्जुन व्हटकर यांच्या लेखक वाचक परिसंवादा आयोजन केले होते.

याप्रसंगी बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना वाचन व लेखनाचे महत्व विशद करुन त्यांच्या स्वररचित साहित्य निर्मिती बद्दलचे अनुभव उपस्थित विद्यार्थ्यांसमोर कथन केले. तसेच तुंबण व कावळयाची सुगी या आपल्या कथा संग्रहातील कथा प्रत्यक्ष सादर केला. तसेच लुप्त ग्रामीण बोली भाषेचे वैभव, त्याचे महत्व उदाहरणासहित केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.संतोष कोटी होते. अतिथी वक्त्यांचा परिचय सहाय्यक ग्रंथपाल राजकुमार कस्तुरकर यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख डॉ.अमोल शिंदे यांनी केले.

तर सूत्रसंचालन डॉ.पद्मावती पाटील यांनी केले. डॉ.रामचंद्र गोरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला श्री हनुमंत मते, डॉ.सचिन नवले, डॉ.वैशाली गरगडे, सौ.मिनल चक्रे, वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमास अजय देवधरे, श्री बाहुबली कुगे, अबरार सय्यद, अनिल आवाशंक, पुंडलिक लिंबोळे यांनी परिश्रम घेतले.



## यात्रा महोत्सवानित्ति मद्य विक्री बंद ठेवण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१० जानेवारी-**

श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सव सन २०२५ निमित्त सोलापूर शहरात सार्वजनिक शांतता राखणे आवश्यक असल्याने, महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम मधील कलम १४२ अन्वये प्रदाने करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दि. १३, १४ व १५ रोजी सोलापूर शहरातील सर्व देशी व विदेशी, ताडी विक्री अनुज्ञप्तीचे व्यवहार बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

संबंधित अनुज्ञप्तीधारकांनी दि. १३ जानेवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंत, दि. १४ जानेवारी सायंकाळी ७ वाजलेनंतर व दि. १५ जानेवारी सायंकाळी ५ वाजलेनंतर बंद ठेवावीत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यां विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल असेही नमूद करण्यात आले आहे.

# प्रशासकीय इमारत परिसरात आज स्वच्छता मोहीम

**२५ अधिकारी, १६० कर्मचारी होणार सहभागी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७ जानेवारी २०२५ रोजी राज्यातील सर्व अधिकारी यांना शंभर दिवस उद्दिष्ट प्रति बाबत सात कलमी कार्यक्रम दिला आहे; त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासकीय इमारतीमधील विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रित येऊन आपले कार्यालय व आपला कार्यालय परिसर स्वच्छ ठेवण्याच्या अनुषंगाने जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय येथे सर्व विभाग प्रमुखांची नियोजन बैठक उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी संतोषकुमार देशमुख व अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या स्वच्छता नियोजन बैठकीस जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, जिल्हा ग्राहक मंच न्यायालयाचे प्रबंधक प्रशांत तावडे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सहसंचालक नलिनी टेंभेकर, नगर भूमापन संचालक गजानन पोळ, भूजलचे वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉक्टर मुस्ताक शेख, अन्न औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त एस. डी. जिंतूरकर, कृषी विभागाचे तंत्र अधिकारी एस. बी. देशमुख, भूसंपादन क्रमांक ११ चे सहाय्यक महसूल अधिकारी बी. व्ही. वाघ नेहरू युवा केंद्राचे सुभाष चव्हाण, मत्स्य व्यवसाय विभागाचे राजेश पाटील, उपविभागीय अधिकारी सोलापूर ग्रामीण पोलीस निरीक्षक जी. ए. बिराजदार, बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता विशाल लेंगरे आदी उपस्थित होते.

उपजिल्हाधिकारी देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सुचनांची माहिती दिली. या स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ दि. ११ जानेवारी २०२५ रोजी सकाळी आठ ते दहा या वेळेत प्रशासकीय इमारत परिसर मोहिमेची स्वच्छता करून करण्यात येणार आहे.

या मोहिमेत सर्व अधिकारी कर्मचारी १००% उपस्थित राहणार आहेत. यापुढील काळात प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी व चौथ्या शनिवारी परिसर स्वच्छता मोहीम राबविण्याबाबत सर्वांचे एकमत झालेले आहे. परिसर स्वच्छ केल्यानंतर आपापल्या कार्यालयात प्रत्येक विभाग प्रमुखांनी त्यांची कार्यालये स्वच्छ व नीटनेटकी करून घेण्याचे ठरले. तसेच कार्यालयाबाहेर व्यवस्थित स्वच्छता ठेवून कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी बसण्यासाठी बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच आलेल्या नागरिकांची कामे वेळेत व गतीने होतील यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

## मिळकतकर थकबाकीपोटी ५ गाळे सील तर ८ नळ कनेक्शन तोडले



**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

महापालिका मिळकतकर संकलन विभागाकडून मि ळकतकर वसुलीसाठी धडक कारवाई मोहीम सुरूच आहे. या मोहिमेअंतर्गत शुक्रवारी मिळकतकर थकबाकीपोटी ५ गाळे सील तर ८ नळ कनेक्शन तोडण्यात आले.

महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत शुक्रवार, दि. १० जानेवारी रोजी विविध ठिकाणी कारवाई करण्यात आली. यामध्ये मुरारजी पेठेतील ५ गाळे सील करण्यात आले. याशिवाय उत्तर सदर बझार येथील ५ तर पाच्छा पेठेतील ३ असे एकूण ८ नळ कनेक्शन तोडण्यात आले. थकबाकी वसुलीसाठी ही कारवाईची मोहीम महापालिकेच्या विविध पथकांकडून सुरूच राहणार आहे. महापालिका मिळकतकर संकलन विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांच्या माध्यमातून विविध पथकाद्वारे ही कारवाई करण्यात येत आहे. शहरातील थकबाकीदारांनी आपला मिळकत कर भरून कटू कारवाई टाळावी. महापालिका प्रशासना सहकार्य करावे, असे आवाहन उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

**जाहिर प्रसिध्दीकरण**

तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, ग.नं. ३२२/२ कुमठे गाव सोलापूर येथील रस्ते, ड्रेनेज, दिवाबत्ती व ओपन स्पेस ताब्यात घेणेकामी संबंधित लेआऊटधारक श्री. भारत अण्णाराव भोपळे यांनी विनंती अर्ज केल्यावरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील १९४९ चे कलम २२३ व २२४ चे तरतुदीनुसार वरील लेआऊटमधील रस्ते, ड्रेनेज, दिवाबत्ती व ओपन स्पेस सोलापूर महानगरपालिकेचे ताब्यात घेऊन ती सार्वजनिक म्हणून जाहिर करण्यात येत आहे. तमाम नागरिकांचे ३० (तीस) दिवसांच्या आत सुचना व हरकती न आल्यास हे जाहीर प्रसिध्दीकरण अंतिम समजले जाईल.

ताब्यात घेणेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | आकार |
|---|---|---|
| १ | रस्ते | ३००६.४८ चौ.मी |
| २ | दिवाबत्ती | १२ नग लाईट |
| ३ | ड्रेनेज | ३००.०० रनिंग मीटर |
| ४ | ओपन स्पेस | १०१८.०० चौ.मी |

सही/-
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

# लातुरात उद्या फातिमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन

**▸ सोलापूरचे ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य तांबोळी, नल्लामंदू यांची प्रमुख उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था महाराष्ट्र शाखा लातूर यांच्या मार्फत दि. १२ जानेवारी रविवार रोजी लातूर येथे राज्यस्तरीय तिसरे फातिमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी नाशिक येथील सुप्रसिध्द साहित्यिक लेखिका मलेका महेबूब शेख - सय्यद यांची तर स्वागताध्यक्षपदी मुख्याध्यापक इस्माईल शेख यांची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती संस्थेचे जिल्हाध्यक्ष तहेसीन सय्यद व केंद्रिय अध्यक्ष अ‍ॅड. हाशम पटेल यांनी एका पत्रकार परिषदेद्वारे दिली आहे.

भारतातील पहिल्या मुस्लिम मराठी शिक्षिका युगस्त्री फातिमाबी शेख यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या एकदिवसीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन आमदार तथा माजी वैद्यकिय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री अमित विलासराव देशमुख साहेब करणार असून खासदार डॉ. शिवाजी काळगे, प्राचार्य नागोराव कुंभार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून मोईजभाई शेख, माजी महापौर विक्रांतजी गोजमगुंडे, ज्येष्ठ साहित्यिक फ.म. शहाजिंदे, प्रा.मैनोद्दीन मुल्ला, संस्थापक कवी शेख शफी बोल्डेकर, कवयित्री अनिसा सिकंदर शेख, कवी खाजाभाई बागवान, डॉ. सय्यद जब्बार पटेल, अ.भा. मुस्लीम मराठी साहित्य परिषदचे सचिव अय्युब नल्लामंदू व उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. इ.जा.तांबोळी, माजी संमेलनाध्यक्षा डॉ. अर्जिनबी युसूफ शेख , इंतेखाब फराश, अफसर शेख,डॉ.एहसानुल्ला कादरी, प्रा. फारूख तांबोळी, मुहंमद युनूस पटेल, प्रा.डॉ. सुरैय्या जहागीरदार, डॉ. दुष्यंत कटारे, विलास सिंदगीकर, डॉ. महंमद रफी शेख, डॉ. नंदकुमार माने, जाफरसाहाब शेख आदि मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी पुस्तक प्रकाशन, पुरस्कार वितरण, परिसंवाद होणार आहे.





हे साहित्य संमेलन भालचंद्र ब्लड बँक, गांधी मार्केट, लातूर येथे होणार आहे. स्व.अ‍ॅड. सिकंदर शेख यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा अ‍ॅड. फरहिन खान पटेल यांना समाजसेवा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे तर युगस्त्री फातिमाबी शेख साहित्य पुरस्कार कवयित्री नूरजहाँ शेख आणि स्व. हुसेनसाब बागवान यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार शिक्षक व लेखक गौसपाशा शेख यांना देण्यात येणार आहे.

**जाहीर समन्स**

रे.मु.नं.७८६/२०१७

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन (मे. रतकंठवार सो), यांचे कोर्टात**

**कॅनरा बँक** -- वादी
विरूध्द
**श्री. सादीक एम.डी. हुसेन शेख** -- प्रतिवादी

**प्रतिवादी :- श्री. सादीक एम. डी. हुसेन शेख**
वय : ५० वर्षे, धंदा ऑटो रिक्शा सर्व्हिस,
रा.१५९५, मुस्लि पाच्छा पेठ, सोलापूर.

ज्याअर्थी, यातील वादी यांनी प्रतिवादी यांचेविरूध्द रक्कम वसूलीचा दावा दाखल केला आहे. सदरकामी तुम्ही प्रतिवादी यांना समन्स / नोटीसा बजावणीसाठी पाठविले असता, सदर ठिकाणी राहत नसल्यामुळे न बजावलेबद्दल बेलिफ रिपोर्ट आलेला आहे. तसेच अर्जदाराच्या माहितीप्रमाणे त्यांना माहिती असलेला तुमचा राहण्याचा वर नमूद केलेला शेवटचा पत्ता आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने तुम्हांस कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत तुमची कांहीं हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्ठयर्थ अथवा विरूध्द तुमचे कांही म्हणणे असल्यास तुम्ही ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून मे. कोर्टानी नेमलेली तारीख ३/३/२०२५ रोजी स्वतः अथवा आपल्या वकिलांमार्फत या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी अन्यथा कोणाची कांहीही हरकत नाही, असे समजून उक्त अर्जाचे कामी पुढील आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

आज दिनांक माहे २९/११/२०२४ इसवी सन रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले.

**सही /-**
**लिपीक**

**शिक्का**

**सही/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्या. व. उत्तर, सोलापूर**

**जाहीर नोटीस**

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ३७७/२०२४

**१. जरीना समीर मीमीन** -- **अर्जदार**
रा. गाडेगाव रोड, बार्शी ता. बार्शी जि सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील वृक्षाली शं वाघमारे)
**२. जन्म-मृत्यू नौदणी अधिकारी तथामुख्याधिकारी न.प. बार्शी** -- **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराचा मुलगा मौहम्मद गौस समीर मोमीन, रा. गाडेगाव रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १५ सप्टेंबर २००८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा मोहम्मद गौस समीर मोमीन यांचा दिनांक १५ सप्टेंबर २००८ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत में. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ७ जानेवरी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**कोर्टाचा शिक्का**

**सही**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**बार्शी**

# अनधिकृत व्यवहारांपासून सुरक्षित ठेवणे बँकांची जबाबदारी

### सर्वोच्च न्यायालयाची भूमिका



◆ **नवी दिल्ली, १० जानेवारी**
ग्राहकांना अनधिकृत व्यवहारांपासून सुरक्षित ठेवणे बँकांची जबाबदारी आहे, असे स्पष्ट करीत सर्वोच्च न्यायालयाने भारतीय स्टेट बँकेला फसव्या व्यवहारांची रक्कम ग्राहकाला परत करण्याचा निर्देश दिला.

आसामच्या ज्योती यांचे स्टेट बँकेत खाते होते. त्यांच्या खात्यात ८ ते १७ मे २०१२ या दरम्यान ४ लाख ४५ हजारांचे अनधिकृत ऑनलाईन व्यवहार झाले. नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर त्यांना या व्यवहारांचे कोणतेही ओटीपी किंवा एसएमएस अलर्ट मिळाले नाहीत. त्यांनी याबाबतची माहिती बँक आणि पोलिसांना दिली.

ग्राहकांच्या निष्काळजीपणामुळे असे झाले, असे स्टेट बँकेने म्हटले. पोलिस तपासात मात्र ठाणे येथून हा सायबर गुन्हा घडल्याचे स्पष्ट झाले. यानंतरही बँकेने ज्योती यांचा दावा फेटाळला, नंतर त्यांनी गुवाहाटी हायकोर्टात याचिका दाखल केली. ◂(वृत्तसंस्था)

### ६ जुलै २०१७ च्या परिपत्रकात काय?

ओटीपी शेअर केला नसतानाही झालेल्या अनधिकृत व्यवहाराची तक्रार ग्राहकाने ३ दिवसांच्या आत बँककडे केल्यास, बँकेला फसव्या व्यवहाराची रक्कम परत करावी लागेल. बँकेने फसव्या व्यवहारांबाबत ग्राहकांच्या तक्रारी ९० दिवसांच्या आत सोडवाव्यात, असे रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकात नमूद आहे. ■

### बँकांनी सतर्क राहावे

ग्राहकाने ओटीपी शेअर केल्यामुळे व्यवहार अधिकृत होता, असा दावा हायकोर्टात स्टेट बँकेने केला. मात्र, पोलिस तपासात हे व्यवहार फसवे असल्याचे स्पष्ट झाले असून, यात ज्योती यांची चूक नसल्याचे म्हणत हायकोर्टाने ज्योती यांना रक्कम परत करण्याचा आदेश दिला. सुप्रीम कोर्टाने हा निर्णय कायम ठेवला. फसवणूक आणि अनधिकृत व्यवहार रोखण्यासाठी बँकांनी सतर्क राहावे, असे कोर्टाने म्हटले आहे. ■



'माँ की रसोई'चे उद्घाटन केल्यानंतर मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी तिथे जेवणही केले

# भारतीयांना व्हिसाशिवाय ५७ देशांमध्ये करता येणार प्रवास

## जगातील सर्वांत शक्तिशाली पासपोर्टची रँकिंग जाहीर

◆ **नवी दिल्ली, १० जानेवारी**
हेन्ली ग्लोबल जागतिक संस्थेने जगातील सर्वांत शक्तिशाली पासपोर्टची यादी जाहीर केली आहे. यात भारत ८४ व्या स्थानावर असून, पहिल्या स्थानावर सिंगापूर आहे. पाकिस्तान १०३ व्या क्रमांकावर असून, उत्तर कोरियापेक्षाही रँकिंग घसरली आहे.

रँकिंगनुसार, भारतीयांना व्हिसाशिवाय ५७ देशांमध्ये प्रवास करता येईल. यात अंगोला, भूतान, बोलिव्हिया, फिजी, हैती, कझाकस्तान, केनिया, मॉरिशस, कतार, श्रीलंका आदी देशांचा समावेश आहे. रँकिंग ठरवण्याचे सूत्र म्हणजे पासपोर्ट असलेली व्यक्ती व्हिसाशिवाय किती देशांना भेट देऊ शकतात, हे असते. यादीत सिंगापूर अव्वलस्थानावर असून, या देशातील लोक जगातील १९५ देशांमध्ये व्हिसाशिवाय किंवा व्हिसा ऑन अरायव्हल सुविधेसह प्रवास करू शकतात. २०२३ सोडले तर २०२१ पासून आतापर्यंत सिंगापूर या यादीत अव्वल स्थानावर आहे. २०२४ मध्ये फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान आणि स्पेनला संयुक्तपणे पहिले स्थान मिळाले. ◂(वृत्तसंस्था)

### जपानची रँकिंग घसरली, सिंगापूर अव्वल

शक्तिशाली पासपोर्टच्या क्रमवारीत जपानने नेहमीच सिंगापूरला टक्कर दिली आहे. यावर्षी जपानला दुसरा क्रमांक मिळाला असून, सिंगापूर पहिल्या स्थानावर आहे. जपानी पासपोर्टधारकांना व्हिसाशिवाय १९३ देशांमध्ये प्रवास करता येईल. या वर्षी भारताचे रँकिंग ५ स्थानांनी घसरले. या यादीत भारताला ८५ वे स्थान मिळाले आहे. गेल्या वर्षी भारत ८० व्या स्थानावर होता. २०२३ मध्ये भारताचे स्थान ८४, २०२२ मध्ये ८३, २०२१ मध्ये ९०, २०२० मध्ये ८२ आणि २०१९ मध्येही ८२ होते. ■



### आता चीनमध्ये आढळला एमपॉक्सचा नवीन स्ट्रेन

◆ **नवी दिल्ली, १० जानेवारी**
चीनमध्ये एचएमपीव्ही संसर्गाच्या वाढत्या प्रकरणांमध्ये आणखी एक रोग पसरू लागला आहे. वास्तविक अलिकडेच चीनमध्ये एमपॉक्स हा नवीन प्रकार आढळला आहे. क्लेड नावाचा हा नवीन स्ट्रेन जगाच्या अनेक भागांमध्ये पसरत आहे.

चीनमध्ये हे प्रकरण रिपब्लिक ऑफ कॉंगोमधून परतणाऱ्या व्यक्तींमध्ये आढळून आले आहे. यासाठी या व्यक्तींच्या जवळच्या संपर्कात असलेल्या चार जणांमध्येही ही प्रकरणे आढळून आली. यापूर्वी कॉंगोमध्ये पसरलेल्या एमपॉक्सच्या क्लेड-१ या प्रकाराला जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक आणिबाणी घोषित केली होती. हा नवीन प्रकार बुरुंडी, केनिया, रवांडा आणि युगांडा या शेजारील देशांमध्ये पसरला आहे. या स्टेन त्याच्या उच्च विषारीपणासाठी ओळखला जातो तसेच याचा मृत्यूदर १० टक्के आहे. ◂(वृत्तसंस्था)

# प्रयागराजमध्ये 'माँ की रसोई'चे उद्घाटन

## फक्त ९ रुपयांत मिळणार पोटभर जेवण

◆ **महाकुंभनगर, १० जानेवारी**
महाकुंभ सुरू होण्यापूर्वी उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शुक्रवारी 'माँ की रसोई' या सामुदायिक खानावळीचे उद्घाटन केले. यात फक्त ९ रुपयांत पोटभर जेवण दिले जाणार आहे. स्वरूप राणी नेहरू रुग्णालयातील नंदी सेवा संस्थेद्वारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील लोकांसाठी सामुदायिक खानावळ चालवली जाते, असे सरकारने एका निवेदनात म्हटले आहे.

प्रयागराजमध्ये आदित्यनाथ यांनी हॉस्पिटलला भेट दिली. त्यावेळी त्यांनी माँ की रसोईचे उद्घाटन केले तसेच व्यवस्थेचा आढावा घेतला आणि उपस्थितांना वैयक्तिकपणे जेवण दिले. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गाला आधार देण्यासाठी नंदी सेवा संस्थेने हा उपक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमांतर्गत लोकांना फक्त ९ रुपयांत पोटभर जेवण मिळणार आहे. या जेवणात वरण, चार पोळ्या, भाजी, भात, कोशिंबीर आणि एक मिष्टान्न मिळणार आहे.

उद्घाटनानंतर औद्योगिक विकास मंत्री नंद गोपाल गुप्ता यांनी मुख्यमंत्र्यांना जिथे जेवण तयार केले जाते, ते स्वयंपाकघर दाखवले. त्याठिकाणी मुख्यमंत्र्यांना जेवणाचा दर्जा, स्वच्छतेचे निकष आणि इतर व्यवस्थेबाबत माहिती देण्यात आली. जे लोक एसआरएन रुग्णालयात प्रियजनांच्या उपचारासाठी येतात आणि ज्यांना जेवण मिळत नाही, अशांसाठी माँ की रसोई उपयुक्त ठरेल, असे नंदी सेवा संस्थेने सांगितले.

एसआरएन कॅम्पमध्ये सुमारे दोन हजार स्वेअरफूट परिसरात नंदी सेवा संस्थेने माँ की रसोई हे पूर्णपणे एसी, स्वच्छतापूर्ण आणि आधुनिक रेस्टॉरंट तयार केले आहे. एकाच वेळी येथे सुमारे १५० लोक एकत्र बसून जेवण करू शकणार आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# 'त्या' तीन नक्षल्यांवर होते १८ लाखांचे बक्षीस

◆ **रायपूर, १० जानेवारी**
छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात गुरुवारी ज्या तीन नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला होता, त्यांच्यावर एकत्रित १८ लाख रुपयांचे बक्षीस होते आणि हे तिघेही वरिष्ठ कमांडर होते, अशी माहिती शुक्रवारी समोर आली आहे.

सुकमातील पालिगुडाच्या डोंगराळ भागात काही नक्षलवादी लपले असून, ते मोठ्या घातपाताच्या तयारीत असल्याची माहिती मिळाल्यानंतर जवानांनी या भागात शोधमोहीम राबवली होती. ठार झालेल्या नक्षल्यांपैकी एकाचे नाव कोरसा महेश असे असून, तो आयईडी तयार करण्यात निष्णात होता. तो उपकमांडर होता आणि त्याच्यावर आठ लाख रुपयांचे बक्षीस होते. मागील दोन वर्षांच्या काळात बिजापूर आणि सुकमा भागात करण्यात आलेल्या आयईडी स्फोटांमध्ये त्याचा हात होता, अशी माहिती सुकमाचे पोलिस अधीक्षक किरण चव्हाण यांनी दिली.

ठार झालेल्या अन्य दोन नक्षल्यांचे नाव माडवी नवीन आणि अहलाम भीमा असे असून, ते देखील वरिष्ठ सदस्य होते आणि त्यांच्यावर प्रत्येकी पाच लाखांचे बक्षीस होते. चकमकीच्या स्थळावरून दोन बॅरेल ग्रेनेड लाँचर, रायफल, तीन टिफीन बॉम्ब आणि मोठ्या प्रमाणात स्फोटकांचा साठा जप्त करण्यात आला, असे चव्हाण यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# पत्नीला बोलवायला गेलेल्या नवऱ्यास मेहुण्याकडून मारहाण

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**
पत्नीला बोलवायला गेलेल्या नवऱ्याला मेहुण्याकडून मारहाण करून जखमी करण्यात आले.

नरसिंग लक्ष्मण गोरे (वय ४५, रा. भगवान नगर झोपडपट्टी, पोलिस हेडक्वार्टर शेजारी, सोलापूर) असे जखमींचे नाव आहे. ७ जानेवारी रोजी रात्री मार्कंडेय रुग्णालयाच्या पाठीमागे असलेल्या फलमारी झोपडपट्टीत स्वतःच्या पत्नीला नरसिंग गोरे बोलवायला गेले होते. त्यावेळी तु इथे का आला म्हणून मेव्हुणा अनिल नारायण यल्ला, नागमणी यल्ला यांनी बकेटच्या झाकणाने मारहाण करून जखमी केले. नरसिंग गोरे यांना आई गंगूबाई गोरे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# दुचाकी घसरून महिला डॉक्टर जखमी

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**
गांधी नगर चौकातील सिग्नलवर दुचाकी घसरून झालेल्या अपघातात महिला डॉक्टर जखमी झाल्या.

डॉ. स्वाती बापूराव मुने (वय ४०, रा. अंत्रोळीकर नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. १० जानेवारी रोजी दुपारी अडीचच्या सुमारास डॉ. स्वाती मुने या दुचाकीवरून अंत्रोळीकर नगर ते सात रस्ता असे दुचाकीवरून जात होत्या. त्यावेळी गांधी नगर सिग्नल येथे दुचाकी घसरून अपघात झाला. यामध्ये डॉ. स्वाती मुने या जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात डॉ. आरती यांनी दाखल केले.

# कॅनडाचा लिबरल पक्ष ९ मार्चला निवडणार पंतप्रधान

◆ **टोरंटो, १० जानेवारी**
जस्टिन ट्रुडो यांच्या राजीनाम्यानंतर कॅनडाचा सत्ताधारी लिबरल पक्ष देशाच्या पुढील पंतप्रधानाची निवड ९ मार्च रोजी करणार आहे. पंतप्रधानाची निवड मतदानानंतर केली जाणार असल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.

लिबरल पार्टी ऑफ कॅनडाच्या अध्यक्षांनी गुरुवारी रात्री जाहीर केलेल्या निवेदनात म्हटले की, नवीन पंतप्रधानांची निवड होईपर्यंत ट्रुडो पदावर कायम राहणार आहेत. मजबूत आणि सुरक्षित प्रक्रियेचा भाग म्हणून ९ मार्च रोजी पक्षांतर्गत मतदानातून नवीन नेता निवडला जाईल. निवड करण्यात आलेला नेता देशाचा पंतप्रधान असेल आणि त्यांच्याच नेतृत्वात २०२५ ची सार्वत्रिक निवडणूक लढविली जाणार आहे.

नवीन पंतप्रधानपदाच्या शर्यतीत मार्क कार्नी आणि माजी अर्थमंत्री क्रिस्टिया फ्रीलँड यांचे नाव चर्चेत आहे. ट्रुडो यांनी त्यांच्याच पक्षातून प्रचंड विरोध झाल्याने पदावरून ६ जानेवारी रोजी पायउतार व्हावे लागले. त्यांनी लागू केलेल्या धोरणामुळे पक्षात मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली होती. नॅनोसच्या ताज्या सर्वेक्षणात लिबरल पक्षाची लोकप्रियता विरोधी कंझर्व्हेटिव्ह पक्षाच्या तुलनेत घसरली असल्याचे समोर आले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# कॅलिफोर्नियातील आग ४० हजार एकर परिसरात पसरली

**कॅलिफोर्निया :** अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यात लॉस एंजेलिसच्या आसपास लागलेल्या आगीमुळे सुमारे १० हजार घरे जळून खाक झाली आहेत. ४ दिवसांपासून धुमसत असलेली ही आग सुमारे ४० हजार एकर परिसरात पसरली आहे. यात २९ हजार एकर जमीन जळून खाक झाली आहे. याशिवाय सुमारे ३० हजार घरांचे नुकसान झाले आहे. शुक्रवारी आगीतील मृतांची संख्या सातवर गेली. लॉस एंजेलिस आणि आजूबाजूच्या परिसरात लागलेली ही सर्वांत मोठी आग आहे. येथील शेरीफ रॉबर्ट लुना यांनी आगीमुळे झालेल्या विनाशाची तुलना अणुबॉम्बशी केली. ■

# रेस्टॉरंट मालकांची स्विगी, झोमॅटो विरोधात स्पर्धा आयोगाकडे धाव

### दहा मिनिटांत फूड डिलिव्हरी अंगलट येणार

◆ **नवी दिल्ली, १० जानेवारी**
नॅशनल रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडियाने (एनआरएआय) झोमॅटो आणि स्विगीविरोधात भारतीय स्पर्धा आयोगाकडे (सीसीआय) धाव घेतली आहे. एनआरएआयने झोमॅटो आणि स्विगीच्या नुकत्याच विविध ॲप्सद्वारे क्विक कॉमर्स फूड डिलिव्हरीच्या निर्णयाला विरोध केला आहे.


एनआरएआयच्या मते, ब्लिंकिट बिस्ट्रो आणि स्विगी स्नॅक यासारख्या स्वतःच्या क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्मद्वारे खाजगी-लेबल फूड डिस्ट्रिब्युट करणाऱ्या दोन फूड डिलिव्हरी दिग्गज बाजाराच्या तटस्थतेचे उल्लंघन करतात, ज्यामुळे स्पर्धेची असमान पातळी निर्माण होते.




झोमॅटो आणि स्विगी स्वतःहून खाजगी लेबलिंग आणि खाद्यपदार्थांची विक्री करीत आहे, हे आम्हाला अजिबात मान्य नाही. झोमॅटो ब्लिंकिटच्या स्वतंत्र बिस्ट्रो ॲपच्या माध्यमातून आणि स्विगीने त्वरित जेवण देण्यासाठी स्नॅक्स सादर केले, असे एनआरएआयचे अध्यक्ष सागर दरयानी म्हणाले. एनआरएआयच्या मते, झोमॅटो आणि स्विगी त्यांच्या नेटवर्क डेटाचा फायदा घेऊन थेट किंवा त्यांच्या उपकंपन्यांद्वारे खाजगी-लेबल फूड डिलिव्हरी करीत आहेत. ही रणनीती केवळ या प्लॅटफॉर्मवर अवलंबून असलेल्या रेस्तराँ व्यवसायावर संकट आणत नाही तर, कॉपीराईट कायदा आणि कायद्यांतर्गत गंभीर चिंता देखील वाढवते. ◂(वृत्तसंस्था)

### शेअर्स घसरले

बाजारातील चढ-उतारांमुळे ऑनलाईन फूड डिलिव्हरी कंपन्यांच्या शेअरमध्ये शुक्रवारी मोठी घसरण पाहायला मिळाली. स्विगी आणि झोमॅटोचे शेअर्स आठवड्याच्या शेवटच्या दिवशी ३.६ टक्क्यांनी घसरले. स्विगीचा शेअर ४९० रुपयांच्या खाली घसरला, तर झोमॅटोच्या शेअरची किंमत २४० रुपयांच्या खाली आली. ■



## अग्रलेख...

# काँग्रेसची अवस्था बुजगावण्यासारखी

लोकसभा निवडणुकीत भाजपाला आणि भाजपाच्या नेतृत्वातील रालोआला म्हणजे एनडीएला रोखण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वात इंडिया आघाडीची स्थापना करण्यात आली होती. इंडिया हे या आघाडीचे संक्षिप्त नाव आहे. या आघाडीचे पूर्ण नाव आहे 'इंडियन नॅशनल डेव्हलपमेंटल इक्ल्युजिव्ह अलायन्स.' यातील प्रत्येक इंग्रजी शब्दातील पहिले इंग्रजी अक्षर घेत 'इंडिया' हे नाव तयार करण्यात आले; नव्हे भाजपाच्या नेतृत्वातील एनडीएला प्रत्युत्तर म्हणून 'इंडिया' शब्द तयार होईल, असे या आघाडीचे मालगाडीसारखे नाव ठेवण्यात आले, असे म्हणायला हरकत नाही. २००४ ते २०१४ या काळात केंद्रात सत्तेत असताना काँग्रेसने संयुक्त पुरोगामी आघाडी (संपुआ) स्थापन केली होती. संपुआ बरखास्त झाल्याची कोणतीही अधिकृत माहिती नाही. त्यामुळे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला रोखण्यासाठी इंडिया नावाने नवी आघाडी स्थापन करण्याऐवजी संपुआ आघाडी कायम ठेवता आली असती, पण काँग्रेसने तसे केले नाही. जे पक्ष संपुआत होते, तेच भाजपाविरोधी पक्ष इंडिया आघाडीतही होते. होते असे म्हणण्याचे कारण आता इंडिया आघाडीचे अस्तित्व उरले नाही. त्यामुळे इंडिया आघाडीचे वर्णन 'नव्या बाटलीत जुनी दारू' असे करायला हरकत नाही. दिल्लीतील विधानसभा निवडणुकीच्या मुहूर्तावर इंडिया आघाडीचे राजधानी दिल्लीतील प्रदूषणाने भरलेल्या यमुना नदीत विसर्जन झाले आहे. इंडिया या शब्दाचा आग्रह आता लोकसभेत विरोधी पक्षनेते असलेले काँग्रेसचे राहुल गांधी यांचा होता. तेव्हा ते फक्त काँग्रेसचे नेते होते. भाजपाला दिल्लीतील सत्तेपासून रोखण्यासाठी स्थापन झालेल्या इंडिया आघाडीरूपी फुग्याला दिल्लीतील विधानसभा निवडणुकीच्या आधीच आघाडीतील घटक पक्षांनी काँग्रेसच्या भूमिकेमुळे नाराज होत टाचणी लावली आणि तिच्यातील सर्व हवा काढून घेतली.

लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला सत्तेवर येता आले नसले, तरी भाजपाला स्पष्ट बहुमत मिळण्यापासून रोखण्यात यश आले होते, हे नाकारता येणार नाही. बहुमतासाठी २७२ चा आकडा आवश्यक असताना भाजपा २४० वर अडकली होती. रालोआतील तसेच अन्य काही मित्रपक्षांच्या मदतीने भाजपाने बहुमत गाठत सरकार स्थापन करण्यात यश मिळविले, हा भाग वेगळा. भाजपाला बहुमतापासून रोखणे याच एकमेव उद्देशाने इंडिया आघाडीची स्थापना करण्यात आली होती; तो हेतू पूर्ण झाला. इंडिया आघाडीचा फायदा काँग्रेस आणि समाजवादी पक्ष या दोन पक्षांनाच मिळाला होता. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अनुक्रमे ४४ आणि ५२ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसला २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ९९ जागा मिळाल्या. २०१४ आणि २०१९ मध्ये लोकसभेतील एकूण सदस्य संख्येच्या १० टक्के जागाही जिंकू न शकल्यामुळे काँग्रेसला विरोधी पक्षनेतेपदही मिळू शकले नव्हते. यावेळी ९९ जागा मिळाल्यामुळे काँग्रेसला विरोधी पक्षनेतेपद मिळाले. राहुल गांधी यांच्या गळ्यात आतापर्यंत वरमाळा पडली नसली तरी यावेळी लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदाची माळ पडली, हेही काही कमी नाही. समाजवादी पक्षाने उत्तरप्रदेशात लोकसभेच्या □८० पैकी विक्रमी म्हणजे ३७ जागा जिंकत इतिहास घडवला. तामिळनाडूत द्रमुक हा इंडिया आघाडीतील आणखी एक घटक पक्ष २२ जागा जिंकत चौथ्या क्रमांकावर आला.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप आणि काँग्रेस हे इंडिया आघाडीतील दोन प्रमुख पक्ष एकदुसऱ्याविरुद्ध दंड थोपटून उतरले. तेव्हाच इंडिया आघाडीत फूट पडल्याचे मानले जात होते. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीत दिल्लीत आप आणि काँग्रेस यांची आघाडी होती. दिल्लीतील सातपैकी या आघाडीला एकही जागा जिंकता आली नाही. म्हणजे तेव्हाही ही आघाडी फुस्स झाली होती. पण नंतर इंडिया आघाडीतील तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, शिवसेना उबाठा तसेच नॅशनल कॉन्फरन्स यांनी काँग्रेसला घरचा अहेर करत दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाला पाठिंबा जाहीर केला. या सर्व पक्षांच्या नेत्यांनी काँग्रेसवर टीका केली असली, तरी त्यांचा रोख हा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर होता. आघाडीतील सर्वांत मोठा पक्ष म्हणून इंडिया आघाडी सांभाळण्याचे काम हे काँग्रेसचे आणि त्या पक्षाचे नेते मल्लिकार्जुन खडगे आणि राहुल गांधी यांचे होते, पण हे दोघेही यात अपयशी ठरले. इंडिया आघाडीतील तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी वगळल्या तर अन्य सर्व पक्षांचे नेते तरुण तुर्क आहेत. समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, राजदचे तेजस्वी यादव, नॅशनल कॉन्फरन्सचे उमर अब्दुल्ला तसेच शिवसेना उबाठाचे उद्धव ठाकरे यांनाही तरुण समजायला हरकत नाही. त्यामुळे या सर्वांशी राहुल गांधी यांनी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे अपेक्षित होते; पण राहुल गांधींना ते करता आले नाही. राहुल गांधींचे राजकारण म्हणजे 'मेरी मुर्गी की एक ही टांग'सारखे एकांगी म्हणायला हरकत नाही. राहुल गांधींनी एक नाही तर दोन भारत जोडो यात्रा केल्या असल्या, तरी त्यांना सर्वांना सोबत घेऊन चालता येत नाही. नेता तोच असतो, जो सर्वांना सोबत घेऊन चालतो. पण राहुल गांधींना असे कधी जमले नाही आणि भविष्यात जमेल असे वाटतही नाही. राहुल गांधींच्या या धरसोडीच्या आणि मनमानी भूमिकेमुळे नाराज होत पक्षातील त्यांच्या अनेक जवळच्या मित्रांनी काँग्रेस सोडली. यातील अनेक जण तर त्या काळात राहुल गांधींचे विश्वासू म्हणून ओळखले जात होते. विश्वासू म्हणून ओळखले जाणारे मित्र राहुल गांधींवर फार काळ विश्वास ठेवू शकले नाही तर दुसऱ्या पक्षातील नेत्यांनी राहुल गांधींवर विश्वास ठेवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्याची परिणती इंडिया आघाडी संपण्यात झाली.

मुळात इंडिया आघाडीची स्थापना लोकसभा निवडणुकीपुरती झाली होती, असे राजदचे तेजस्वी यादव यांनी म्हटले. अप्रत्यक्षपणे त्यांना, लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडी बरखास्त करून टाकायला हवी होती, असे म्हणायचे होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी काँग्रेसची स्थापना झाली होती. त्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेस विसर्जित करत नव्या राजकीय पक्षाची स्थापना करावी, अशी महत्त्वपूर्ण सूचना राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी केली होती. त्यावेळी महात्मा गांधींची ही इच्छा पूर्ण केली असती तर आज देशात काँग्रेसची जी दयनीय स्थिती झाली आहे, त्यापासून काँग्रेस वाचली असती. पण काँग्रेस विसर्जित करण्याची महात्मा गांधी यांची इच्छा पूर्ण झाली नसली, तरी काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडी बरखास्त झाल्यामुळे भाजपानेच नाही तर देशातील जनतेनेही सुटकेचा श्वास सोडला आहे. कारण इंडिया आघाडी ही अनेक पक्षांची आघाडी असली, तरी त्यात आपलीच मनमानी काँग्रेस करत होती. लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीची एकही बैठक झाली नाही. लोकसभा निवडणुकीनंतर कोणत्या समान कार्यक्रमावर इंडिया आघाडी काम करेल, याचाही विचार झाला नाही. काँग्रेसच्या दृष्टीने इंडिया आघाडी म्हणजे गाजराच्या पुंगीसारखी होती. वाजली तर वाजली नाही तर खाऊन टाकली. पण यावेळी काँग्रेसला ही गाजराची पुंगी खायची संधी मिळायच्या आधीच आघाडीतील अन्य घटक पक्षांनी काँग्रेसलाच शब्दशः नसले तरी राजकीयदृष्ट्या खाऊन टाकले. दिल्ली विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांनी अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला पाठिंबा दिल्यामुळे काँग्रेस राजकीयदृष्ट्या संदर्भहीन झाली आहे. तिचे राजकीय महत्त्व आणि औचित्य संपले आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत आणि राष्ट्रीय राजकारणातही काँग्रेसची स्थिती आता शेतात उभ्या केलेल्या बुजगावण्यासारखी झाली आहे. बुजगावण्याला ज्याप्रमाणे कोणताही पक्षी भीत नाही, त्याप्रमाणे काँग्रेसला देशातील कोणताही राजकीय पक्ष मोजत नाही. आपल्या हाताने काँग्रेसने स्वतःची ही दशा नाही तर अवदसा करून घेतली आहे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# गाव तिथे बांगलादेशी!

मुंबई पोलिस एका तपासामध्ये कोकणातील रत्नागिरीच्या शांत आणि निसर्गरम्य वातावरणात जाऊन पोहोचले. रत्नागिरी म्हणजे रत्नांची नगरी. सावरकर नावाचं रत्न ब्रिटिशांनी याच रत्नागिरीत स्थानबद्ध केलं होतं. आपल्याकडे 'कोकणची माणसं साधीभोळी' असं म्हणतात. मुंबई पोलिसांना असाच काहीसा अनुभव आला. एका गुन्ह्याच्या तपासादरम्यान रत्नागिरीतल्या शिरगावात पोहोचल्यावर त्यांना धक्काच बसला. ज्या बांगलादेशी आरोपीचा शोध त्यांना होता, त्या बांगलादेशी आरोपीकडे रत्नागिरी जिल्ह्यातील शिरगाव ग्रामपंचायतीने दिलेला जन्मदाखला सापडला आणि पोलिसांना कळेना की, कोकणची माणसं इतकी साधीभोळी कशी?

झालं असं की, पोलिसांना एका गुन्ह्याचा तपास करताना आरोपी मोहम्मद इद्रिक इसाक शेखकडे शिरगाव ग्रामपंचायतीचा जन्मदाखला सापडला. या घटनेने रत्नागिरीत एकच खळबळ उडाली आहे. बांगलादेशमधून आलेला एक नागरिक, जो आरोपीही आहे, त्याच्याकडे कोकणातला जन्मदाखला सापडणे ही सर्वसाधारण बाब नसून गंभीर बाब आहे. सगळीकडे वाढत चाललेली मुसलमानांची संख्या ही नैसर्गिक आहे की घुसखोरांनी भारतभर आपले जाळे पसरल्यामुळे वाढलेली आहे. मुंबईतही अचानक ठिकठिकाणी ही संख्या वाढलेली दिसत आहे. त्यांच्या वागण्या-बोलण्यावरून हे नक्की कुठले, असा प्रश्न आपल्या मनात सहज निर्माण होतो. रस्त्याच्या कडेला कपडे विकणारे, विविध ठिकाणी स्टॉल लावणारे हे भारतीय मुसलमान वाटत नाहीत. पण ते भारतीय नावाने सर्रास वावरत असतात. याचं कारण आपल्यातलेच दगाबाज असतात.

कोकणातही तेच झालं. बांगलादेशी आरोपीला कोकणचा भूमिपुत्र बनवण्यामागे स्थानिक लोकांचा हात असल्याची शंका पोलिसांना आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तत्कालीन सरपंच अल्ताफ संगमेश्वरी आणि ग्रामसेवकांची चौकशी केली आहे. जन्मदाखला कोणत्या आधारावर दिला? जन्मदाखला देण्याचे कारण काय? पुराव्यांची पडताळणी केली की नाही? असे अनेक प्रश्न पोलिसांनी या सरपंचाला विचारल्याचे कळले आहे. तसेच



गटविकास अधिकाऱ्यांनाही याबाबतचा अहवाल सादर करण्याचा आदेश देण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांना यश येऊन आरोपींना शिक्षा होईलच. परंतु ही बाब अतिशय गंभीर आहे. कोकणच्या सुंदर वातावरणाला बिघडवण्याचे हे कारस्थान आहे. कोकणातल्या साध्या भोळ्या लोकांचा गैरफायदा उचलण्याचा हा प्रकार आहे. वरवर पाहता हे एक प्रकरण दिसते. मात्र अशी कितीतरी प्रकरणे 'कानून का लंबा हात' त्यांच्यापर्यंत न पोहोचल्याने दडून गेली आहेत. काही दिवसांपूर्वी बन्ना शेख असे नाव असलेल्या तरुणीने भारतात अनधिकृतरीत्या घुसखोरी करून नाव बदलून ॲडल्ट इंडस्ट्रीत स्थान मिळविल्याचे प्रकरण समोर आले. विशेष म्हणजे ती ॲडल्ट इंडस्ट्रीतली लोकप्रिय अभिनेत्री झाली. तिने 'रिया बर्डे' असे नाव धारण केले होते. रियाचं सबंध कुटुंबच अनधिकृतरीत्या भारतात राहतं. त्यांच्याकडे भारतीय नागरिक असल्याचे बनावट कागदपत्रेही आहेत. या बनावट कागदपत्रांच्या आधारे तिने भारतीय पासपोर्टही बनवला होता. म्हणजे विचार करा ही घाण आपल्या घरापर्यंत येऊन पोहोचली तर नाही ना?

या बांगलादेशींना मदत कोण करतं? तर, आपल्यातलेच काही सामान्य लोक असतात. थोड्याशा पैशाच्या मोहापोटी भारताचं भविष्य विकतात. उच्च पदावर बसलेले अधिकारीही यात सामील असतात. मात्र महाराष्ट्र आणि केंद्र सरकारने घुसखोरांविरोधात मोहीम उघडली असून, त्यांना शोधून पुन्हा मायदेशी पाठविण्याचा विडा उचलला आहे. पण हे काम सोपे नाही. कारण बांगलादेश, पाकिस्तानातून येणारे घुसखोर आपल्यासारखेच दिसतात. ते पूर्वाश्रमीचे भारतीयच, नव्हे, पुढे जाऊन म्हणायचं तर ते पूर्वाश्रमीचे हिंदूच. त्यामुळे भारतीय मुसलमान आणि घुसखोर यांच्यात सहसा फरक करता येत नाही. त्यात हे भारतीय हिंदू नाव घेऊन वावरत असतात. त्यामुळे हे काम अत्यंत त्रासदायक आणि कठीण आहे. यासाठी पोलिसांचं एक वेगळं पथक नेमावं लागणार आहे. त्याशिवाय या घुसखोरांना बाहेर हाकलता येणार नाही.

हे घुसखोर विविध क्षेत्रांत कार्यरत झाले आहेत. कुणी मजूर झाला, कुणी मासे विक्रेता, कुणी ठेला टाकला, तर कुणी कापड विक्रेता. विशेष म्हणजे महत्त्वाच्या रोजंदारीत आणि व्यवसायात यांनी शिरकाव केल्याचा संशय असल्यामुळे भारतात घुसखोरांची एक इको-सिस्टिम तयार झालेली असावी. ही इको-सिस्टिम भारताला पुढे धोकादायक ठरू शकते. कारण यांच्या बचावासाठी स्वयंघोषित पुरोगामी पुढे येणारच आहेत! आपल्याकडे म्हण आहे 'गाव तिथे उकिरडा.' आता 'गाव तिथे बांगलादेशी' असं म्हणण्याची पाळी आली आहे; नव्हे, 'घर तिथे बांगलादेशी' असेच म्हणावे लागेल. कारण आपल्या घराच्या बाजूलाही कुणी बांगलादेशी राहत असेल तर 'मला काय त्याचे?' या गुंगीत वावरणाऱ्या आपल्यासारख्या सामान्य माणसांना काही खबरबात लागणार आहे काय? आपण भलं आणि आपलं काम भलं हे सभ्य-सज्जन माणसाचं ब्रीदवाक्य आहे. पण भल्या माणसा, तुझ्या येणाऱ्या पिढीचं वाटोळं होत आहे अशा वागण्यामुळे, त्याचं काय? पण भल्या माणसाला याचं काय? तो तर नाकासमोर बघून चालणारा सज्जन आहे. असो! पण अचानक वाढणारी बांगलादेशी आणि इतर घुसखोरांची संख्या ही सामान्य बाब नाही. हा भविष्यातील मोठ्या कटकारस्थानाचा ट्रेलर असू शकतो. उद्या हे घुसखोर आम्हाला वेगळा देश द्या अशी हिंसक मागणी करणार नाहीत, याची शाश्वती कुणी देऊ शकतो काय?.

writerjayeshmestry@gmail.com

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# खाट कुरकुरतेय्!

महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी खाट कुरकुरतेय् अशा शब्दात काँग्रेसवर टीका केली होती. आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी राज्यातील परिस्थिती पाहिली तर उबाठा गट अजून झोपेतून जागा व्हायला तयार नाही. काँग्रेसची मोडलेली पाठ सरळ व्हायला तयार नाही, अशी टीका काँग्रेस आणि उबाठा गटावर केली आहे. मग काँग्रेसचे नेते माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी कोल्हेंवर पलटवार करत शरद पवार गटाला लक्ष्य केले. दुसरीकडे दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत आम आदमी पक्ष आणि काँग्रेस स्वतंत्र निवडणूक लढत आहे आणि महत्त्वाचं म्हणजे, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि आता अलिकडेच ठाकरे गटाने आम आदमी पक्षाला समर्थन दिलं आहे. यावेळी राज्यातील महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांमध्ये बेबनाव उघडपणे समोर आला असून, दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीवरून इंडिया आघाडीमध्ये देखील कुरबुर सुरू असल्याचे उघड झाले आहे. याचाच सरळसरळ अर्थ यावेळी इंडिया आघाडी आणि महाविकास आघाडीची खरंच खाट कुरकुरत आहे, हे स्पष्ट झाले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वीच पुन्हा एकदा महाविकास आघाडीमधील घटक पक्षांमधील वाद चव्हाट्यावर आल्याचं चित्र सध्या पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी गुरुवारी मुंबईत झालेल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीमधील भाषणात महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंच्या गटाला टोला लगावला आहे. तर, काँग्रेसच्या वडेट्टीवारांनी उबाठा आणि शरद पवार गटावर जोरदार हल्ला चढवला. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर महाविकास आघाडीमध्ये 'ऑल इज नॉट वेल' असल्याचं दिसत आहे. महाविकास आघाडीमधील घटक पक्ष आगामी निवडणुका वेगळ्या लढण्याच्या तयारीत दिसत आहेत.

अशातच मविआतील या संघर्षाची चर्चा रंगू लागली ती आता मविआचा



विधानसभा निवडणुकीतील पराभव आणि त्याआधी झालेल्या जागा वाटपांच्या बैठकांवरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या खळबळजनक आरोपामुळे.

विधानसभा निवडणुकीत जागावाटपाची चर्चा २० दिवस चालली, यात काही षडयंत्र होतं का? असे सर्वांत मोठे विधान विजय वडेट्टीवार यांनी केलं. नाना पटोले, संजय राऊत हे चर्चा करत होते. आम्हीही होतो, जागावाटपाचा तिढा दोन दिवसांत संपला असता तर १८ दिवस आम्हाला प्रचारासाठी मिळाले असते. असं ते म्हणाले. जागावाटपात इतका वेळ वाया घालवला, यामध्ये काही प्लॅनिंग होतं का? बैठक ११ वाजता असायची आणि यायचे दोन वाजता. अनेक नेते उशिरा यायचे. २० दिवस हा जागा वाटपाचा घोळ चालला. त्यामुळे फटका बसला.

२० दिवस जागावाटपात वेळ घालवण्यात काही षडयंत्र होतं का? यात वाव आहे. अशी शंका विजय वडेट्टीवारांनी व्यक्त केली. त्याचवेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी केलेल्या विधानावरूनही महाविकास आघाडीमध्ये जोरदार जुंपल्याचे पाहायला मिळत आहे. राज्यातील परिस्थिती पाहिली तर ठाकरे गट झोपेतून जागा व्हायला तयार नाही. काँग्रेसची मोडलेली पाठ अजून सरळ व्हायला तयार नाही. आपल्याकडे लढणारे शरद पवार आहेत. सध्या विरोधी पक्षात मोठी जागा शिल्लक आहे, त्यामुळे ''बचेंगे तो और भी लडेंगे'', असं ते म्हणाले. यावरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी अमोलरावांनी आपल्या पक्षाकडे थोडं अधिक लक्ष द्यावं आणि आम्हाला सल्ला थोडा कमी द्यावा, अशा शब्दांत अमोल कोल्हेंवर पलटवार केला. त्यामुळेच विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर मविआमध्ये काही आलबेल नसल्याचे चित्र दिसत आहे.

मागील काळात जुनी खाट कुरकुरतेय् अशी टीका संजय राऊतांनी केली होती. मात्र, यावेळी तर अवघ्या दोनचार वर्षे जुनी खाट कुरकुरताना दिसत आहे. ही कुरकुरणारी खाट आता कधी तुटून कोलमडेल याची काहीही शाश्वती राहिलेली नाही. तसेही भिन्न विचारांच्या लोकांनी मिळून केवळ राजकीय स्वार्थासाठी केलेल्या या तिघाडीत विचारांची उणीव होतीच. आता सत्ता हातून तर गेलीच शिवाय नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर आत धुमसत असलेली आग आता भडक्यात रूपांतर होण्याच्या तयारीत दिसत आहे. यावेळी एक गोष्ट भारी वाटली ती म्हणजे, नेहमी उबाठा गटाचे बोलघेवडे संजय राऊत इतरांवर हल्ला चढवण्याचा शहाणपणा करत होते. त्यांच्यावर यावेळी पहिला हल्ला करण्याचे धाडस म्हणा किंवा सुरुवात म्हणा यावेळी खा. अमोल कोल्हे आणि आ. विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. आता यात अनेक इतरही नेते अर्थात दुसरी फळी संजय राऊत आणि उबाठा गटाच्या नेत्यांचे कपडे उतरवायला तयारच असतील. यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट ही मूळ समविचारी आघाडी असल्याने, ते एकमेकांवर शरसंधान साधणार नाहीत. अर्थात तेवढे पथ्य ते पाळतील.

मात्र, दोघेही मिळून ठाकरेंच्या गटाला आणि राऊतांच्या तोंडाला आता ते निपटवतील हीच शक्यता अधिक दिसते. यावेळी झालेली सुरुवात आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपर्यंत वणव्यात रूपांतर होण्याची शक्यता असून, या वणव्याच्या उसळणाऱ्या आगीत वाळल्यासोबत ओलंही जळेल यात शंका नाही.

९२७०३३३८८६

## वेध

**नीलेश जोशी**

# गोवंशाची हत्या, मानसिक विकृती

**गोपालांचा देश भारत, आला गाई-गुरे पूजित**
**परंतु गाई झाल्या खात, लक्षची नाही तयांकडे ॥**

ग्रामगीतेतून वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी गोवंश हत्येच्या विकृतीकडे या ओवींमधून लक्ष वेधले आहे. दुर्दैवाने आजही त्यांनी व्यक्त केलेल्या गंभीर मुद्याकडे लक्ष नसल्याचेच दिसून येते. खरं म्हणजे शासनाने राज्यात संपूर्ण गोवंश हत्याबंदीचा कायदा केला. एवढेच नव्हे तर गो-मातेला 'राज्यमाता-गोमाता' असा दर्जाही प्रदान केला. पण गोवंशाची दररोज, सर्रास होणारी कत्तल अद्याप थांबली नसल्याचे चित्र आहे. राज्य शासनाने याबाबत सकारात्मक निर्णय घेत गोवंश हत्या थांबविण्यासाठी पुढाकार यापूर्वीच घेतला असला तरी पोलिस प्रशासनातील काहींच्या खाऊगिरी वृत्तीमुळे गोवंशाची कत्तल सुरूच आहे. अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यात उघडकीस आलेल्या प्रकारामुळे हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला.

तेल्हारा तालुक्यात मंगळवारी मालवाहू वाहन नादुरुस्त झाले. या मार्गावरून ये-जा करणाऱ्या अनेकांच्या नजरा त्यावर पडल्या. पण सजग असणाऱ्या काहींना वाहनातून दुर्गंधी आली. त्यांनी थांबून त्याची चौकशी सुरू केली. त्यात थोडं अधिक धाडस दाखवून समोर आलेल्यांनी वाहनात असलेल्या पोत्यात काय आहे ते पाहण्यासाठी पोते उघडले आणि सर्वांनाच धक्का बसला. मालवाहू वाहनात असलेल्या पोत्यात गोवंशाची शिंगे होती. सतर्क असलेल्या नागरिकांनी पोलिस प्रशासनाला ही बाब कळविली. पोलिस प्रशासनानेही तत्काळ कारवाई केली. पोत्यांमध्ये गोवंशाची शिंगे असल्याचे समोर आले होतेच. पण असंवेदनशीलता कशी असते याचाच अनुभव येथे आला. पोलिस प्रशासनाने एकीकडे गोवंशाची कत्तल झाली हे स्वीकारले पण किती गोवंशाची कत्तल झाली याची खातरजमा न करता १६ क्विंटल गोवंशाची शिंगे आढळल्याचे म्हणत पोलिस मोकळे झाले. माध्यमात आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी जेव्हा याबाबत विचारणा केली तेव्हा दुसऱ्या दिवशी पोलिसांनी गोवंशाची शिंगे मोजली. तब्बल ९ हजार ८०० शिंगे या वाहनात होती. म्हणजेच साधरणतः ४ हजार ९०० गोवंशाच्या कत्तलीनंतर या शिंगांची विल्हेवाट लावण्याकरिता ती नेली जात होती. अगदी स्पष्टच बोलायचे तर सुमारे ५ हजार गोवंशाची कत्तलीचा हा प्रकार पोलिसांनी १६ क्विंटल शिंगे म्हणून गुंडाळला होता. कित्येक वर्षांपासून सुरू असलेल्या गोवंश कत्तलीमुळे देशी गाईंची संख्या झपाट्याने कमी झाली. देशी गाईंच्या काही प्रजाती तर नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. २०१९ मध्ये झालेल्या पशुगणनेत केवळ ४६ लाख १३ हजार ६३२ देशी गाई असल्याचे समोर आले. यात धक्कादायक बाब म्हणजे यापूर्वीच्या पशुगणनेशी तुलना केली असता ही संख्या २०.६९ टक्क्यांनी घटली.

कृषी आधारित ग्रामव्यवस्था आणि गोवंश आधारित कृषी व्यवस्था हे आपल्या देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्य. ही व्यवस्था, वैशिष्ट्य कायम राहावे याकडे भारतीय चिंतनातून कृषी व्यवस्थेचा विचार करणाऱ्या तज्ज्ञांनी वेळोवेळी लक्ष वेधले आहे. वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेचा १५ वा अध्याय गो-संगोपन, संवर्धन, रक्षण या महत्त्वाच्या विषयावर लिहिला आहे. राज्यातील संत परंपरेसह कृषी आधारित ग्राम व्यवस्था बळकट व्हावी म्हणून प्रयत्न करणाऱ्या सर्वच महानुभावांनी वेळोवेळी जनजागरण केले. पण तरीही स्वातंत्र्योत्तर काळात केवळ गठ्ठा मतांच्या लालसेपोटी स्वार्थी राजकारण्यांनी गोरक्षण, गोसंवर्धन याकडे दुर्लक्ष केल्याचा इतिहास आहे. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात झपाट्याने देशी गाईंची संख्या रोडावली. शेती आधारित अर्थशास्त्राला गती देणारी, विज्ञानाच्या कसोटीवर मानवाला उपयोगी असलेली देशी गाय, गोवंश वाचावा म्हणून शासनाने राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा केला. तर गाईचे संगोपन, संवर्धन व्हावे या हेतूने देशी गाईला 'राज्यमाता-गोमाता' असा दर्जा दिला. असे असले तरी अखिल मानव जातीला उपकारक ठरणाऱ्या गोवंशाची कत्तल केवळ जिव्हेचे चोचले पूर्ण करण्यासाठी केली जाते. नव्हे धर्मांध मानसिकतेचे प्रदर्शन करीत येथील बहुसंख्य समाजाला कमी लेखण्यासाठी गोवंश हत्या केली जाते. ज्या वृत्तीला मानव जातीचे कल्याण कळत नसेल ती वृत्ती विकृतच म्हणावी लागेल. या विकृतीवर लगाम लावण्यासाठी तेल्हाऱ्यात घडलेल्या घटनेचा सखोल तपास व्हावा. गोवंश कत्तलीच्या हेतूने राज्यात होणारी वाहतूक, अवैध कत्तल बंद व्हावी तरच गोवंश हत्याबंदी कायद्याचा उपयोग होऊन 'राज्यमाता-गोमाता' हा गाईला दिलेला दर्जा सार्थकी लागेल.

९४२२८६२४८४

## वाचक पत्रे

### कुंभमेळा म्हणजे मन आणि देहाची शुद्धी

१३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत प्रयागराज येथे कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. कुंभमेळा म्हणजे जगातील सर्वांत मोठी धार्मिक यात्रा; ज्यात हिंदू संस्कृतीची महानता अनुभवायला मिळते. हिंदू एकतेचे प्रतीक असलेल्या या मेळ्यात फक्त हिंदू भाविकच नव्हे, तर ऋषी-मुनी आणि संतदेखील सहभागी होतात. त्यामुळे आध्यात्मिक दृष्टीने कुंभमेळ्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

कुंभमेळा या शब्दातील 'कुंभ' म्हणजे मातीचा घडा (मडके), जो मातीपासून तयार होतो तसेच मनुष्याचे शरीरही पंचमहाभूतांपासून निर्माण झालेले आहे आणि मृत्यूनंतर त्यातच विलीन होत असल्याने कुंभाला मानवी देहाचे प्रतीक मानले जाते. या देहामध्ये काम, क्रोध, मद, मत्सर, वासना, अहंकार अशा अनेक दोषांनी भरलेले मन असते. अशा वासनांनी भरलेला कुंभ रिकामा करण्याचे स्थळ म्हणजे कुंभमेळा! कुंभमेळ्यात संपूर्ण भारतातील संतांच्या सत्संगाचा लाभ प्राप्त होत असतो. संतांचे दर्शन, मार्गदर्शन आणि प्रयागराज येथील त्रिवेणी संगमातील पवित्र स्नान आपल्यातील अहंकार आणि दोष कमी करण्यास मदत करते. तेव्हा स्वभावदोषांनी भरलेले शरीररूपी कुंभ रिकामे करून; आपल्या आध्यात्मिक प्रगतीबरोबरच, शरीर आणि मनाची शुद्धी करून घेण्यासाठी कुंभमेळ्याचा लाभ सर्व भाविकांनी निश्चितच करून घ्यायला हवा.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

### घरबसल्या आयुष्मान कार्ड

शासनाने ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी काही आजारांवर नि:शुल्क उपचार जाहीर केले आहेत. दवाखान्यांची यादी जाहीर केली आहे. त्यामुळे ज्येष्ठांना खूप दिलसा मिळाला आहे. निवडणुकीपूर्वी मी प्रताप नगर येथे नक्षत्र सभागृहात गेली होती. तेथे जिना चढताना खूप त्रास झाला व वर गेल्यावर बसायला जागा नाही. खूप संताप आला. त्याच वेळी समाजसेविका चित्रा घाटेकर यांनी निवडणुकीनंतर घरपोच आयुष्मान कार्ड देण्यात येईल असे आश्वासन दिले. भाजपाचा विजय झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सौजन्याने व ओएसडी सुनील मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली विकास खेडकर, योगेश घोटकर व चित्रा घाटेकर यांनी घरी येऊन अत्यंत नम्रपणे कार्डाची प्रक्रिया पूर्ण केली व आयुष्मान कार्ड घरी आणून दिले. ज्या पक्षात असे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत त्यांचा विजय निश्चितच आहे.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

### जुनी पेन्शन, आमचा हक्क

महाराष्ट्र सरकारने १ जानेवारी २००४ रोजी राज्य सरकारी व निमशासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी जुनी पेन्शन योजना सरसकट बंद केली. त्यामुळे या निर्णयाचा तोटा असंख्य कर्मचारी वर्गाला व त्यांच्या कुटुंबीयांना झाला आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे निवृत्ती नंतरचे आयुष्य कसे असेल? किंवा ते कसे जगायचे? हा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला. त्याचबरोबर कर्मचारी वर्गाकडून असंख्य वेळेला आंदोलने करण्यात आली. पण सरकारकडून वारंवार फक्त आश्वासनेच मिळत गेली. अंमलबजावणी मात्र दूरच राहिली. त्यामुळे सर्वच कर्मचारी संघटना मला वाटते की, आंदोलने करून थकल्या



आहेत.

मागच्या वर्षी विधानसभा निवडणुका तोंडावर आल्या असता महायुती सरकारने राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नवीन सुधारित पेन्शन योजनेची घोषणा केली. पण या नवीन योजनेमध्ये अनेक अटी व शर्ती ठेवल्या गेल्या. त्यामुळे या योजनेचा फायदा सरसकट सर्वांना होणार नाही. त्याचबरोबर सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा संविधानामधील हिताच्या संबंधित नोंदीचे दाखले देऊन महाराष्ट्र राज्य सरकारला फटकारत असताना म्हटले होते.की, जुनी पेन्शन योजना हा प्रत्येक कर्मचाऱ्याचा हक्क आहे आणि तो हक्क त्यांच्याकडून कोणीही हिरावू शकत नाही.

राज्यात एका बाजूला शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू आहे व दुसऱ्या बाजूला नवीन कर्मचाऱ्यांना लागू नाही. मग असा भेदभाव का? अशा प्रकारचे असंख्य सूर कर्मचारी वर्गातून येत आहेत. त्याचबरोबर त्यांना नवीन पेन्शन योजना लागू असल्यामुळे, निवृत्तीनंतरचे त्यांचे आयुष्य खूपच खडतर असणार आहे. कारण, कोणताही कर्मचारी निवृत्त झाल्यानंतर त्याला आधाराबरोबर पैशांची पण गरज भासते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे उतार वयात प्रत्येक व्यक्तीच्या मागे विविध स्वरूपाच्या व्याधी लागतात. जर, वेळेवर पैशाअभावी उपचार झाले नाहीत तर, काय परिणाम होऊ शकतात हे सांगण्याची गरज नाही. नवीन पेन्शन योजनेनुसार त्यांना निवृत्तीनंतर भविष्यात मिळणारी पेन्शनची रक्कम खूपच तटपुंजी असणार आहे. या मिळणाऱ्या तटपुंज्या रकमेतून ते सर्व कर्मचारी आपला स्वतःचा उदरनिर्वाह करू शकणार नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सरकारने सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करावी, ही अपेक्षा.

**प्रा. सचिन जाधव**/८४२५००३१२७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# जिल्हा प्रशासनातील कार्यालयांना कार्पोरेट लूक द्या

## महत्त्वाचे अभिलेख, इतर रेकॉर्ड जपून ठेवा : मुख्यमंत्री फडणवीस यांचे जिल्हा प्रशासनाला निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गुरूजींनी जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांचा ऑनलाईन वर्ग (व्हिसी) तर मध्यंतरी भरविलाच मात्र पुन्हा एका जीआर द्वारे जिल्हा आणि तालुका प्रशासनातील सर्व कार्यालये कार्पोरेट बनविण्याचे आवाहन केले. इतकेच नाहीतर सर्वसामान्य नागरिकांचे दस्तावेज, अभिलेख व रेकॉर्ड पायदळी न ठेवता जपून ठेवण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, यामुळे जिल्हा प्रशासनात आता आमुलाग्र बदल होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

मुख्यमंत्री फडवणीस यांनी १०० दिवस कार्यक्रमाअंतर्गत जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी सुशासनासाठी काय काय करावे, याचेही मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी कार्यालयात दरमहा पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. तसेच तालुकास्तरावर दर महिन्याचे तिस-या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. तथापि या दिवशी सार्वजनिक सुटटी असल्यास त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस लोकशाही दिन म्हणून पाळण्यात येईल आणि जनतेची कामे करावीत, तक्रारी ऐकून घ्याव्यात असे नमुद केले.



आपले कार्यालय सुंदर ठेवावे, कार्यालय परिसर कायम स्वच्छ ठेवावा. कार्यालयातील शौचालये स्वच्छ ठेवावीत, कार्यालयात बाहेरून आलेल्या लोकांसाठीही पिण्याच्या पाण्याची सोय करावी, वापरात नसलेले सर्व फर्निचर, गाड्या बाहेर काढून त्याचा लिलाव करावा, प्रत्येक अधिकाऱ्यांनी आपल्याशी संबंधित असलेल्या कामाच्या ठिकाणी लोकांना भेटण्याचे बोर्ड लावावेत, भेटीचे वार ठरवून द्यावेत, शेतकरी, शेतमजुरांशी संवाद साधण्यासाठी त्यांच्या बांधावर जावे, त्यांच्याशी थेट संवाद साधून त्यांचे प्रश्न समजून घ्यावेत, जनमाणसांत मिसळल्याने जनतेच्या अपेक्षा आपल्याला कळतील आणि त्या जनतेच्या अपेक्षेप्रमाणे आपल्याला सरकार चालविता येईल, असाही आशवाद मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

---

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकंना विशेषतः मौजे राजुरी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांना ॲड. श्री. सुधीर नंदकुमार वाघ बी.ए. एलएल.बी. रा. सांगोला, यांचेमार्फत कळविणेत येते की,

**१) मिळकतीचे वर्णन :-** तुकडी सोलापुर, पोटतुकडी व तालुके सांगोला पैकी मौजे राजुरी येथील सोलापुर जिल्हा परिषेदेच्या अधिकार क्षेत्रातील तालुका सांगोला पंचायत समिती हददीतील मौजे राजुरी ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत जमिन गट नं. ७१२/३/२ क्षेत्र ०हे-०० आर, पो.ख. १७ हे-६० आर, आकार ० रू-०० पैसे पैकी हे ०० आर, पो.ख १४ हे ८० आर, आकार ० रू०० पैसे ही संपुर्ण मिळकत अजितकुमार मिलापचंद जैन यांचे खरेदी मालकी हक्क प्रत्यक्ष कब्जे वहीवाटीची मिळकत असून सदर मिळकतीपैकी ० हे ०० आर, पो.ख ८ हे ०० आर, आकार ०रू०० पैसे या मिळकतीबाबत अजितकुमार मिलापचंद जैन व आमचे अशिल यांचे दरम्यान कायमखुष खरेदी विक्रीचा व्यवहार ठरला असून सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, असलेबाबत आमचे अशिलांना अजितकुमार मिलापचंद जैन यांनी खात्री व हमी दिलेली आहे.

२) सबब सदरील मिळकतीवर कोणाचा खरेदी विक्री, तारण, गहाण, लीज, दान, पोटगी, बक्षीसपत्र, बँकेचा बोजा, वहीवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसात आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील नमुद पत्यावर संपर्क करून कागदपत्रांसह शहानिशा करून द्यावी. अन्यथा आमचे अशिल सदर मिळकतीबाबत कोणाची कसलीही तक्रार नाही असे समजुन कायमखुष खरेदी विकीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही कोणाची कसलीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता.१०/०१/२०२५

**सही /-**
**अशिल**

**सही/-**
**(अशिलातर्फे ॲड)**
**ॲड.एस.एन.वाघ.**
**मोबाईल नं. ७८७५७१९९०९.**
**रा. सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर.**
**ऑफिस पत्ता :- चंद्रमाला, कुंभारगल्ली, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर.**

---

बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आझादी का अमृत महोत्सव
आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुळे सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

तर,

अधोस्वाक्षरी केलेले हे बँक ऑफ महाराष्ट्रचे सिक्युरिटायझेशन आणि फायनान्शिअल रिकन्ट्रक्शन अंतर्गत अधिकृत अधिकारी आहेत. मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, २००२ आणि कलमाच्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सह १३ वाचा, ०४.०९.२०२३ रोजी डिमांड नोटीस जारी करून खालील नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचा उल्लेख कर्जदार आणि जामीनदारांनी केला आहे. कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला नोटीस दिली जाते की खाली स्वाक्षरीने त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे ०७.०१.२०२५ रोजी सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, २००२ च्या नियम ८ सह वाचलेल्या अधिनियमाच्या कलम १३ च्या उप कलम (४) अंतर्गत विशेषत: कर्जदाराला आणि सामान्यत: जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि त्यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. येथे नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असतील. कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे. सुरक्षित मालमत्ता.

| अ. क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| १ | **शाखा- जुळे सोलापूर**<br>**कर्जदार -**<br>**१. विजयकुमार राजेंद्र कंदळे.**<br>पत्ता:-अनिरुद्ध वासुदेव गल्ली इमारत. तुळजापूर-४१३६०१.<br>**२. सौ.जयश्री विजयकुमार कंदळे.**<br>पत्ता:-अनिरुद्ध वासुदेव गल्ली इमारत. तुळजापूर-४१३६०१ | **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन**<br>१. फ्लॅट क्रमांक ६०४, सहावा मजला श्री मारुती पॅलेस ॥ अपार्टमेंट<br>भूखंड क्रमांक २, सीटीएस क्रमांक १२१/२/१ जुना सर्व्हे क्र. ३२३/२/१ इंडियन मॉडेल स्कूल समोर जुळे सोलापूर ४१३००४<br>**श्री विजयकुमार राजेंद्र यांच्या मालकीचे कंदळे.**<br>**सौ.जयश्री विजयकुमार कानडाळे**<br>**चतुसिमा-**<br>पूर्वेकडे किंवा दिशेने: फ्लॅटची सीमा<br>पश्चिमेकडे किंवा दिशेने: रस्ता<br>दक्षिणेकडे किंवा दिशेने: सपाटची सीमा<br>वर किंवा उत्तरेकडे: फ्लॅट क्रमांक ६०३ | **मागणी सूचना:**<br>दि.०४.०९.२०२३<br>रु.३२,९०,७४०.००/-<br>अधिक लागू न केलेले व्याज ०४.०९.२०२३ पासून च्या प्राप्तीपर्यंत कर्ज<br>**प्रत्यक्ष ताबा**<br>**तारीख : ०७.०१.२०२५** |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - ०७/०१/२०२५**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

---

## जाहीर समन्स प्रसिध्दीकरण

**आर.टी.एस नं.२०/२०२४**

### कुर्डूवाडी येथील मे. उपविभागीय अधिकारी सो यांचे कोर्टात

श्री. अशोक जगन्नाथ खाडे ---अपेलंट
विरूद्ध
श्री. बलभीम सुर्यभान खाडे वगैरे --- रिस्पॉंडट

ज्याअर्थी यातील अपेलंट यांनी प्रस्तुचे अपील हे या न्यायालयात रिस्पॉइंट यांचे विरुध्द नोंदीबाबत दाखल केलेले आहे. त्याअर्थी मे कोर्टाने काढलेले समन्स हे रिस्पॉंडट नं.१ ते २ यांना पाठविणेत आलेले होते. परंतु रिस्पॉंडट नं.१ ते २ पैकी रिस्पॉउंट नं.१ हे मे. कोर्टाचे समन्स घेणेस जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत आहेत. सदरचे समन्स मे कोर्टात न बजावता परत आले आहे. त्यामुळे सदर रिस्पॉंडट यांना समन्सची बजावणी होत नाही. सबब त्याअर्थी यातील खालील रिस्पॉंडट नं.१ श्री. बलभीम सुर्यभान खाडे रा. गल्ली नं.१४, चेंबुर, मुंबई, यांना या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविणेत येते की, मे. कोर्टाने नेमलेली तारीख २१/०१/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता अपिलाचे कामी कागदपत्रासह स्वतः अगर विधीज्ञामार्फत हजर होवून अपिलास आपले म्हणणे मांडावे अन्यथा प्रस्तुत अपीलाचे कामी तुम्हास काही एक सांगावाचे नाही, असे गृहीत धरुन अपीलाची सुनावणी तुमचे अनुपस्थितीमध्ये केली जाईल. यांची नोंद घ्यावी

सदरचे प्रसिध्दीकरण आज दिनांक ११/०१/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी व सहीनिशी दिले.

**सही/-**
**लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही**
**उपविभागीय**
**अधिकारी सो माढा विभाग कुडूवाडी**

---

## जाहीर प्रकटन

### तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय (दंडणीय विभाग)

**जा.क्र.२०२४/दंडणीय/कावि-** **दिनांक ०६/०१/२०२५**

समस्त गावकरी मौजे हिप्परगाराव ता. उमरगा जिल्हा धाराशिव यांना कळविण्यात येते की,या कार्यालयात श्री सतीश चंद्रकांत गुंजले रा.हिप्परगाराव ता. उमरगा जि.धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे. जन्म झालेल्याचे नाव परशुराम सतीश गुंजले दरील व्यक्तीचा मौजे हिप्परगाराव ता. उमरगा या ठिकाणी दि. ०१/०५/२०१० या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक ०२/०१/२०२५ या रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म/मृत्यू बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार**

---

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ४१५/२०२४

**१. मुश्ताक रज्जाक बागवान** **-- अर्जदार**
रा. बागवान गल्ली, करकंब सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील वृक्षाली शं वाघमारे)
**विरुध्द**
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी** **-- गैरअर्जदार**
**तथामुख्याधिकारी न. प. बार्शी**

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची मुलगी जुवेरिया मुश्ताक बागवान, रा. बागवान गल्ली, करकंब सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी आजोळी या ठिकाणी दिनांक २७ ऑगस्ट २००८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी जुवेरिया मुश्ताक बागवान यांचा दिनांक २७ ऑगस्ट २००८ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी आजोळी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ७ जानेवरी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**कोर्टाचा शिक्का**

**सही**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**बार्शी**

---

**मध्य रेल्वे**

एअर ब्रेक सिस्टीमच्या सर्व सबसॅम्ब्लीजचे विघटन आणि माउंटिंग

खुल्या निविदा सूचना क्रमांक MECH-KWV-PO-B-DM² Dt-07.01.2025

**कामाचे नाव** : १२ महिन्यांच्या कालावधीसाठी कुर्डुवाडी कार्यशाळेच्या परिसरात विविध प्रकारच्या वॅगनच्या एअर ब्रेक सिस्टीमच्या सर्व उप-असेंबलींचे विघटन आणि माउंटिंग. १२०० वॅगन. **अंदाजे किंमत:** रु.१८,४२,२३८/- **निविदा फॉर्मची किंमत** : Nil **EMD:** रु.३६,९००/- **पूर्ण करण्याचा कालावधी** : १२ महिने. **वरील ई-निविदा सादर करण्याची वेळ आणि तारीख ३०.०१.२०२५ रोजी १२.०० वाजेपर्यंत असेल.** ई-निविदेचा संपूर्ण तपशील रेल्वेच्या अधिकृत वेबसाईट http://www.Ireps.gov.in वर उपलब्ध आहे.

Apex-679 D.CME(WS)/KWV

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

---

## जाहीर प्रकटन

### तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय (दंडणीय विभाग)

**जा.क्र.२०२४/दंडणीय/कावि-** **दिनांक १०/०१/२०२५**

समस्त गावकरी मौजे थोरलीवाडी ता. उमरगा जिल्हा धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात श्री राम पापु खवडे रा. थोरलीवाडी ता. उमरगा जि. धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव : राम पापु खवडे (स्वतः)

वरिल व्यक्तीचा मौजे थोरलीवाडी ता. उमरगा जि. धाराशिव या ठिकाणी दि. १३/०१/१९९१ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक ०२/०१/२०२५ या रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म / मृत्यू बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार**

---

## SRM E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

| Sr. No. | RFX No. | Name of work | Tender No. | Estimated Cost EMD Rs. | Tender Fee Rs. | Work completion period | Date of Tender Submission | Date of Technical Bid opening |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **7000034836** | Construction of Extension Control Room at 132/33KV S/Stn **Karjagi**, Dist: Solapur **(2nd Call)** | **T-18/ 2024-25** | Rs. 24,03,034.00 Rs. 24,030.34 | (500 + GST) | 04 Months | 10.01.2025 (11:00 Hrs) up to 24.01.2025 (11:00 Hrs). | 24.01.2025 (11:00 Hrs). (If possible) |
| 2 | **7000034837** | Construction of fire safety wall between transformers and allied maintenance works at 132 kV **Velapur,** Dist Solapur. **(3rd Call)** | **T-19/ 2024-25** | Rs. 22,56,665.00 Rs. 22,566.65 | (500 + GST) | 04 Months | 10.01.2025 (11:00 Hrs) up to 24.01.2025 (11:00 Hrs). | 24.01.2025 (11:00 Hrs). (If possible) |
| 3 | **7000034838** | Conversion of existing class-II quarter ground floor two tenements in to rest room cum recreation room at 220 kV S/Stn **Bale,** Dist.-Solapur **(2nd Call)** | **T-20/ 2024-25** | Rs. 20,30,717.00 Rs. 20,307.17 | (500 + GST) | 04 Months | 10.01.2025 (11:00 Hrs) up to 24.01.2025 (11:00 Hrs). | 24.01.2025 (11:00 Hrs). (If possible) |

For further details visit out website https://srmetender.mahatransco.in/
**Note :-** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal. (https://srmetender.mahatransco.in). **Executive Engineer (Civil), EHV, CCCM Division, Solapur**

---

## जाहीर समन्स

### मा. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा)

**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बॅक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**
१३३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बैंक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर
**शरद नागरी सहकारी बँक लि., सोलापूर.** -- अर्जदार
२१८/२१९ ब. गोल्ड फिंच पेठ, लकी चौक, सोलापूर
विरुध्द
(खालील तपशिलातील नमूद केलेले थकबाकीदार सभासद) -- जाब देणार

| अ. क्र | केस नं. | दावा रक्कम | जाब देणार क्र | जाब देणार नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ७०९/२४-२५ | १,३०,३२६/- | १ | अमन ट्रेडर्स प्रोप्रा. बसरी सोहेल बशीर अहम्मद रा A-१३०, मजिद, विडी घरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर. |
| | | | २ | शेख रुखसाना इब्राहीम रा. A- १९९, हैद्राबाद रोड, विडी घरकुल, निमगावन, सोलापूर. |
| २ | ७१३/२४-२५ | १,१८,८४६/- | ३ | काळे महादेव विश्वानाथ रा. प्लॉट नं ३४, कुमारस्वामी नगर, शेळगी, सोलापूर. |
| | | | ४ | सुरवसे सुनिता संजय रा. ४८ मित्र नगर, हनुमान मंदीर जवळ, शेळगी, सोलापूर. |
| | | | ५ | मसळे संतोष शिवशंकर रा. ११३०, उत्तर कसबा, सोलापूर, |
| ३ | ७१०/२४-२५ | १,२६,७२२/- | १ | कोळी रविकिरण शिवाजी रा. मु.पो. ११८ सलगर बुद्रुक, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर, |
| | | | २ | रोडगे सुभाष पुंडलिक रा.मु.पो. कामती जवळ, शिक्षक कॉलनी, ता. मोहोळ, जि. सोलापूर, |
| | | | ३ | पाटील अजित भागवत रा. मु.पो. २९७, ब्रम्हपुरी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर. |
| ४ | ७१२/२४-२५ | १,०४,१२४/- | ३ | पवार अनिल दगडू रा. मु.पो. वडाळा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर. |
| | | | ४ | सोंडगे किसन संदीपान रा. मु.पो. वडाळा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर. |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दीष्ट **अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार शुक्रवार दि. २४/०१/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रांसह या कार्यालयात हजर राहावे.**

या नोटिसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनवणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल

**आज दिनांक १० /०१/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.**

**शिक्का**

**सही/-**
**उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बॅंक्स् को. ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

---

SJSB Multi-State Scheduled Coop.Bank
# सोलापूर जनता सहकारी बँक लि.
**मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक**
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com वेबसाईट : www.sjsbbank.com

शेड्युल्ड - ४(२)

## जाहीर लिलाव

ज्या अर्थी बँकेने आपल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माध्यमाद्वारे सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेटस् ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (SRFESI) च्या कलम १३ (४) अंतर्गत वसुलीसाठी कर्जदार व जामीनदार यांच्या खालील तपशीलातील तारण मालमत्तेचा पुढील नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार विक्रीसाठी बंद पाकिटात (बयाणा रकमेसह) निविदा/प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

**विक्रीच्या अटी व शर्ती :**

१) निविदा ही बयाणा रकमेसहीत बंद पाकिटात प्राधिकृत अधिकारी, सोलापूर जनता सहकारी बँक लि. यांचे नावाने जमा करावी. २) राखीव किंमतीपेक्षा कमी रक्कम आणि / किंवा कमी बयाणा रकमेची कोणतीही निविदा विचारात घेतली जाणार नाही. ३) शेड्युल मध्ये नमूद केल्यानुसार बयाणा रकमेचा डिमांड ड्राफ्ट / पे ऑर्डर / RTGS / NEFT लिलावात सहभागी होण्यासाठी Authorized Officer, Solapur Janata Sahakari Bank Ltd. यांच्या नावे काढलेली असावी. ४) यशस्वी खरेदीदार म्हणून जाहीर झालेल्या व्यक्तीस तसे जाहीर झाल्याबरोबर विक्री किंमतीच्या २५% रक्कम (पंचवीस टक्के) त्यातून बयाणा रकमेपोटी भरलेली रक्कम वजा करून डीडी, पे-ऑर्डर किंवा RTGS/ NEFT द्वारे लगेच भरावी लागेल व उर्वरित रक्कम बँकेद्वारे विक्रीची निश्चिती मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात किंवा बँकेने दिलेल्या मुदतवाढीच्या तारखेच्या आत भरावी लागेल. ५) विक्री 'जसे आहे, जेथे आहे व आधार विरहीत' तत्वावर केली जात आहे. ६) इतर अटी शर्ती लिलावाच्या वेळी वाचून दाखविण्यात येतील.

**शेड्यूलमधील मालमत्तेची विक्री बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे खालील निर्धारित तपशिलानुसार जाहीर लिलावाद्वारे केली जाईल.**

| मालमत्ता पाहणी तारीख व वेळ | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ | मालमत्ता लिलाव / विक्रीची तारखी व वेळ | लिलाव / विक्रीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| दि. २४/०१/२०२५ पर्यंत स.११.०० ते दु. ३.००. | दि.२४/०१/२०२५ स.११.०० वाजेपर्यंत | दि. २७/०१/२०२५ दु. १.०० वाजता | **सोलापूर जनता सहकारी बँक लि. बार्शी मेन शाखा. बार्शी जि. सोलापूर.** |

| शाखा, कर्जदार व जामीनदार यांचे नाव, नोटीस तारीख व तारण मालमत्ता | |
|---|---|
| **शाखा - बार्शी - कोठारी एजन्सीज- भागीदारी फर्म**<br>भागीदार-१) श्री. जयेश किशोर कोठारी २) श्री. जिग्नेश जयेश कोठारी<br>१३(२) - दि ०४/०३/२०२३ १३(४)- दि. १७/०६/२०२३<br>सीसीएच कर्ज रु.३,५३,०२,६६९.०० + मुदत कर्ज रु.१,५४,८९,३४५=००<br>एकूण रक्कम रु.५,०७,९२,०१४ + दि. ०१/०१/२०२५ पासूनचे व्याज व इतर खर्च | जामीनदार - १) श्री. जयेश किशोर कोठारी २) श्री. जिग्नेश जयेश कोठारी ३) श्री. धर्मील दीपक कोठारी ४) रेणुका रमेश कोठारी (मयत) वारसदार-अ) कुमार रमेश कोठारी (मयत) वारसदार-अ) पूजा कुमार कोठारी ब) सोहम कुमार कोठारी क) प्रथम कुमार कोठारी ब) दिपक रमेश कोठारी (मयत) वारसदार धर्मील दीपक कोठारी<br>५) श्री. कुमार रमेश कोठारी (मयत) वारसदार-अ) पूजा कुमार कोठारी<br>ब) सोहम कुमार कोठारी क) प्रथम कुमार कोठारी |
| **शाखा - बार्शी - क्रिएटीव्ह नेटवर्क प्रोप्रा. श्री. विनीत अतुल कोठारी**<br>१३(२) - दि २१/०३/२०२३ १३(४)- दि. १७/०६/२०२३<br>रु. २,८४,००,०६८-०० + दि.०१/०१/२०२५ पासूनचे व्याज व इतर खर्च | जामीनदार-१) जयेश किशोर कोठारी २) धर्मील दीपक कोठारी ३) कुमार रमेश कोठारी (मयत) वारसदार-अ) पूजा कुमार कोठारी- ब) सोहम कुमार कोठारी क) प्रथम कुमार कोठारी- |

| | |
|---|---|
| **कोठारी एजन्सीज- भागीदारी फर्म व क्रिएटीव्ह नेटवर्क प्रोप्रा. श्री. विनीत अतुल कोठारी तारण मालमत्ता तपशील** २) रेणुका रमेश कोठारी, कुमार रमेश कोठारी व धर्मील दीपक कोठारी यांच्या मालकीची जिल्हा व उपजिल्हा सोलापूर, ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील म्यू पल हद्दीतील मिळकत सि.स.नं.३८९५/१अ/१/६, याचे एकूण क्षेत्र ४४१.४ चौ.मी. पैकी क्षेत्र ४३४.१० चौ.मी. यावर सध्या असलेले बांधकामासह याच्या चतुःसीमा पुढीलप्रमाणे -<br>पूर्वेस - शहा यांचे मालकीची जागा दक्षिणेस चेडा यांची जागा पश्चिमेस गव्हाणे यांची जागा उत्तरेस - सि.स.नं.३८९५/१ब | राखीव किंमत<br>४,२२,,३७,०००/-<br>बयाणा रक्कम<br>४,२५,०००/- |

| | |
|---|---|
| बँकेस ज्ञात असलेल्या बोजाचा तपशील | - नाही |
| मालमत्तेबाबत कोणताही दावा कोणी केला असल्यास किंवा त्या स्वरूपाचा व मूल्याचा कोणताही अन्य ज्ञात तपशील | - नाही |

**दिनांक : १०/०१/२०२५**
**ठिकाण : सोलापूर**
(टीप : स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य)

**शिक्का**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टी स्टेट शेड्युल्ड को ऑप बँक)**

---

## SHRI MAHAVIR URBAN CO OP BANK LTD., SOLAPUR

Head Office: 60/61, East Mangalwar Peth, Solapur 413002
PH: (0217) 2622933/44

**DEMAND NOTICE UNDER SECTION 13(2) OF SARFAESI ACT 2002**

Whereas you the below mentioned Borrower, Guarantor's and Mortgagors have availed loan from Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur, by mortgaging your immovable properties. Consequent to default committed by you all, your loan account has been classified as Non Performing Asset, whereas Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur being a secured creditor under the Act, and in exercise of the powers conferred under section 13(2) of the said Act read with rule 2 of Security Interest (Enforcement) Rules 2002, issued Demand Notice calling upon the Borrowers/Guarantor's/ Mortgagors as mentioned in column No.2 to repay the amount mentioned in the notices with future interest thereon within 60 days from the date of the notice, but the notice of Guarantor No.2 has been returned unserved for some reason thus this notice as below.

| Sr. No. | Name of Borrower/ Guarantor/ Mortgagor | Loan Account No. & Loan Amount | Details of the Security to be enforced | Date of NPA & Demand Notice date | Amount Due in Rs. as on 31/12/2024 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Borrower :**<br>**Gangadhar Bhimashankar Dhangapure**<br>**Prop: Gangadhar Bhimashankar Dhangapure**<br>**R/o:** 102/C/75 B/2, Bhavani Peth, Solapur 413002<br>**Guarantor :**<br>**1) Avinash Manohar Bansode**<br>**R/o:** 35, Mantri Chandak Angan, Hydrabad Road, Solapur 413006<br>**2) Nagesh Basvant Mhetre**<br>**R/o:** B-113, Mantri Chandak Angan, Hydrabad Road, Solapur 413006<br>**3) Sangameshwar Sidram Kalshetti**<br>**R/o:** 4,5,6, Saggam Nagar, Mulegaon Road, Solapur 413006 | **Loan Account No.**<br>0040032170000022<br>**Loan Amount (Rs.)**<br>30,00,000/-<br>(Rs. Thirty Lakh only) | All that pieces of Non Agri land and building situated within District and Sub district Solapur, Taluka.North Solapur, within limits of Solapur Municipal Corporation, Adjacent to the border of Shelagi, at Ravivar peth, T. P. Scheme No.2 Final Plot No. 92A/2/3/16 its Total admeasuring area 241.9 Sq. Mt. having boundaries as follows East: Road, West: Open Space, North: Plot No. 15, South: Open Space | **Date of NPA:**<br>30/06/2019<br>**Demand Notice Date:**<br>02/01/2025 | **Rs. 66,20,163.09**<br>(Rs. Sixty Six Lakh Twenty Thousand One Hundred Sixty Three and Paise Nine Only) Plus future interest and other expenses thereon |

Notice is therefore given to the Borrower/Guarantor & Mortgagor as mentioned in Column No.2, calling upon them to make payment of the aggregate amount as shown in column No.6, against the respective Borrower within 60 days of Publication of this notice as the said amount is found payable in relation to the respective loan account as on the date shown in Column No.6. It is made clear that if the aggregate amount together with future interest and other amounts which may become payable till the date of payment is not paid, Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur shall be constrained to take appropriate action for enforcement of security interest upon properties as described in Column No.4. Please note that this publication is made without prejudice to such rights and remedies as are available to Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur against the Borrower/ Guarantor's/ Mortgagors of the said financials under the law, you are further requested to note that as per section 13(13) of the said act, you are restrained/ prohibited from disposing of or dealing with the above security or transferring by way of sale, lease or otherwise of the secured asset without prior consent of Secured Creditor.

**Date: 10/01/2025**
**Place: Solapur**

**Seal**

**Sd/-**
**Authorised Officer**
**Shri. Mahavir Urban Co op Bank Ltd., Solapur**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### सात्त्विक-चिराग उपांत्य फेरीत



**क्वालालम्पूर :** भारतीय पुरुष दुहेरी जोडी सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टीने येथे सुरू असलेल्या मलेशिया ओपन बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेत उपांत्य फेरीत धडक मारली आहे. या भारतीय जोडीने मलेशियाच्या आँग येव सिन व तेओ ई यी या जोडीवर सरळ गेममध्ये २६-२४, २१-१५ असा विजय नोंदविला. भारतीय खेळाडूंनी सुरेख ताळमेळ साधत या सामन्यात आपले वर्चस्व गाजवले. या वर्षाची चांगली सुरुवात झाली. यापेक्षा चांगली सुरुवात करता आली नसती. आम्हाला स्पर्धेत शक्य तितके खोलवर जायचे आहे, असे सात्त्विक-चिराग म्हणाला. उपांत्य फेरीत सात्त्विक-चिरागला दक्षिण कोरियाच्या किम वॉन-हो व सिओ सेऊंग-जाई या बलाढ्य जोडीविरुद्ध झुंज द्यावी लागणार आहे.

### ‘प्रतिनिधी क्रिकेट’मधून वरुण ॲरोन निवृत्त

**नवी दिल्ली :** दुखापतींनी ग्रस्त असलेला भारताचा वेगवान गोलंदाज वरुण



ॲरोनने शुक्रवारी ‘प्रतिनिधी क्रिकेट’मधून निवृत्ती जाहीर केली. वरुणचा गृहराज्य झारखंड संघाचा विजय हजारे चषकामध्ये पराभव झाल्यामुळे त्याने हा निर्णय घेतला. २०११ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या ३५ वर्षीय गोलंदाज वरुणने भारतासाठी ९ वन-डे व ९ कसोटी सामने खेळले. गेल्या वर्षी त्याने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. गत २० वर्षांपासून मी जलद गोलंदाज म्हणून खेळलो व भरभराटीला आलो आहे. आज प्रचंड कृतज्ञतेने मी अधिकृतपणे प्रतिनिधित्व क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करतो, असे वरुणने आपल्या इंस्टाग्राम अकाऊन्टवर पोस्ट केले. वेगवान गोलंदाजी हे माझे पहिले प्रेम आहे आणि जरी मी मैदानाबाहेर पडलो तरी ते नेहमीच माझ्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग असेल, असे तो म्हणाला.

### बंगळुरू एफसी मोहम्मेडन क्लबला रोखण्यास उत्सुक

**बंगळुरू :** इंडियन सुपर लीग (आयएसएल) २०२४-२५ मध्ये शनिवारी श्री कांतीरवा स्टेडियमवर बंगळुरू एफसी आणि मोहम्मदन एससी यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. या हंगामाच्या सुरुवातीला परतीच्या सामन्यात बंगळुरूने २-१ असा विजय मिळवला होता आणि आता पुन्हा बंगळुरूला मोहम्मेडन क्लबवर विजय नोंदवण्याची संधी आहे. तिकडे, मोहम्मदन एससीला साखळी फेरीतील आपल्या पाच सामन्यांचा गोलरहित प्रवास संपवण्याची ही संधी आहे. ही आयएसएलच्या इतिहासातील संयुक्त तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी मालिका आहे. बंगळुरू एफसी सध्या १४ सामन्यांत २७ गुणांसह साखळी फेरीच्या गुणतालिकेत दुसऱ्या क्रमांकावर आहे. दुसरीकडे, मोहम्मदन एससी १४ सामन्यांत केवळ ७ गुणांसह टेबलमध्ये तळाच्या स्थानी आहे आणि या हंगामात केवळ पाच गोल केल्यामुळे त्यांना गोल करण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

### जिल्हा पावर लिफ्टिंग निवड चाचणी स्पर्धा उद्या

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**



छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज आणि सोलापूर जिल्हा पावर लिफ्टिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार १२ जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजता छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजमध्ये जिल्हा स्पर्धा होईल. ही स्पर्धा सब ज्युनिअर १८, ज्युनियर २३, सीनियर ४० वयोगट आणि वरिष्ठ नागरिक ४० वर्षेवरील वयोगटात होणार आहे. यातून राज्य स्पर्धेसाठी निवड होणार आहे. इच्छुक खेळाडूंनी आधारकार्ड सह छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज येथे रविवार दिनांक १२ जानेवारी रोजी सकाळी ९पूर्वी सचिव प्रा.संतोष गवळी यांच्याशी संपर्क साधावा, स्पर्धाप्रमुख प्राचार्य डॉ. मधुकर पवार यांनी कळविले आहे

# भारतीय महिला संघाची विजयी सलामी

### पहिल्या वन-डे सामन्यात आयर्लण्डवर मात

◆ **राजकोट, १० जानेवारी**

शुक्रवारी येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात प्रतीका रावल व तेजल हसबनीसने झळकावलेल्या प्रत्येकी अर्धशतकांच्या बळावर भारतीय महिला संघाने अनुभवहीन आयर्लण्डवर ९३ चेंडू शिल्लक ठेवत ६ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयाबरोबरच भारताने तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.



फटकेबाजी करताना प्रतीका रावल

आयर्लण्ड संघाची कर्णधार गॅबी लुईसने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गॅबी लुईसने केलेल्या ९२ धावांची धडाकेबाज खेळी व लेह पॉलने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या आधारावर आयर्लण्डने मर्यादित ५० षटकांत ७ बाद २३८ धावा उभारल्या आणि भारतासमोर विजयासाठी २३९ धावा काढण्याचे आव्हान ठेवले. भारताने अवघ्या ३४.३ षटकांत ४ बाद २४१ धावा काढून आपला विजय साकार केला.

भारताला विजय मिळवून देताना सलामीवीर स्मृती मंधानाने ४१ धावांचे योगदान दिले, तर तिची सहकारी प्रतीका रावलने कारकिर्दीतील सर्वोत्तम ८९ धावांची खेळी केली. प्रतीकाने ९६ चेंडूंत १० चौकार व एका षट्कारसह ८९ धावा ठोकल्या. ऑक्टोबर २०२४ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध शेवटचा वन-डे सामना खेळणाऱ्या तेजल हसबनीसने पुनरागमनात पहिले अर्धशतक झळकावले. ती ४६ चेंडूत ९ चौकारांसह ५३ धावांवर नाबाद राहिली.

रावल व हसबनीसने ८४ चेंडूत ११६ धावांची सामना जिंकणारी भागीदारी केली आणि भारताने ९३ चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला.

वेस्ट इंडीज मालिकेतील आपला प्रभावी फॉर्म कायम राखत स्मृती मंधानाने २९ चेंडूत ६ चौकार व एका षट्कारासह ४१ धावा करत संघाला एक शानदार सुरुवात करून दिली. या प्रक्रियेत ४,००० वन-डे धावा ओलांडणारी ती दुसरी भारतीय आणि एकूण १५ वी खेळाडू ठरली. हरलीन देओल (२०) व जेमिमाह रॉड्रिग्ज (९) सुरुवातीला चांगल्या खेळल्या, परंतु डावखुरा फिरकीपटू एमी मॅग्वायरने आपल्या चतुरस्त्र गोलंदाजीने भारताची गती तात्पुरती रोखली. या टप्प्यात भारताने ४६ धावांत तीन विकेट गमावल्या. त्याआधी, भारताने आयर्लण्डला आपल्या दयनीय क्षेत्ररक्षणाने धावा गोळा करण्याची संधी दिली. पाहुण्या संघाची कर्णधार गॅबी लुईसने ९२ धावा केल्या व संघाला ७ बाद २३८ धावांपर्यंत सन्मानजनक मजल मारून दिली.

आयर्लण्ड १४ व्या षटकांत ४ बाद ५६ धावा अशा गंभीर संकटात सापडला होता, परंतु लुईस व लीआ पॉलने पाचव्या गड्यासाठी ११७ धावांची भागीदारी केली. लुईसने १२९ चेंडूत १५ चौकारांसह ९२ धावांचे, तर लीआ पॉलने ७३ चेंडूत ७ चौकारांसह ५९ धावांचे योगदान दिले. ◂(वृत्तसंस्था)

# १५ जानेवारीला क्रीडा दिननिमित्त आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार

### निमित्त ऑलिम्पिकवीर खाशाबांचा जन्मदिन : क्रीडा कार्यालयाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१० जानेवारी-**



दि. १५ जानेवारी हा दिवस ऑलिम्पिकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. दिवंगत खाशाबा जाधव यांनी ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा हेलसिंकी १९५२ मध्ये वैयक्तीक क्रीडा प्रकारातील कुस्ती क्रीडा प्रकारात पहिले पदक (कास्य) पटकावून देशाच्या क्रीडा क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केलेली आहे.

त्यांची आतंरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरी राज्याला बहुमान तसेच नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन १५ जानेवारी हा राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. याकरीता जिल्ह्यात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

**शहर कुस्ती स्पर्धा १३ जानेवारीला; व्याख्यान १४ जानेवारीला**

जिल्ह्यातील कुस्ती खेळाचे सर्व माजी महाराष्ट्र केसरी, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू यांचा सत्कार तसेच सोलापूर शहर तालीम संघद्वारा सोलापूर शहर महाराष्ट्र केसरी गादी व माती विभाग निवड चाचणी कुस्ती स्पर्धेचे सायंकाळी १३ जानेवारीला ५ वाजता सिध्देश्वर आखाडा, किल्ला बाग येथे आयोजन करण्यात आले आहे. दि १४ जानेवारी रोजी ऑलम्पिक वीर स्व. खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व त्यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान या विषयांवर सायंकाळी ४ वाजता श्रीकृष्ण कुस्ती केंद्र, सोलापूर येथे व्याख्यान आयोजित केले आहे.दि. १५ जानेवारी रोजी ऑलिंपिक दौड व रॅली तसेच जिल्ह्यातील सर्व शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडू यांचा गौरव व सत्कार सकाळी ७ वाजता शासकीय मैदान नेहरूनगर, विजापूर रोड, सोलापूर. येथे करण्यात येणार आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार करण्यात येणार असून त्यांनी कार्यालयीन वेळेत जाऊन आपली नांवे दिनांक १४ जानेवारी पर्यंत नोंदविण्यात यावीत अधिक माहितीसाठी मैदानी राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार (भ्रमणध्वनी ९९७००९५३१५) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केलेले आहे.

# रामदास नरसय्या इप्पाकायल शाळेचे आट्यापाटया स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर क्रीडा अधिकारी कार्यालय घेण्यात आलेल्या शहर आट्यापाटया स्पर्धेत पद्मशाली शिक्षण संस्था संचलित रामदास नरसय्या इप्पाकायल प्राथमिक शाळेचे विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावर निवड झाली आहे.

अंडर १४ मुली द्वितीय क्रमांक अंडर-१९ मुले द्वितीय क्रमांक पटकवला सदर विद्यार्थ्यांचे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या खेळाडूना शाळेचे मुख्याध्यापक नागेश सुभाष खुने व क्रीडा प्रशिक्षक लक्ष्मण चंदनशिवे यांचे म ार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे क्रीडा शिक्षकाचे शाळेचे मुख्याध्यापक नागेश सुभाष खुने, पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवासा क्यातम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी सचिव दशरथ गोप, सहसचिव श्री. मल्लिकार्जुन सरगम व खजिनदार



गोवर्धन कमटम व शालेय समितीचे अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली शाळेचे देणगीदार नरसय्या इप्पाकायल व पद्मशाली शिक्षण संस्थेचे विश्वस्त श्रीनिवास इप्पाकायल यांनी अभिनंदन केले.

# खेळामुळे मन व मेंदू बळकट राहतो : प्रा. कोळेकर

### दयानंद महाविद्यालयात क्रीडा महोत्सव

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

अभ्यासासोबत खेळाची सांगड घालणे गरजेचे आहे. त्यामुळे स्वास्थ चांगले राहते. खेळामुळे मन व मेंदू बळकट राहते, असे मार्गदर्शन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्राध्यापक तानाजी कोळेकर केले

दयानंद काशिनाथ आसावा प्रशालेच्या प्रांगणात क्रीडा



महोत्सवास उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी दयानंद कला शास्त्र महाविद्यालयचे शारीरिक संचालक डॉ. किरण चोकाककर, मुख्याध्यापक जितेंद्र पवार, पर्यवेक्षक संतोष हंपे उपस्थित होते. क्रीडाशिक्षिक मनीषा पाटील व प्रमोद कुनगूलवार यांनी क्रीडा महोत्सव यशस्वी करण्याकरिता परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास खवेकर यांनी केले.



# छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजची कामगिरी

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

पुण्यश्लोक आहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठातर्फे प्रतिनिधित्व करताना छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या खेळाडूने पश्चिम विभागीय आणि राष्ट्रीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली.

या खेळाडूंना प्रा. संतोष गवळी प्रा.सचिन गायकवाड. मारुती घोडके, माजी रायफल शूटिंग खेळाडू आलिशा आणि अविनाश गोसावी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहरपंत सपाटे, जनरल सेक्रेटरी प्रा. महेश माने, महादेव गवळी यांनी अभिनंदन केले.

**महाविद्यालयीन स्पर्धा कामगिरी : वैष्णवी कासट** (पिस्तोलमध्ये प्रथम, राष्ट्रीय पिस्तोल शूटिंग स्पर्धेसाठी निवड), **आर्यन कदम** (मलखाब स्पर्धेत प्रथम, राष्ट्रीय मलखांब स्पर्धेसाठी निवड), **अभिजीत गोरे** ( पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड), **हार्दिक लबडे** (६७ किलो गटात प्रथम, साऊथ वेस्ट झोन विद्यापीठ व राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड), **केतकी पाटील** (६४ किलो गटात प्रथम), **हर्षिता पठारे** (७१ किलो गटात प्रथम, पश्चिम दक्षिण आंतर विद्यापीठस्पर्धेत नववे आणि पंधरावे स्थान, राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड), **गौरी गुंड** (पश्चिम विभागीय अंतर विद्यापीठ टेनिस स्पर्धेत द्वितीय व राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम आठ संघात निवड, त्यामुळे राष्ट्रीय खेलो इंडियासाठी संघ पात्र.)

# अमरावती विभाग आघाडीवर

### राज्य आंतर विभागीय आंतर क्लब लॉन टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत राज्य स्तरीय आंतर विभागीय आंतर क्लब लॉन टेनिस स्पर्धेत पहिल्या दिवसअखेर अमरावती विभाग ५९ गुणासह आघाडीवर आहे.कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात या स्पर्धेचे उदघाटन चेन्नई व मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत मुख्य न्यायमूर्ती संजय गंगापुरवाला यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी डॉ विजय राघोजी, पंकज शहा, आशिष ढोले, दिलीप बच्चुवार, नेविल पीठावाला, शीतल भोसले, शिव मोरे, अमित गांधी आदी उपस्थित होते.



**पहिल्या दिवस अखेर विभाग निहाय गुणतालिका**

अमरावती:५९(२टाय),नाशिक:३९(२टाय) सोलापूर:३२(१टाय),संभाजीनगर:३२(१टाय) नागपूर : २७ (२ टाय). कोल्हापूर : ३३ (२ टाय).

# राष्ट्रीय फुटबॉल टेनिस स्पर्धेत श्री स्वामीनारायण गुरुकुल स्कूलची कामगिरी

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

कन्याकुमारी (तामिळनाडू) येथे झालेल्या राष्ट्रीय फुटबॉल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्र संघाने तृतीय क्रमांकाचा सांघिक चषक पटकाविला. यात श्री स्वामीनारायण गुरुकुल स्कूलच्या खेळाडूंचा समावेश होता.

आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र फुटबॉल टेनिस संघातून खेळताना श्री स्वामीनारायण गुरुकुल



इंटरनॅशनल स्कूलच्या खेळाडूंनी विविध गटातून खेळताना सुवर्ण,रौप्य व कांस्यपदक पटकाविले याबरोबरच संस्थेचे मुख्य आचार्य विश्व मंगलदास स्वामीजी, ब्रह्मस्वरूपदा स्वाम ीजी,मुख्याध्यापक संतोष कुमार अन्नम सर यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या विजयी खेळाडूंना फुटबॉल टेनिस प्रशिक्षक मनोज बाळगे सर क्रीडा शिक्षक राजेश येमुल सर यांचे मार्गदर्शन लाभले.

कामगिरी केलेले खेळाडू : साईचरण नल्ला, आराव कुत्कोंडा, चैतन्य बल्ला, आयुष बाराचारे, स्वरूप सपकाळ, आदित्य धोत्रीकर, पृथ्वीराज हनसुरे, हर्ष पुजारी, शशांक मळगे, भालचंद्र बत्तुल, विराज राठोड, प्रसन्न जमादार, अर्णव लांडगे, रेवन सिद्धेश्वर बिराजदार, अनमोल बाराचारे, ओजस्व बिराजदार, श्लोक कासार, साईराज महिंद्रकर, रक्षित हुंजे

# २०२२ च्या ऑस्ट्रेलियन ओपनपूर्वी विषबाधा झाली होती : जोकोविच

◆ **पॅरिस, १० जानेवारी**

२०२२ मध्ये मेलबर्नमध्ये काही काळासाठी ठेवण्यात आले असताना माझ्या जेवणात शिसे व पारा मिसळल्यामुळे मला विषबाधा झाली होती, असा दावा सर्बियाचा स्टार टेनिसपटू नोवाक जोकोविचने केला आहे.

त्यावेळी ऑस्ट्रेलियन ओपनच्या पूर्वसंध्येला माजी प्रथम विश्वमानांकित जोकोविचला हद्दपार करण्यात आले होते व त्याचा व्हिसा रद्द करण्यात आला होता. कोविड लसीकरण करण्यास नकार दिल्यामुळे त्याला अखेर देशाबाहेर काढण्यात आले होते. तो राहण्यासाठी निष्फळ कायदेशीर लढाई लढत असताना त्याला एका डिटेंशन हॉटेलमध्ये ठेवण्यात आले होते.

मला काही आरोग्य समस्या होत्या व मला जाणवले की मेलबर्नमधील त्या हॉटेलमध्ये मला विषबाधा करणारे काही अन्न



पत्रपरिषदेत बोलताना नोवाक जोकोविच

देण्यात आले होते, असे ३७ वर्षीय जोकोविचने एका दीर्घ मुलाखतीत सांगितले.

मी सर्बियाला परतल्यावर काही शोध लागले. मी हे कधीही सार्वजनिकरित्या कोणालाही सांगितले नाही, परंतु माझ्यात जड धातूचे प्रमाण खूप जास्त असल्याचे आढळले. यात शिसे आणि पाराचे प्रमाण खूप जास्त होते, असे त्याने सांगितले.

आम्ही गोपनीयतेच्या कारणास्तव वैयक्तिक प्रकरणांवर भाष्य करू शकत नाहीत, ऑस्ट्रेलियाच्या गृह विभागाच्या प्रवक्त्याने जोकोविचच्या विषबाधा प्रकरणी विचारले असता सांगितले.

ज्या पार्क हॉटेलमध्ये जोकोविचला ठेवण्यात आले होते त्या हॉटेलसोबतच्या भाडेपट्टा करारात कैद्यांसाठी ताजे शिजवलेले, वैयक्तिकरित्या वाटलेले लंच आणि डिनरची व्यवस्था होती, असे सरकारचे म्हणणे आहे.

सर्व केटरिंग कर्मचाऱ्यांनी पौष्टिक अन्न सुरक्षा प्रमाणपत्रे घेतली आहेत, असे त्यात म्हटले आहे.

जोकोविच रविवारी हंगामातील पहिली ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धा सुरू होत असताना ११ व्या ऑस्ट्रेलियन ओपन जेतेपदासाठी आणि विक्रमी २५ व्या ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपदासाठी लढणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

**ऑस्ट्रेलियन लोक माफी मागताय्**

२०२२ च्या वादानंतरही जोकोविच ऑस्ट्रेलियन लोकांबद्दल कोणताही राग बाळगत नाही, असेही तो म्हणाला. एका वर्षानंतर तो मेलबर्नला परतला व त्याने जेतेपद पटकावले. गत काही वर्षांत किंवा जगात इतरत्र मला भेटणारे बरेच ऑस्ट्रेलियन लोक माझ्याकडे आले आहेत आणि मला मिळालेल्या वागणुकीबद्दल माफी मागत आहेत कारण त्यांना त्यावेळी त्यांच्याच सरकारकडून लाज होती, असे तो म्हणाला.

मला वाटते की सरकार बदलले आहे व त्यांनी माझा व्हिसा पुन्हा सुरू केला आहे. मी त्याबद्दल खूप आभारी आहे, असे तो म्हणाला.

# कोको गॉफची ऑस्ट्रेलियन ओपनसाठी जय्यत तयारी

### सर्व्हिस व फोरहॅण्डवर घेतली मेहनत

◆ **मेलबर्न, १० जानेवारी**


अमेरिकेची युवा टेनिसपटू कोको गॉफने ऑस्ट्रेलियन ओपनच्या काही दिवस आधी चाहत्यांसमोर मजा व मदतनिधीसाठी रॉड लेव्हर एरिना येथे मिश्र दुहेरी टेनिसचे प्रदर्शन केले. या निमित्ताने तिने सर्व्हिस व फोरहॅण्डवर खूप मेहनत घेतली व प्रेक्षकांची वाहवा मिळविली.

२०२३ ची अमेरिकन ओपन विजेती कोको गॉफ व तिचा जोडीदार आंद्रे रुबलेव्हने हा प्रदर्शनी सामना खेळला. यात कोकोने चेंडू २०० किमी प्रतितास (१२५ मैल प्रति तास) वेगाने मारले.

कोको गॉफला शनिवार-रविवारपासून सुरू होणाऱ्या वर्षाच्या पहिल्या ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धेत मेलबर्न पार्क येथे दोन वेळा गतविजेत्या आर्यना सबालेन्काला आव्हान देण्यासाठी तयार असलेल्या काही महिलांपैकी एक मानले जाते.

मेलबर्नमध्ये कोकोचा पहिला प्रतिस्पर्धी आणखी एक अमेरिकन असेल. तिच्याकडे ग्रॅण्ड स्लॅम जेतेपद असून ति नाव आहे सोफिया केनिन. केनिन २०२० मध्ये ऑस्ट्रेलियन ओपनची विजेती होती आणि २०२३ मध्ये विम्बल्डनमध्ये पहिल्या फेरीत गॉफविरुद्ध विजेती होती.

नवीन प्रशिक्षक मॅट डेली यांच्या मार्गदर्शनाखाली २० वर्षीय कोकोने आपल्या फोरहॅण्डसाठी वापरल्या जाणाऱ्या ग्रिप समायोजित केल्या आणि सर्व्हिसमधील काही त्रुटी दूर



कोको गॉफ

केल्या आहेत.

नवीन प्रशिक्षकांनी माझ्या खेळात खूप फूटवर्क व शॉट सिलेक्शन आणले आहे. त्यांनी मला तांत्रिक बाजूंमध्ये मदत केली आहे. त्यांनी शक्य तितके सोपे संक्रमण केल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे, असे कोको गॉफ म्हणाली. माझ्या खेळात आत्मविश्वास वाढला आहे. मला शक्य तितक्या मोठ्या ट्रॉफी जिंकायच्या आहेत, असे ती शेवटी म्हणाली. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ट्रॅव्हल्ससह मोठ्या गाड्यांची शहरात राजरोस एंट्री

## वाहतुकीची कोंडी; व्यापाऱ्यांसह नागरिक, विद्यार्थ्यांमधून संताप

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि. १० जानेवारी-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहरातील विशेषतः वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर परिसर राजेफत्तेसिंह चौक जुना राजवाडा भारत गल्ली दावल बॅन्ड बुधवार पेठ समाधी मठ परिसर पालखी मार्ग अद्यापही रस्ते रुंदीकरण झालेले नाही. मात्र दिवसेंदिवस अक्कलकोट तीर्थक्षेत्री मोठ्या प्रमाणात भाविकांची व वाहनांची प्रचंड वर्दळ वाढली आहे. अशात मोठ्या गाड्या शहरात फिरत असल्याने वाहतूक कोंडी होत आहे.



अक्कलकोट शहरात रस्ते मुळात अरुंदच असल्याने ट्रॅव्हल्सच्या मोठ्या गाड्यांना शहरातून प्रवेश व मंदिर परिसरात वावर होत असल्याने भाविकांचा नागरिकाचा वावर असुरक्षित बनला आहे. रोजच मैंदर्गी रस्त्यावर चार-चार वाहतूक हवालदार एकही दिवस न चुकता पोलीस कर्तव्य बजावित आहेत. त्यांच्या कार्याचे कौतुक व्यक्त होत आहे. मात्र शहरातील वाहतुक कोंडी व मोठया ट्रॅव्हल्स गाड्याच्या प्रवेशावर नियंत्रण कोण ठेपणार असा प्रश्न भाविका तुन विचारला जात आहे.

दत्तजयंतीपासून अक्कलकोट उत्तर पोलीस वारंवार शहरातील मंदिर परिसरातील भाविकांची दर्शन रांग व्यवस्था कामी व्यस्त आहेत. सलगच्या बंदोबस्तामुळे व्हीआयपी बंदोबस्त, कोर्ट, मंत्री यांच्या बंदोबस्तामुळे पोलीसावर मोठा ताण आहे. पोलीस कर्मचारी संख्या कमी आहे. आहे त्या उपलब्ध पोलीस कर्मचारी संख्या वर शहरातील मंदिर परिसरातील वाहतुक नियंत्रण सुरळीत ठेवण्याची किमया वाहतुक पोलीसा कडून होत आहे. शहरामध्ये मंदिर परिसरात राजेफत्तेसिंह चौक परिसरात मोठया ट्रॅव्हल्स प्रवासी वाहनाकडे पोलीसांचे नजरअंदाज होत असल्यान वाहतुकीची कोंडी होत आहे. मोठ्या वाहनामुळे एखादा अपघात होण्याची, जीवीत हानी, मालमत्ता हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**अडथळा थांबवावा**

वाहतूक पोलीसांनी मैंदर्गी रस्त्यावर शहराबाहेर रोज न चुकता करण्यात येणारी वाहन तपासणीबरोबर शहरात येणाऱ्या-जाणाऱ्या मोठया ट्रॅव्हल्स वाहनाचा वाहतुकीला अडथळा होणार नाही. वाहतूक कोंडी होणार नाही याचीही दक्षता घ्यावी अशी भावना नागरिकातून व्यक्त होत आहे.

---

# पत्नी, सावत्र आई, मुलाचा खून; आरोपीला जन्मठेप

## सासू-सुनेच्या भांडणाचे कारण; कोरफळे येथे घडली होती घटना

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० जानेवारी-**

सासू-सुनेच्या भांडणाच्या रागाच्या भरात पत्नी, सावत्र आई, मुलांचा खून केल्याप्रकरणी कोरफळे येथील आरोपीला जन्म ठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे.



तालुक्यातील मौजे कोरफळे येथील आरोपी अनिरुद्ध व्यंकट बरडे याने त्याच्या घरी सतत होत असलेल्या बायको व सावत्र आईच्या भांडणाला कंटाळून दि. ९ फेब्रुवारी २०१७ रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास घरी झोपलेल्या सावत्र आई सखुबाई व मुलगा सुदर्शन यांना हातोड्याने मारुन जागीच ठार केले. त्याची पत्नी रेश्मा हिचे पोटात कुकरीने मारुन, कुकरी फिरवून बाहेर ओढून काढून गंभीर जखमी करुन तिच्या अंगावर रॉकेल टाकून काडीने पेटवून दिले. दवाखान्यात दाखल केल्यानंतर ती उपचारादरम्यान मयत झाली. तसेच मुलगा अविनाश व मुलगी प्रतीक्षा यांनाही कुकरीने मारुन जखमी केले. त्यानंतर स्वतःच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.

सरकार पक्षाच्यावतीने सदर गुन्हा शाबितीसाठी १६ साक्षीदार तपासण्यात आले. यातील आरोपीची बायको हिने दिलेला मृत्यूपूर्व जबाब, नेत्र साक्षीदार आरोपीची मुलगी, दुसरा मुलगा व डॉक्टर यांची साक्ष तसेच तपासी अंमलदार यांनी तपासादरम्यान गोळा केलेले परिस्थितीजन्य पुरावे हे सरकारी वकील श्रीमती राजश्री कदम, वकील प्रदीप बोचरे यांनी न्यायालयासमोर मांडले. सरकारी पक्षाचा पुराव्यांचा विचार करता बार्शीचे जिल्हा न्यायाधीश एल.एस चव्हाण यांनी आरोपी अनिरुद्ध व्यंकट बरडे (रा. कोरफळे, ता. बार्शी) यास भादंविक ३०२ अन्वये दोषी ठरवून जन्मठेप व एक लाख रुपये दंड, यातील दंड न भरल्यास एक वर्ष सश्रम कारावास, भादंविक ३०७ अन्वये दोषी ठरवून १० वर्ष शिक्षा व पन्नास हजार रुपये दंड, यातील दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावण्यात आली.

सरकार पक्षातर्फे राजश्री कदम यांनी कायदेशीर बाबीवर जोरदार युक्तिवाद केला व काम पाहिले. तसेच कोर्ट पैरवी म्हणून पोलीस हवालदार कुणाल पाटील, सपोफौ शशिकांत आळणे यांनी वेळोवेळी साक्षीदार, पुरावे हजर ठेवण्याचे काम पाहिले. सदर केसमध्ये जालिंदर नालकुल उपविभागीय पोलीस अधिकारी बार्शी कुंदन गावडे यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले.

### वडिलांची फिर्याद अन् पोलिसांचा तपास

याबाबत आरोपीचे वडील व्यंकट पंढरीनाथ बरडे यांनी आरोपी अनिरुद्ध व्यंकट बरडे याच्याविरुद्ध वैराग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. पुढील तपास तत्कालीन एपीआय मधुकर पवार, एपीआय राजकुमार केंद्रे व एपीआय रवींद्र खांडेकर यांनी करुन आरोपीविरुद्ध सबळ पुरावा गोळा करुन न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

---

# जालना येथील भाविकांकडून ७१ हजारांची देणगी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १० जानेवारी-**

विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास आर्या आदित्य अग्रवाल या भाविकांनी ७१ हजार रुपयांची देणगी दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.



संबंधित भाविकाचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी श्रीची प्रतिमा व उपरणे घेऊन यथोचित सन्मान केला. संबंधित भाविक हे जालना येथील रहिवाशी असून, आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी श्री क्षेत्र पंढरपूरला आले होते. त्यावेळी त्यांनी मंदिर समितीच्या कार्यालयास संपर्क करून सदरची देणगी दिली आहे. तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन संपूर्णतः निशुल्क आहे. श्रीच्या पदस्पर्श दर्शन अथवा मुखदर्शनासाठी कोणत्याही त्रयस्थ व्यक्ती, अधिकारी-कर्मचारी यांच्याशी संपर्क करू नये. श्रींच्या नित्यपूजा, पाद्यपूजा व तुळशी अर्चन पूजेसाठी व इतर अनुषंगिक माहितीसाठी मंदिर समितीच्या दूरध्वनीवर, अधिकृत संकेतस्थळ तसेच इंस्टाग्राम पेजला फॉलो करून भेट द्यावी. तसेच अधिक माहितीसाठी श्री संत तुकाराम भवन येथील जनसंपर्क कार्यालय व श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप येथील चौकशी कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन देखील यावेळी त्यांनी केले.

---



# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी सूरज देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १० जानेवारी-**

टेंभुर्णी येथील सूरज देशमुख यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षाच्या युवक जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. यशवंतराव चव्हाण सेंटर,मुंबई येथे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आ. अभिजीत पाटील व युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांच्या हस्ते निवडीचे पत्र देण्यात आले.

निवडीनंतर फटाके वाजवून नाना-भैय्या युवा मंचाच्या वतीने टेंभुर्णीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी गोरख देशमुख, सोमनाथ कदम, गणेश केचे, ग्रामपंचायत सदस्य वैभव महाडिक, शैलेश ओहोळ, अप्पासाहेब हवलदार, बिभीषण देशमुख, दिलीप केचे, हरिबा देशमुख, प्रताप देशमुख, गजेंद्र देशमुख, गणेशअप्पा देशमुख, दादासाहेब, सिध्देश्वर देशमुख, प्रशांत देशमुख, शुभम देशमुख, गणेश सरवदे, गायकवाड, विजय खरात, गणेश खरात, रत्नदिप अटकळे, अक्षय कांबळे, सुजल कांबळे, मयुर मुसळे, नितीन महाडिक, महाडिक, बिटू केचे, अजय ओहोळ उपस्थित होते.

---

# मारहाण केल्याप्रकणी आरोपींना एक वर्षे सक्तमजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १० जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील फिर्यादी पंडीत संगप्पा बंदीछोडे यास ९ जून २०१९ रोजी सकाळी ८.३० वा. सुमारास मारहाण केल्याबाबत प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एस. पी. पाटील यांनी आरोपीस शिक्षा व द्रव्य दंड ठोठावली आहे.

यात हकीकत अशी की, पंडीत संगप्पा बंदीछोडे हा त्याच्या मोटारसायकलवरुन मजुरी कामाकरीता अप्पाशा यांच्या घरासमोरुन जात होता. फिर्यादीचा मुलगा व अप्पाशा याचा नातू यांच्यामध्ये आधल्या दिवशी गोट्या खेळण्याच्या कारणावरुन झालेल्या वादातून अप्पाशा याने फिर्यादीशी मोटारसायकल थांबवून शिवीगाळ करुन त्याच्या हातातील काठी फिर्यादीच्या डोक्यात व दोन्ही हातावर मारहाण करुन जखमी केले. बोटाची करंगळी मोडली. फिर्यादीची पत्नी मीराबाई व मुलगा सचिन हे भांडण सोडविण्यास आले असता त्यांना व फिर्यादीस अप्पाशा त्याचा मुलगा मल्लिकार्जुन, पत्नी काशिबाई व चुलत भाऊ कल्लप्पा या सर्वांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर ८ जून २०१९ रोजी फिर्यादीने मंदुप पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. खासगी दवाखान्यात उपचार घेतले होते. पो.हे.कॉ. ११५९ एस.एम. बनसोडे यांने गुन्हयाचा तपास करुन खटला दाखल केला. यात सरकार पक्षाने ९ साक्षीदार तपासले असून सरकार अभियोक्त्याचे युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपींनी फिर्यादीस काठीने मारहाण केल्याबद्दल आरोपी आप्पासाहेब उर्फ आप्पाशा बंदीछोडे व मल्लिकार्जुन उर्फ कुमार बंदीछोडे यांना एक वर्ष सश्रम कारावास आणि प्रत्येकी रक्कम ५,५०० दंड व काशीबाई बंदीछोडे व कल्लप्पा बंदीछोडे यांना तीन महिने सश्रम कारावास आणि प्रत्येकी रक्कम ३,३०० द्रव्यदंडाची शिक्षा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी ठोठावली आहे. तसेच द्रव्यदंडाच्या रकमेपैकी १०,००० फिर्यादीस नुकसानभरपाई म्हणून देण्याचा आदेश न्यायालयाने केला आहे. या प्रकरणात कोर्ट पैरवी म्हणून विद्या कांबळे यांनी काम पाहिले. तसेच सरकारपक्षातर्फे अॅड. एस. एस. चिवरी यांनी काम पाहिले.

---

# राष्ट्रीय युवा सप्ताहानिमित्त खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० जानेवारी-**

भारत सरकार द्वारा, युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय अंतर्गत, नेहरु युवा केंद्र, सोलापूर व क्रांती बहुद्देशीय संस्था, बेलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद व राजामाता माँसाहेब जिजाऊ यांच्या जयंती (राष्ट्रीय युवा सप्ताह) निमित्त खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन संतोष गुळमिरे प्राथमिक व माध्यमिक विद्यामंदिर, बार्शी या ठिकाणी करण्यात आले आहे.




युवा वर्गामध्ये जनजागृती होण्यासाठी तसेच युवक व युवतींच्या कौशल्य गुणांना वाव देऊन प्रोत्साहन मिळण्यासाठी अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे नेहरु युवा केंद्र, सोलापूरचे युवा जिल्हाधिकारी अजितकुमार यांनी सांगितले. या स्पर्धा खुल्या गटात होणार असून, स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना अनुक्रमे प्रथम क्रमांक- रोख रक्कम ५०१ रुपये, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र, द्वितीय- रोख ३०० रुपये, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र, तृतीय रोख २०१ रुपये, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र, उत्तेजनार्थ रोख १०१ रुपये व सन्मानपत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. तरी स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविण्यासाठी स्पर्धा आयोजक धिरज शेळके यांच्या ९९२२९१४००९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

# पुत्रदा एकादशीनिमित्त पंढरीत भाविकांची मांदियाळी

## ● पदस्पर्श दर्शनासाठी सात तासांचा कालावधी; मुख दर्शनासाठी दीड तास लागले

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० जानेवारी-**

पौष शुक्ल एकादशी अर्थात पुत्रदा एकादशीनिमित्त पंढरपुरात हजारो भाविकांनी विठ्ठल दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. भाविकांच्या गर्दीमुळे विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शनासाठी किमान सहा ते सात तासांचा तर मुखदर्शनासाठी एक ते दीड तासाचा कालावधी लागत होता.



पुत्रदा एकादशी निमित्त शुक्रवारी (ता.१०) सकाळपासून विठ्ठल मंदिर परिसर, चंद्रभागा नदीचे वाळवंट, प्रदक्षिणामार्ग, महाद्वार, पश्चिमद्वारसह विठुरायाची पदस्पर्श आणि मुख दर्शन रांग ही भाविकांच्या गर्दीने फुलून गेलेली दिसत होती. शहरातील पार्किंगच्या ठिकाणांवर देखील वाहनांची प्रचंड गर्दी झालेली होती. सकाळ पासूनच नगरप्रदक्षिणेसाठी दिंड्या तसेच वारकरी भाविकांची लगबग सुरु होती. शहरातील पश्चिमव्दार तसेच महाव्दारात प्रासादिक वस्तुंच्या खरेदीसाठी देखील वारकऱ्यांची गर्दी झालेली दिसत होती. उजनी धरणातून सोलापूरसाठी भीमानदीतून पाणी सोडण्यात आल्यामुळे येथील चंद्रभागा नदी मध्ये देखील पाणी पातळी वाढलेली आहे. त्यामुळे चंद्रभागा नदीच्या स्नानाचा आनंद भाविक मनमुराद घेताना दिसत होते. एकादशी असून देखील नेहमी प्रमाणे वाळवंटात अस्वच्छता दिसत होती. त्यामुळे भाविकांमधून नाराजी व्यक्त केली जात होती.

**पुत्रदा एकादशीचे महात्म्य**

पौष शुक्लपक्षातील एकादशीला पुत्रदा एकादशी म्हणतात. या एकादशीचे महात्म्य सांगताना कृष्णाने धर्मराजाला सांगितले की, पूर्वी भद्रावती नगरीत सुकेतुमान नावाचा राजा राज्य करीत होता. तो महापुण्यशील व पराक्रमी होता. त्याला शैब्या नावाची महान पतिव्रता अशी एक पत्नी होती. या उभयतांना सर्वसुखे अनुकुल होती. मात्र त्यांना पुत्र संतान नव्हते. त्यामुळे राजी आणि त्याची धर्मपत्नी दोघेही दु:खी होते. ते भगवंतांची प्रार्थना करीत होते. यावेळी भगवान कृष्णाने त्यांना एक रमणीय सरोवर व काही ऋषीमुनी तिथे स्नान करीत असल्याचे दृष्टांत दिला. त्यावेळी त्यांना ऋषीमुनींनी (भगवान) अर्थात विश्वदेवांनी सांगितले की, जे कोणी पुत्राची इच्छा धरुन पुत्रदा एकादशीचे व्रत करतील त्यांना पुत्रप्राप्ती (संतानप्राप्ती) होईल. त्या प्रमाणे राजाने आणि त्याच्या पत्नीने पुत्रदा एकादशीचे व्रत केले. त्यानंतर त्यांना निश्चितच संतती प्राप्त झाली. सामान्य एकादशी प्रमाणेच पुत्रदा एकादशीचे देखील व्रतदेखील केले जाते. पहाटेपासूनच गर्दी होती.

### स्थानिक नागरिकांचे प्रचंड हाल

येथील नगरप्रदक्षिणा रस्त्यांवर विशेष: कालिकादेवी चौक, काळामारुती, चौफाळा तसेच नाथचौक आदी भागात भाविकांच्या गर्दीमुळे स्थानिक नागरिकांचे मात्र प्रचंड हाल होताना दिसत होते. या मध्ये शाळेसाठी जाणारे विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत सोडणाऱ्या रिक्षा तसेच टॅक्सीवाले या बरोबरच दुचाकीवरुन लहानग्यांना शाळेपर्यंत सोडणाऱ्या पालकांचे विशेष: महिला पालकांचे हाल होत होते.

---



# टँकरने ट्रॅक्टरला ठोकरल्याने चालकाचा जागीच मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि.१० जानेवारी-**

मंगळवेढा-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील ब्रम्हपुरीजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या सिमेंट वाहतूक टँकरने ऊस वाहतूक ट्रॅक्टरला पाठीमागून जोराची धडक दिली.

यात गोरख मल्हारी बोडरे (वय ३६,रा. अर्धनारी, ता. मोहोळ) याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात टँकर चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान अपघातानंतर टँकर चालक फरार झाला आहे.

१० जानेवारीच्या पहाटे ३ वाजता मंगळवेढा ते सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावरील ब्रम्हपुरी हद्दीतील शिरसट वस्तीजवळ ऊस घेवून जाणारा ट्रॅक्टर (क्र. एम. एच. १३/ ए. ८७८९) याला टँकर (क्र. एम. एच. १३/ ए. एक्स. ४०६७) चालकाने धडक देऊन ट्रॅक्टर चालक गोरख बोडरे याला गंभीर जखमी केले व त्याच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याची फिर्याद धुळप्पा तुकाराम कोकरे (रा. अरळी) यांनी दिली. दरम्यान टँकरचा वेग एवढा मोठा होता की, ट्रॅक्टरच्या इंजिनचे अक्षरशः तुकडे तुकडे होवून रोडच्या खाली जावून पलटी झाल्याचे दिसून येत होते. तसेच दुसऱ्या पाठीमागील ट्रेलरला जोराची धडक दिल्याने टँकरसह ट्रॅक्टर रस्त्याच्या दुभाजकावर चढल्याचे चित्र होते. या अपघाताचे वृत्त समजताच राष्ट्रीय महामार्गाचे पोलीस पथक तात्काळ दाखल झाले. पोलीस उपनिरीक्षक गणपत माने, सहाय्यक फौजदार दत्तात्रय घंटे, पोलीस अंमलदार सुनिल घोळसगावकर, दत्तात्रय बोरकर आदींचे पथक घटनास्थळी दाखल झाले. हायवे पेट्रोलिंग टीममधील कंट्रोल रुम अधिकारी धनाजी माने, संतोष नाईकवाडी, प्रदीप व्हराडे, दत्तात्रय घुले, अमीर पटेल व अॅम्ब्युलन्स टीमने मदत केली.

---

## संक्षिप्त वृत्त



### सुलाखे कॉमर्स कॉलेजचा रुपेश केदार कुस्ती स्पर्धेत प्रथम

**बार्शी, दि. १० जानेवारी-**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आले होत्या. या स्पर्धेमध्ये बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजमधील रुपेश बाळासाहेब केमदारने बी. कॉम. भाग दोन मधील खेळाडू यांनी ८७ किलो वजन गटामध्ये प्रथम क्रमांक पटकावला. या खेळाडूने दररोज व्यायामाचे सातत्य व सराव करुन कुस्ती खेळाचे महत्व सर्व शाखा व विविध पातळीवर प्राविण्य मिळवण्याचा प्रयत्न करण्याचा हेतू आहे. शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे व बी.पी.एड विभाग प्रमुख डॉ. अनिल कांबळे व नरळे यांनी प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी. करंडे व संस्था पदाधिकारी यांनी अभिनंदन केले. मार्गदर्शक डॉ. दत्तप्रसाद सोनटक्के यांनी परिश्रम व सराव घेऊन स्पर्धेला पाठवून यश मिळवून दाखवले.

### रोहिदास सोनवणे यांना आदर्श प्राचार्य पुरस्कार जाहीर

**कुर्डूवाडी, दि. १० जानेवारी-**



येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला व महात्मा ज्योतिबा फुले उच्च माध्य. विज्ञान व कला महाविद्यालय चे प्राचार्य श्री रोहिदास सोनवणे यांना राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्य या संघटनेकडून प्राचार्य रोहिदास सोनवणे यांच्या शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य पुरस्कार संस्थेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बापुसाहेब आडसूळ यांनी जाहीर केला असून निवडीचे पत्र देण्यात आले. या पुरस्काराचे वितरण रविवार १२ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, प्रमोदजी महाजन बहुउद्देशीय सभागृह, धाराशिव येथे करण्यात येणार आहे.



### भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखेच्या वतीने पत्रकारांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १० जानेवारी-**

अक्कलकोट येथील राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन येथे भारतीय बौद्ध महासभा सोलापूर जिल्हाध्यक्ष मेजर कमलाकर कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रिझर्व्ह बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी दिलीप कदम, भारतीय बौद्ध महासभा सोलापूर जिल्हाध्यक्ष मेजर कमलाकर कांबळे, कार्याध्यक्ष श्रीशैल शिवशरण, प्रवक्ते राजकुमार बनसोडे, संघटक सिद्धाराम घटकांबळे, आकाश गायकवाड, मल्लिकार्जुन भणगे, शिवशंकर गुंजले आदींची उपस्थिती होती. यावेळी पत्रकार नंदकुमार जगदाळे, मारुती बावडे, स्वामीराव गायकवाड, रमेश भंडारे, सैदप्पा इंगळे यांचा सन्मान करण्यात आला. पत्रकार राजेश जगताप यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी राजमाता जिजाऊ मंगल कार्यालयाचे संचालक दिलीप कांबळे, मेजर कमलाकर कांबळे, मारुती बावडे, स्वामीराव गायकवाड आदींनी मनोगत व्यक्त केले.



### उळे येथे कृषी कन्यांनी भरवले गावकऱ्यांचे चर्चासत्र

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

उळे येथे ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत लोकमंगल कृषीक्ष महाविद्यालय वडाळा येथील कृषीकन्यांनी भरवले गावकऱ्यांचे चर्चासत्र. त्याला गावकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. ही चर्चासत्र गावकऱ्यांच्या गावातील विविध समस्या व गरजा या विषयावरती झाली. शिक्षण, आरोग्य, बँक सुविधा, बाजार सुविधा, पिण्याचे स्वच्छ पाणी व वाहतूक सुविधा या विविध विषयांवर ती चर्चा झाली. तसेच शेतीशी निगडित विविध समस्यांवरती देखील चर्चा झाली. गावकऱ्यांनी या गरजांवरती उपाय सुचवले व आपले मत मांडले. यावेळी कृषीकन्यांनी ग्रामपंचायत, महिला बचत गट, शासकीय रुग्णालय व पशुवैद्यकीय रुग्णालय, जिल्हा परिषद शाळा या ठिकाणी भेट दिली. यावेळी कृषी कन्या श्रुती शिंदे, साक्षी शिंदे, तेजस्विनी पाटील, आकांक्षा यादव, मयुरी सामल व ऐश्वर्या संध्यास्थानम यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली. यावेळी प्राचार्य डॉ. अमोल शिंदे, कार्यक्रमाधिकारी प्रज्ञा कुदळे यांचे मार्गदर्शन लाभले.

### सरकारी कामात अडथळा करुन शिवीगाळ, प्रकरणातील आरोपींची निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. १० जानेवारी-**

बार्शी येथील सत्र न्या. ल. स. चव्हाण यांनी सरकारी कामात अडथळा करत शिवीगाळ, दमदाटी करुन सरकारी मालमत्तेचे नुकसान केल्याच्या गुन्ह्यात संशयित आरोपी विजय मोरे व गणेश शिंदे यांची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. सीना-माढा प्रकल्प विभागाचे उपअभियंता सुनिल म्हेत्रे यांनी विजय मोरे व गणेश शिंदे यांच्याविरुध्द टेंभुर्णी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली. खटल्याच्या कामकाजादरम्यान फिर्यादी, साक्षीदार, पंचांचे जाबजबाब घेण्यात आले. आरोपींच्या वकिलांचा युक्तीवाद, उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे न्याय निवाडे या बाबी ग्राह्य धरुन सत्र न्यायालयाने ८ जानेवारी रोजी सबळ पुराव्याअभावी आरोपी दीपक भोसकर, विजय मोरे व गणेश शिंदे यांची निर्दोष मुक्तता केली. आरोपीतर्फे अॅड. महेश जगताप, अॅड. अभिजीत जगताप व अॅड. आदित्य काकडे यांनी पाहिले.

## संक्षिप्त वृत्त



### नूमवि शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

नूमवि शिशु शाळेत स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावर्षी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे, माय मराठीची थोरवी,रुजवू बालकांच्या मनी संकल्पना घेऊन मराठी भाषा ज्या साहित्यिकांनी रचली आणि मराठी गायकांनी गायलेली बाल गीते, मराठी भाषा गौरव गीते, देशभक्तीपर गीते बसविण्यात आली होती. या कार्यक्रमाची सुरुवात ओम नमोजी आद्या या ईशस्तवनाने झाली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे मीरा शेंडगे माजी प्राचार्य कुचन प्रशाला सोलापूर. शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन, शि.प्र.मंडळी पुणे नियामक मंडळ सदस्य दामोदर भंडारी, मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी, कार्याध्यक्षा अंकिता कुलकर्णी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. बीज जसे अंकुरते, मी मराठी, लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, आज आयोध्या सजली सजली, जयोस्तुते, उठा उठा चिऊताई, किलबिल किलबिल पक्षी बोलती, गवताच पात, पंख उघडा घ्या भरारी, सांज ये गोकुळी, माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध आमचे सुरू अशा वेगवेगळ्या गाण्यांवर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करीत उपस्थिततानाही डोलायला भाग पाडली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली पाटील, सायली देशमुख यांनी केले.

### हत्याराने वार केल्याने तरूण जखमी

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

पूर्व वैमनस्यातून हत्याराने वार केल्याने तरूण जखमी झाला. याबाबत रामकृष्ण हरिदास मुंढे (वय २६, रा. अभिमान श्री नगर, मुरारजी पेठ, सोलापूर) यांने दिलेल्या फिर्यादीवरुन कृष्णादास तुकाराम लोंढे (वय ४२, रा. लक्ष्मी विष्णु चाळ, डोणगाव रोड, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामकृष्ण मुंढे याचे सहा महिन्यापूर्वी कृष्णादास लोंढे याच्यासोबत भांडण झाले होते. त्याचा राग मनात धरून ८ जानेवारी रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास गोल्ड जिम समोरील रस्त्यावर कृष्णादास लोंढे याने रामकृष्ण मुंढे हा बेसावध असताना त्याच्या डाव्या व उजव्या दंडावर हत्याराने वार करून त्यास जखमी करून मारहाण केली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार कटारे पुढील तपास करीत आहेत.

### घरगुती वादातून पत्नीला पेटवून दिले

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

घरगुती वादातून पत्नीला पेटवून दिल्याने पत्नी जखमी झाली. प्रियंका गजू जाधव (वय २५, रा. क्रांती नगर, गोल्डन जीमजवळ, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ९ जानेवारी रोजी रात्री साडेआकराच्या सुमारास राहत्या घरी घरगुती वादातून तिच्या पतीने दारूच्या नशेत प्रियंकाला पेटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये प्रियंका या भाजून जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# शेटे वाड्यात योगदंडाचे विधिवत पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**






ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर यांच्या हातातील योगदंडाची पूजा शुक्रवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास शुक्रवार पेठेतील कै. रामचंद्रप्पा शेटे यांच्या वाड्यात ॲड. रितेश थोबडे यांच्या हस्ते विधिवत करण्यात आली. योगदंडाच्या पूजनाने सिद्धरामेश्वर महाराज अक्षता सोहळ्यातील धार्मिक विधींना प्रारंभ झाला आहे.

यंदा योगदंड पुजनात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शेटेवाड्याच्या प्रवेशद्वाराने वाड्याला रंगबिरंगी झेंडूच्या फुलांनी सजावट करण्यात आली होती. तसेच विद्युत रोषणाई केल्याने सारा परिसर प्रकाशमान झाला होता. दरम्यान, वैदिक सनातन हिंदू संस्कृतीमध्ये अक्षता सोहळ्याच्या वधू-वरांना पाहुण्याच्या घरी बोलावुन जेऊ घालण्याची प्रथा आहे. ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महाराजांनी साडेनऊशे वर्षांपूर्वी कै.रामचंद्रप्पा शेटे यांच्या वाड्यात येऊन जेवण केले होते. तीच परंपरा कायम ठेवून सिध्दरामेश्वर महाराजांच्या हातातील योगदंड कसब्यातील शेटे यांच्या वाड्यात आणून केळीच्या पानात पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून पूजा केली जाते. शुक्रवारी दुपारी साडेबारा वाजता मानकरी सिध्देश्वर कंठीकर यांनी कसब्यातील हिरेहब्बू यांच्या वाड्यातून सिद्धरामेश्वरांच्या हातातील योगदंड कै. रामचंद्रप्पा शेटे यांच्या वाड्यात घेऊन आले. त्यानंतर मानकरी वाड्यात आल्यानंतर योगदंड चौरंग पाटावर ठेवून कुमकुम फुले वाहून संबळाच्या निनादात विधिवत पूजा करण्यात आली.

त्यानंतर होम हवन करण्यात आले. कै.शेटे यांचे वारसदार ॲड. मिलिंद थोबडे यांचे चिरंजीव रितेश थोबडे यांनी मानकरी सागर हिरेहब्बू व हब्बू यांची पाद्यपूजा केली. योगदंडास केळीच्या पानामध्ये पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्यात आला. ॲड. मिलिंद थोबडे यांना १९८७ पासून सिद्धेश्वर महाराजांच्या हातातील योगदंडाची पूजा करण्याचा मान आहे. जानेवारी २०१२ मध्ये २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आपला वारसा चिरंजीव ॲड.रितेश थोबडे यांच्याकडे सोपविले असल्याचे ॲड मिलिंद थोबडे यांनी सांगितले. गेल्या १० वर्षापासून ॲड. रितेश थोबडे यांच्याहस्ते योगदंडाची पूजा संपन्न होत आहे. यावेळी ॲड.मिलिंद थोबडे, सुचेता थोबडे, विजया थोबाडे, श्रद्धा थोबडे, ललिता थोबडे, सिद्धेश थोबडे, प्रणिका थोबडे, प्रतीक थोबडे, सुधीर थोबडे, विक्रांत थोबडे, गीता थोबडे यांच्यासह राजश्री देसाई, वैशाली अक्कलवाडे तर सागर हिरेहब्बू, अमित हब्बू, राजेश हब्बू, आकाश हब्बू, सदानंद हब्बू, विजयकुमार हब्बू आदी उपस्थित होते. श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीचे सदस्य बाळासाहेब भोगडे, आदी उपस्थित होते. शेटे यांच्या वाड्यात योगदंड पूजन झाल्यानंतर दर्शन घेऊन उपस्थित सिद्धेश्वर भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. त्याच प्रमाणे यात्रेच्या दुसऱ्या दिवशी मध्यरात्री बारा वाजता मानाच्या पहिल्या दोन नंदीध्वजांना साज चढविण्याचा कार्यक्रम होणार आसून हा साज उत्तर कसव्यातील हिरेहब्बू वाड्यात चढविण्यात येतो.

**परंपरेनुसार योगदंडाचे पूजन**

सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षी देखील शेटेवाड्यामध्ये ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या हातातील योगदंडाचे विधीवत पूजन संपन्न झाले. सिद्धरामेश्वरांची कृपादृष्टी अशीच भक्तांवर सदैव राहू दे असे मागणे यावेळी मागितले. त्याचप्रमाणे यंदाच्या वर्षी शेटेवड्यामध्ये विद्युत रोषणाईसह आकर्षक रंगीबेरंगी झेंडू आणि शेवंतीच्या फुलांनी सजावट करण्यात आली होती.यामुळे संपूर्ण शेटे वाडा चैतन्यमय व प्रकाशमय झालेला दिसत आहे.

**- ॲड. रितेश थोबडे,**
**योगदंड पूजा मानकरी**

**केळवणासाठी महिनाभरापासून तयारी**

योगदंड पूजा संपन्न झाल्यानंतर केळवणासाठी पुरणपोळी सोळा प्रकारच्या भाज्या सार पापड गव्हाची खीर चटणी मेतकूट अशा विविध खाद्यपदार्थंचे नैवद्य अर्पण केला गेला. याप्रसंगी विजया थोबडे, सुचिता थोबडे, श्रद्धा तुगडे, ललिता थोबडे, सिद्धेश थोबडे, अर्निका थोबडे, प्रतीक थोबडे, सुधीर थोबडे,विक्रांत थोबडे, गीता थोबडे यांनी सामूहिक पद्धतीने योगदंडचे पूजन करून आशीर्वाद घेतले. याप्रसंगी सुचेता थोबडे आणि श्रद्धा थोबडे यांनी नैवेद्याला तयार केलेल्या भोजना बद्दल माहिती देताना गेल्या महिन्याभरापासून केळवणाची तयारी केली जात असल्याचे सांगितले. यासाठी विविध प्रकारच्या भाज्या, सार, पुरणपोळी, आदींचा समावेश असल्याचे सांगितले.



## कुंभार समाजाकडून यात्राप्रमुख हिरेहब्बू यांना मातीच्या घागरी सुपूर्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जानेवारी-**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या यात्रेच्या धार्मिक विधीना सुरुवात झाल्यानंतर आज शुक्रवारी सकाळी नऊ वाजता कुंभार समाजाकडून यात्राप्रमुख हिरेहब्बू यांना ५६ मातीच्या घागरी सुपूर्द करण्याचा धार्मिक विधी संपन्न झाला. हिरेहब्बू वाड्यालगत असणाऱ्या कुंभारवाड्यातून हा सोहळा संपन्न झाला.

दरम्यान, कुंभार समाजाच्या कन्येचा प्रतिकात्मक विवाह सोहळा या यात्रेनिमित्त श्री सिद्धेश्वर महाराज यांच्याशी होतं असतो. याच पार्श्वभूमीवर विवाह सोहळ्याच्या तैलाभिषेक या धार्मिक विधीसाठी लागणारे ५६ मातीचे घागरी यात्राप्रमुख हिरेहब्बू यांना मोठ्या उत्सहात सुपूर्द करण्यात आल्या. तत्पूर्वी कुंभार वाड्यात या मातीच्या घागरिंची तसेच श्री गणेशाची मंगलवाद्याच्या ध्वनीत यथोचित पूजा मानकरी योगेश म्हेत्रे कुंभार यांच्या हस्ते सपत्नीक करण्यात आली. शुक्रवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास कुंभारवाड्यात मोठ्या स्वरूपात हा सोहळा संपन्न झाला. सकाळी श्री गणेशाचे पूजन करण्यात आले त्यानंतर मातीचे घागरीचे पूजन संपन्न झाले. सदरच्या घागरी तैलाभिषेक धार्मिक विधीसाठी वापरल्या जातात. त्याचा मान कुंभार समाजाकडे असल्याचे मानकरी योगेश म्हेत्रे कुंभार यांनी सांगितले. या धार्मिक कार्यक्रमानंतर यात्रेच्या धार्मिक विधींची सुरुवात झाली असून मोठ्या भक्तीमय वातावरणात मातीच्या घागरी सुपूर्द करण्याचा कार्यक्रम कुंभार समाज बांधवांच्या उपस्थितीत करण्यात आला. वाड्यातील पूजा संपन्न झाल्यानंतर कुंभार समाजातील सुहासिनी महिलांनी सदरच्या मातीच्या घागरी आपल्या डोक्यावर घेऊन हिरेहब्बू यांच्या वाडयाची वाट धरली. दरम्यान या धार्मिक विधी बाबत कुंभार समाजातील ज्येष्ठ माजी नगरसेवक भीमाशंकर म्हेत्रे कुंभार तसेच मानकरी महादेव म्हेत्रे कुंभार यांनी अधिक माहिती देताना, कुंभार समाजातील सर्व लहान थोर समाज बांधवांनी कुंभार वाड्यातून एकत्र येत सदरच्या मातीच्या घागरी मंगल वाद्याच्या गजरात यात्राप्रमुख हिरेहब्बू यांना सुपूर्द करतात.

## पूर्ववैमनस्यातून तरूणास बेदम मारहाण

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

तीन वर्षापूर्वी चापट मारल्याचा राग मनात धरून तरूणास मारहाण करणाऱ्याविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत आकाश दिगंबर आळसंदे याने दिलेल्या फिर्यादीवरुन समर्थ देसाई (रा. गणेश बिल्डर्स, स्किम नं. ३, जुळे सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. ८ जानेवारी रोजी रात्री सव्वा नऊच्या सुमारास आकाश आळसंदे हा कामावरून घराकडे जात होता. त्यावेळी रूबी नगर येथे आळसंदे याच्या दुचाकीला आडवून समर्थ देसाई याने तू मला तीन वर्षापूर्वी चापट मारला होता, आठवते का असे म्हणून काठीने आळसंदे यास दगडानेही मारहाण केली म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हवालदार फुलारी तपास करीत आहेत.

श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
WILDWISE RELESA
उद्यापासुन ग्रॅन्डगाला ओपनिंग
बालकृष्ण यांचा जबरदस्त ॲक्शन फाईट ने सजलेला तेलगु चित्र
तेलगु चित्र रोज ३ खेळ




हाऊसफुल्ल गर्दीत




स.९॥,१२॥,३॥, ६॥,९॥ वा
थियटवर दिवसभर ॲडव्हान्स बुकींग चालु आहे ग्रुप बुकिंगसाठी कॉल करा
7028810756,9970003525



## महसूल पतसंस्थेच्या चेअरमनपदी तोडकरी; व्हाईस चेअरमनपदी बाळगी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जानेवारी-**

सोलापूर जिल्हा महसूल सेवक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी राहुल तोडकरी तर व्हाईस चेअरमनपदी मलिनाथ बाळगी यांची आज बिनविरोध निवड झाली. सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी संघटना व सोलापूर जिल्हा मध्यवर्ती संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार केला. यावेळी अशोक इंदापुरे, शंतुनू गायकवाड, विठ्ठल गुरव जिल्हाध्यक्ष सोलापूर, नितीन कसबे, खंडू भोसले, गजानन गायकवाड, दिपक पुजारी, पंकज जाधव उपस्थित होते.



## युनिफॉर्म गारमेंट पार्कसोबतच एक कॉमन मार्केटिंग सेंटर उभारा : राज्यपाल

**आ. सुभाष देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

देशातील पहिल्या युनिफॉर्म गारमेंट पार्क सोबतच एक कॉमन मार्केटिंग सेंटर उभारा. आपण स्वतः मुख्यमंत्र्यांसोबत बैठक लावू आणि आपण प्रयत्न करू, असे आश्वासन राज्यपाल सी. पी. राधाकृषणन् यांनी दिले.

राज्यपाल शुक्रवारी सोलापूर दौऱ्यावर असताना आ. सुभाष देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी खास सोलापूर मनुफॅक्चरर गारमेंट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यात सोलापूर युनिफॉर्म गारमेंट उद्योगाबाबत चर्चा केली. बेंगलोर येथील युनिफॉर्म गारमेंट फेअरचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. उद्योग वाढीसोबतच त्यातील बारकावे म्हणजे नवीन टेक्नॉलॉजी आत्मसात करून उत्पादन कसे वाढवता येईल आणि त्याचे विक्री कशी करता येईल यासंदर्भात त्यांनी मार्गदर्शन केले. गारमेंट उद्योगाला लागणाऱ्या स्किल्ड लेबर, आणि मशिन रिपेअर करणारे लेबर तयार करण्याकरिता सोलापूर युनिव्हर्सिटीमध्ये सोलापूर युनिफॉर्म गारमेंट असोसिएशन सोबत टाईप करून त्याचे नियोजन कसे करता येईल यावरही विचार झाला आणि तसे निर्देश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आमदार सुभाष देशमुख, सोलापूर युनिव्हर्सिटीचे कुलगुरू, प्रताप महानवर यांच्यासह असोसिएशनचे अध्यक्ष निलेश शहा, अमित जैन, प्रकाश पवार, रमेश डाकलिया, वेंकटेश मेंगजी, रोहन बंकापूर आदी उपस्थित होते.

**सोलापूर युनिफॉर्म हब व्हावे**

इतके चांगले युनिफॉर्मचे उत्पादन सोलापुरात आहेत. त्यामुळे सोलापूर युनिफॉर्म हब व्हावे व वेगवेगळ्या दर्जाचे आणि वेगवेगळ्या क्षेत्रातील युनिफॉर्म कसे बनवता येईल व त्याचे मार्केटिंग कसे करता येईल, याचा विचार व्हावा, अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.




भागवत उमामंदिर
हाऊसफुल्ल गर्दीत
हाऊसफुल्ल ६ वा आठवडा




12.30 PM 03.30 PM 09.30 PM 06.15 PM
Book The Ticket At BookMyShow
तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वैकुंठ एकादशीनिमित्त ललितांबादेवीला भगवान व्यंकटेश्वर अवताराची सजावट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

भद्रावती पेठ येथील श्री ललितांबादेवी नवरात्र व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने वैकुंठ एकादशीनिमित्त शुक्रवारी ललितांबादेवीच्या मूर्तीस भगवान व्यंकटेश्वर अवताराची सजावट करण्यात आली.

या मंदिरातर्फे नैमित्तिक अवताराची सजावट करण्याची परंपरा आहे. याअंतर्गत वैकुंठ एकादशीनिमित्त ललितांबादेवीच्या मूर्तीला तिरूमला तिरुपती बालाजी अर्थात भगवान व्यंकटेश्वरांच्या रूपाने तसेच विविध अलंकारांनी सजविण्यात आले. मंदिराचे पुजारी योगेश बुरा पंतुलु , कृष्णा गड्डम पंतुलु, रोहित नंदाल पंतुलु यांनी यांनी देवीला बालाजी अवताराची सजावट केली. शेकडो भाविकांनी त्याचे दर्शन घेतले.

यावेळी मंडळाचे पदाधिकारी रमेश मादगुंडी, श्रीनिवास बुरा, रवी मुत्तोज, तुळजाराम कडमंची, मार्कंडेय तुम्मा, सुरेश कोगारी, मिनेश बुरा, रमेश भंडारी, गोविंद गुंडला, कष्टया गुंडला, दीपक कडमंची, संदीप वद्दुल, श्रीकांत चिप्पा, नागेश रचा, राजू सामल, चिंटू आलम आदी उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत





● सोलापूर विद्यापीठाचा२०व्या दीक्षांत समारंभात पीएचडी प्राप्त संशोधक विद्यार्थी व विविध अभ्यासक्रमातील सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांसमवेत राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन आणि मान्यवर.

# विद्यापीठाने वस्त्रोद्योगात वेगळे नाव निर्माण करावे

● दीक्षांत समारंभात राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचे प्रतिपादन

### ● पाहुण्याचे हस्ते प्रमाणपत्र व सुवर्णपदक न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांची नाराजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जानेवारी-**

सोलापूर ही वस्त्रोद्योग नगरी आहे. आज वस्त्रोद्योगाला चांगले दिवस आहेत. त्याचा फायदा घेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने वस्त्रोद्योगाविषयी विविध अभ्यासक्रम, प्रकल्प तसेच उपक्रम सुरू करून वेगळे नाव निर्माण करावे, असे प्रतिपादन महामहिम राज्यपाल तथा सार्वजनिक विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

शुक्रवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा२० वा दीक्षांत समारंभ पार पडला. यात राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना विविध पदव्या देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबईचे कुलपती, पद्मभूषण प्रा. जे. बी. जोशी, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे यांच्यासह व्यवस्थापन परिषद सदस्य आणि विविध विद्याशाखेच्या अधिष्ठाता यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी दीक्षांत मिरवणूक निघाली. यामध्ये अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद अधिसभा सदस्य आणि पदवी घेणारे विद्यार्थी दीक्षांतचा बाराबंदी पोशाख परिधान करून सहभागी झाले होते.

राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती वर्ष आपण साजरा करीत आहोत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या कुशल प्रशासक होत्या. देशभर मंदिरांचा जीर्णोद्धार त्यांनी केला. वस्त्रोद्योगातही त्यांची कामगिरी प्रसिद्ध आहे. आज विद्यापीठाने बाजारपेठेची गरज ओळखून त्यानुसार अभ्यासक्रम सुरू करणे व त्याचे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. नवीन शैक्षणिक धोरणाचाही यासाठी फायदा होतो. त्याचा फायदा घेत विद्यापीठाने सोलापूरच्या वस्त्रोद्योग नगरीची ओळख जगभर पोहोचवण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेऊन त्यावर काम करावे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. भारतीय अर्थव्यवस्था मोठी बनत असल्याचे सांगून विकसित भारत २०४७ साठी विद्यार्थी व शिक्षकांनी काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.



बाराबंदी पोशाख परिधान करून ज्ञानदंड घेऊन दीक्षांत मिरवणूक निघाली. परीक्षा विभागाचे संचालक डॉ. अंधारे अग्रभागी, त्यामागे प्रमुख मान्यवर.

#### संशोधनाला महत्त्व देऊन वेगळेपण सिद्ध करावे

पद्मभूषण प्रा. जे. बी. जोशी यांनी दीक्षांत भाषण केले. यावेळी त्यांनी देशाच्या प्रगतीसाठी कृषी, उद्योग, आंतरराष्ट्रीय व्यवसाय या विषयांना घेऊन विशेष काम करणे गरजेचे असल्याचे सांगितले. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी संशोधनाला महत्त्व देऊन आपले वेगळेपणा सिद्ध करावे. नाशवंत झालेल्या फळापासून इथेनॉल निर्मिती होते. असे काही वेगळे संशोधन व व्यवसाय विद्यार्थ्यांनी उभे करून प्रगती साधावी, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.

कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी विद्यापीठाच्या विकासाचा आढावा सादर केला. यावेळी त्यांनी राज्य सरकारकडे सादर केलेल्या विविध प्रस्तावांची तसेच विद्यापीठात सुरू असलेल्या अध्यासन केंद्राची माहिती दिली. पंतप्रधान उच्चस्तर शिक्षा अभियान यातून मंजूर झालेल्या शंभर कोटी निधीमधून विविध विकास कामे होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात निर्माण होत असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारक अनावरणाचे निमंत्रण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देण्यासंदर्भात राज्यपाल यांना विनंती केली. सूत्रसंचालन डॉ. दीपक ननवरे व डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी केले तर आभार कुलसचिव योगिनी घारे यांनी मानले.

#### पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त विद्यापीठामार्फत अहिल्यादेवी यांच्या जीवनचरित्र विषयांवरील चित्रांचे प्रदर्शन यानिमित्त आयोजित केले होते. या चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. या प्रदर्शनात ५५ चित्रे ठेवण्यात आली. महाराष्ट्रातील मान्यवर चित्रकारांनी रेखाटलेली चित्रांचा यात समावेश आहे.



#### दोन फोटो सेशनमध्ये वितरण

यावेळी विविध अभ्यासक्रमातील १५ हजार २९१ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आल्याचे विद्यापीठाने जाहीर केले. प्रतिवर्षी पीएच.डी पदवी व सुवर्ण पदक विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र व सुवर्ण पदक प्रदान करण्यात येते. परंतु यंदा सर्वांना स्टेजवर प्रमाणपत्र व पदक हातात देऊन स्टेजनवर पाठविण्यात आले आणि राज्यपालांसमेवत दोन फोटो सेशन केले. त्यामुळे ज्यांना हमखास स्टेजवर बोलाविले जाते असे ७१ संशोधक व ५७ सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थी नाराज झाले. एवढा खर्च करून आम्ही फोटो सेशनसाठी नाही तर प्रमाणपत्र व पदक घेण्यासाठी आलो असल्याची प्रतिक्रिया यातील काही विद्यार्थीनी दिली.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



**सोलापूर : सारथीचे सन्मान-वस्त्र, राजर्षी शाहू महाराज स्मृतिग्रंथ तसेच छत्रपती शिवाजी महाराज स्मृतीग्रंथ देऊन प्रसिद्ध लेखक, साहित्यिक व संपादक डॉ. बाबा भांड यांचा सारथी संस्थेच्या वतीने गौरव सन्मान करण्यात आला.**

### शहरातून दोन दुचाकींची चोरी

**सोलापूर, दि.१० जानेवारी-**

शहराच्या विविध भागातून चोरट्याने दोन दुचाकींची चोरी केल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. बलभिम मनोहर गुंड (वय ३७, रा. येणकी, ता. मोहोळ) यांनी त्यांची एमएच १३ सीआर ९५७८ क्रमांकाची दुचाकी ही ९ जानेवारी रोजी सकाळी १० च्या सुमारास मार्केट यार्ड येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याप्रकरणी जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार धुमाळ पुढील तपास करीत आहेत. तर सिध्दप्पा शिवशरणप्पा कोपनूर (वय ४६, रा. प्लॉट नं. ३, स्वागत नगर शेजारी, सोलापूर) यांनी त्यांची एमएच २५ जे ९३३६ क्रमांकाची दुचाकी ही ५ जानेवारी रेजी दुपारी जुना कुंभारी नाका येथील प्रकाश हॉटेलशेजारी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार भांगे पुढील तपास करीत आहेत.

### बंद घर फोडून ५३ हजारांचा ऐवज लंपास

**सोलापूर, दि.१० जानेवारी-**

बंद घर फोडून चोरट्याने ५३ हजारांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली. याबाबत अजय मल्लिकार्जुन दारलु (वय ४५, रा. उत्तर सदर बझार, सतनाम चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ डिसेंबर रोजी अजय दारलू हे घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. ते ३ जानेवारी रोजी परत आले. त्यावेळी त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने दारलू यांचे बंद घराचे कुलूप तोडून बेडरूममध्ये ठेवलेले रोख रक्कम, २.४ ग्रॅमचे सोन्याचे टॉप्स, ३.३ ग्रॅमची चैन, ३ ग्रॅमचे सोन्याचे मणी मंगळसूत्र ५३ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## एकदा भक्तलिंग हर्र बोला हर्रच्या गजराने नूमवि दुमदुमली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

नूमवि मराठी शाळेत घरोघरी बाराबंदी मनोमनी यात्रा उपक्रमांतर्गत नंदीध्वज पूजन कार्यक्रमात वाजत-गाजत बँडच्या व झांजच्या तालावर काठ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रशांत बडवे यांचा शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मंगळवेढेकर इन्स्टिट्यूटचे वैद्य, ह.दे.चे पर्यवेक्षक मोतीबने, मुख्याध्यापक शिरगावे, विद्यार्थी परिषदेचे बंकुर, सिद्धेश्वर कमिटीचे माळगे, सुमेधा पटवर्धन उपस्थित होते. त्यानंतर विद्यार्थ्यांनी तांडव व झांज नृत्य सादर केले त्यानंतर मानाच्या नंदीध्वजाचे पूजन व आरती करण्यात आली. पालिका ननवरे यांनी सिद्धेश्वर भक्ती गीत सादर केले. त्यांना तबल्याची साथ सुनील सर्जे यांनी दिली.

मुख्याध्यापिका वर्षा जेधे प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन रोहिणी चौधरी यांनी केले. परिचय स्मिता माळवदकर यांनी करुन दिला. आभार आशा गायकवाड यांनी मानले,.

## मांजात अडकलेल्या घुबडाला वन्यजीवप्रेमींनी दिले जीवदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

अरविंद वसाहतीमध्ये नॉयलॉन मांजामध्ये अडकेलेल्या गव्हाणी घुबड पक्षाला वन्यजीवप्रेमींनी जीवदान दिले. ९ जानेवारी रोजी सकाळी संतोष पवार यांनी डब्ल्यूसीएएसचे अध्यक्ष अजित चौहान यांना फोन करून अरविंद वसाहतीमध्ये एका झाडावर गव्हाणी घुबड मांजामध्ये अडकले आहे व त्याला रेस्क्यू करण्याची विनंती केली.

चौहान यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता जवळजवळ ६० ते ७० फुट उंचीवर झाडाच्या टोकावर घुबड पक्षी मांजात अडकला असल्याचे त्यांना दिसून आले. त्यावेळी त्यांनी महापालिकेची बास्केट क्रेनसाठी मागवून घेतली. बास्केट क्रेनमधून विजय कांबळे हे वरती चढले आणि त्यांनी सुखरूपपणे गव्हाणी घुबडाची मांजाच्या फासातून सुटका केली. त्या पक्ष्याला खाली काढल्यानंतर अजित चौहान यांनी घुबडाच्या पंखामध्ये अडकलेला मांजा सुरक्षितपणे काढून त्याचे पंख मोकळे केले व त्याला पुढील उपचारासाठी वनविभागाच्या ट्रांझिट ट्रीटमेंट सेंटरमध्ये पाठवून दिले. त्याच्यावर योग्य उपचार झाल्यानंतर त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडून देण्यात येणार आहे. या बचाव कार्यात वन विभागाचे प्रवीण जेऊरे, पोलीस हवालदार दशरथ भांगे व रुद्रप्रताप चौहान यांनी सहभाग घेतला.



#### गव्हाणी घुबड पक्षी काय, कसा असतो...

गव्हाणी घुबड हा मानवी वस्तीजवळ जुन्या पडक्या घरामध्ये, झाडांच्या ढोलीमध्ये वास्तव्य करतो. अलीकडील काळामध्ये शहरीकरणामुळे वाढलेल्या सिमेंटच्या जंगलामध्येसुद्धा या घुबडाने आपले अस्तित्व कायम ठेवले व वापरात नसलेल्या इमारतीच्या खिडक्यांमध्ये आपले बस्तान बनवले. गव्हाणी घुबड साधारणत: कावळ्याच्या आकाराचे असते. शरीराच्या वरील भागावर सोनेरी, तपकिरी रंग असतो. पोटाचा भाग पांढरा असून अंगावर काळे-पांढरे ठिपके असतात. शरीराच्या मानाने शेपटीचा आकार खूप लहान असतो. डोके हे मोठ्या आकाराचे असते व चेहऱ्याला गडद रंगाची कडा असते. चोच आकाराने लहान पण अत्यंत तीक्ष्ण असते. नर व मादी दोन्ही दिसायला सारखेच असतात. घुबडाच्या बहुतांश जाती या निशाचर असतात. गव्हाणी घुबडसुद्धा निशाचर असून संध्याकाळ झाली की शिकारीच्या शोधात बाहेर पडतात. यांचा आवाज हा भयानक किंचाळीसारखा असतो. यांचे मुख्य अन्न हे उंदीर असून क्वचित साप, पाली, सशाची पिल्ले व खारीवरसुद्धा उदरनिर्वाह करतात. त्यामुळे उंदरांना भक्ष्य करून एक प्रकारे ते नैसर्गिक पेस्टकंट्रोल चे काम करतात.

#### जादूटोण्यासाठी घुबडांची तस्करी

जादूटोणा व तत्सम कारणांसाठी घुबडांची खूप मोठ्या प्रमाणावर तस्करी होते. त्याचबरोबर हॉलीवूड चित्रपट बघून अनेकांना घुबड पाळण्याचा मोह होतो. भारतामध्ये अनेक ठिकाणी घुबडे पकडून त्यांना रंगवून त्यांची अवैध विक्री केली जाते. सर्वच पक्षी हे वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ नुसार संरक्षित आहेत व त्यांना पकडणे, मारणे, विकणे हे बेकायदा आहे. त्यामुळे लक्ष्मीचे वाहन असलेल्या व निसर्गातील महत्त्वाचा घटक घुबडांचे संरक्षण करणे हे सर्वांचे कर्तव्य आहे.





सोलापूर : दाजीपेठेतील श्री वेंकटेश्वर मंदिरात वैकुंठ पुत्रदा एकादशीनिमित्त फुलांची व फळांची सजावट करण्यात आली. (छाया : नागेश दंतकाळे)

## वैकुंठ एकादशीनिमित्त व्यंकटेश्वर देवस्थानमध्ये भाविकांची अलोट गर्दी

**‘मोक्षप्राप्ती’ साठी ‘उत्तरद्वार’ मधून मंदिरात प्रवेश..!**

**तभा वृत्तसेवा,**
**सालापूर, दि. १० जानेवारी-**

पौष महिन्यातील एकादशी ही मोक्षदा, पुत्रदा वा वैकुंठ एकादशी म्हणून ओळखली जाते. यादिवशी मंदिराच्या उत्तर द्वारमधून प्रवेश करून भगवान श्रीव्यंकटेश्वराचे दर्शन घेतल्यास मोक्षप्राप्ती मिळते, अशी वंदता आहे. त्यामळे शुक्रवार दि. १० जानेवारी रोजी पूर्वभागातील दाजी पेठ येथील श्री व्यंकटेश्वर देवस्थानम् येथे सोलापूरसह परिसरातील भाविकांनी अलोट गर्दी केली होती.

भगवान व्यंकटेश्वर आणि देवी लक्ष्मी यांचा दिवस मानल्या जाणाऱ्या शुक्रवारी यंदाची वैकुंठ एकादशी आल्याने 'श्रीं'चे विशेष दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी रांग लागली होती. भाविकांना सुलभतेने दर्शन घेता यावे यासाठी देवस्थानच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

श्री व्यंकटेश्वर, श्री पद्मावती गाभारासह ध्वजस्तंभ, बलीपीठम्, नवग्रह, यज्ञशाला, हनुमान मंदिर याठिकाणीही पुलांच्या माळानी सजविण्यात आले होते. ब्रम्हवृंदांकडून करण्यात येणारे वेदमंत्रघोष, भाविकांकडून करण्यात येणारा गोविंदा, गोविंदा... व्यंकटरमणा गोविंदा, गोविंदा... चा जयघोष यामुळे मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. देवस्थानम् कमिटीच्या वतीने भक्तांना प्रसाद तर विविध संस्था, संघटना, मंडळ आणि भाविकांकडून केळी, पेरु आदी फळे वाटण्यात आले.

प्रत्येक काही भक्तगण येणाऱ्या प्रत्येकांच्या कपाळावर नाम ओढण्याची सेवा बजावित होते. वैकुंठ एकादशीनिमित्त रक्तदान शिबीराचेही आयोजन करण्यात आले होते. रक्तदात्यांना भगवान व्यंकटेशाचे आकर्षक स्मृतिचिन्ह देण्यात आले. देवस्थानम्च्या परिसरात विविध पूजासाहित्यांची दुकाने थाटण्यात आली होती.

#### संतानप्राप्ती आणि वैवाहिक जीवन

पौष महिन्यात येणाऱ्या वैकुंठ वा मोक्षदा एकादशीला पुत्रदा एकादशी असेही म्हटले जाते. पुराण आणि महाभारतात पुत्रदा एकादशीचे महत्व सांगितले आहे. संतती प्राप्तीसाठी यादिवशी व्रत केले जाते. या व्रताचे पालन केल्याने भगवान विष्णूच्या कृपेने योग्य संतान, पुण्य आणि मोक्षप्राप्त होतो. तसेच वैवाहिक जीवनही सुखी होते, असे ज्येष्ठ मंडळींकडून सांगण्यात येत.




### शाकंभरी नवरात्रोत्सव : श्री रूपाभवानी देवीची शेषशाही अलंकार पूजा...

**सोलापूर :** शुक्रवारी श्री रुपाभवानी मातेस शेषशाही अलंकार महापूजा बांधण्यात आली. भगवान विष्णू शेषशैय्ये वरती विश्राम करत असताना मातेने यांचे नेत्रकमळात विश्राम घेतला. यावेळी भगवान विष्णू यांच्या मलापासून निर्माण झालेल्या दोन दैत्यांचा वध ब्रह्मदेवाने देवीची स्तुती करून देवीस जागे केल्यावर अंबामातेने त्यांचा वध केला. त्यानंतर विष्णूने आपली शैय्या श्रीदेवीस अर्पण केली. त्यामुळे शेषशाहीअलंकार पूजा या रुपात देवीस सजवले जाते.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०००

**साखरेसि म्हणतां धोंडा ।**
**तरी कां तोंडा न रुचे ।।**

चांगुलपणा निर्माण करणे आणि निर्माण झालेला चांगुलपणा टिकवून त्यात वाढ करीत राहणे अत्यंत अवघड कार्य आहे. चांगुलपणाच्या निर्मितीसाठी आणि त्याला टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत कठीण अशा परिक्षा उत्तीर्ण व्हाव्या लागतात. कोण, केव्हा, कशी परिक्षा घेईल हे सांगता येत नाही. अशा कठीण परिक्षा उत्तीर्ण झाल्यावरही लोक चांगलेच म्हणतील असे मात्र नाही. खरे म्हणजे लोकांनी चांगले म्हणावे म्हणून चांगुलपणा निर्माण करणे योग्य नाही. कारण, मोठेपणाच्या अपेक्षेपोटी केलेली चांगुलपणाची निर्मिती कळत न कळत व्यवहाराकडे, स्वार्थाकडे वळू शकते. जेव्हा आपल्या वर्तनात व्यवहार येतो किंवा स्वार्थाला स्थान मिळते तेव्हा चांगुलपणाला आपोआप पाय फुटतात. अर्थात, चांगुलपणा आपल्यापासून दूर जाऊ लागतो. म्हणून लोक आपणाला चांगले म्हणोत किंवा नाही, आपण आपले सत्कार्य करीत रहावे. लोकांनी आपणाला चांगले म्हटले नाही म्हणून कांही चांगुलपणा कमी होत नाही. साखरेला कोणी धोंडा, दगड, रेती, म्हणून जरी तोंडात टाकले तरी साखर गोडी दिल्याशिवाय रहात नाही. त्याप्रमाणे आपल्या चांगुलपणाला कोणी कांहीही नांवे ठेवली तरी चांगुलपणा त्याला चांगलाच गुण दाखवेल. याबद्दल बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, साखरेसि म्हणतां धोंडा । तरी कां तोंडा न रुचे ।। लोकांनी आपल्याला मोठे, चांगले म्हणावे असे जवळपास सर्वांनाच वाटत असते. पण केवळ असे वाटून चालत नाही. त्यासाठी प्रत्यक्ष कृतीच करावी लागते. वर्तनशुन्य असणाऱ्यांच्या जवळ चांगुलपणा जाईलच कसा? सुदैवाने चांगुलपणाच्या मार्गावर आपले वर्तनाचे पाऊल पडले आणि लोकांच्या टोमण्यांचे किंवा दुर्लक्षाचे अडथळे येऊ लागले तर आपण लगेच हे उचललेले पाऊल मागे घेतो. चांगले वागूनही लोक जर वाईटच म्हणत असतील किंवा नांवे ठेवत असतील तर आपण वाईटच का वागू नये? असे विचार मनात आणणे चुकीचे असते. चांगुलपणा हा लोकांना दाखविण्यासाठी किंवा लोकांच्या कौतुकास पात्र होण्यासाठी निर्माण करायचा नसतो. तो आपल्या मानसिक समाधानासाठी बाळगायचा असतो. लोक तर कशालाही नांव ठेवत असतात. त्यामुळे लोकांनी आपल्या कर्याचा साक्षीदार होण्याची अपेक्षा ठेवण्यापेक्षा आपणच आपल्या कार्याचा साक्षीदार होणे योग्य असते. खरे म्हणजे आपल्या कार्याला आपल्यापासारखा दुसरा कोणीही साक्षीदार होऊ शकत नाही. माणूस जेव्हा स्वतःच्या कार्याचा स्वतः साक्षीदार होतो, तेव्हा नको त्या गोष्टी त्याच्याकडून घडत नाहीत. स्वतःच्या कार्याचा स्वतः साक्षीदार होण्याची सुरुवात म्हणजे खऱ्या अर्थाने परिवर्तनाची सुरुवात होय. सत्य हे सत्यच असल्याने त्याला कोणी कांहीही नांवे ठेवली तरी सत्यामध्ये कांही फरक पडत नाही. त्याप्रमाणे आपल्या सुवर्तनाला कोणी कांहीही नांवे ठेवली तरी ते वर्तनातून निर्माण होणारी फलश्रुती ही निश्चितच चांगली असणार आहे. संत, महात्म्यांना अनेकांनी नांवे ठेवली तरी त्यांनी त्यांचे सत्कार्य कधीच सोडले नाही. म्हणूनच आज आपण संत श्री ज्ञानोबा-तुकाराम, संत एकनाथ, समर्थ रामदास आदी संत महात्म्यांना आपल्या हृदयात स्थान देऊन आहोत. चांगुलपणा हेच या मागचे कारण आहे.



**जय जय राम कृष्ण हरी ।**
**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# सिध्देश्वर यात्रा कालावधीमध्ये स्वच्छ अन्न पदार्थांची विक्री करा

## अन्न औषध प्रशासन सहाय्यक आयुक्त देसाई यांच्या सूचना


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १० जानेवारी-**
सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर यात्रा १२ जानेवारीपासून सुरू होत आहे. तरी यात्रा कालावधीमध्ये अन्न व औषध प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन अन्न सुरक्षेच्या दृष्टीने ग्राहकांना स्वच्छ, निर्भेळ, ताजे अन्न पदार्थांची विक्री करण्यात यावी, असे आवाहन अन्न औषध प्रशासनचे सहायक आयुक्त सा.ए.देसाई यांनी केले आहे.




यात्रा कालावधीत अन्न पदार्थ व इतर खाद्यपदार्थ खरेदी करताना परवानाधारक /नोंदणीधारक आस्थापना कडूनच खरेदी करावेत, अन्न पदार्थ हे स्वच्छ, निर्भेळ, आरोग्यदायी असावेत असे च अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्यात यावेत, तयार अन्नपदार्थ हे नेहमी झाकून ठेवलेले असावेत जेणेकरून त्यावर धूळ, कीटक, माशा बसणार नाहीत व अन्न पदार्थ दुषित होणार नाही याची काळजी घ्यावी.अन्न पदार्थ बनवताना स्वच्छ वातावरणात व स्वच्छ जागेमध्ये तयार करावेत. पॅकबंद असलेलेच अन्नपदार्थ पदार्थ विकत घ्यावेत. सदर पॅकेटवर उत्पादकाचा तपशील, उत्पादन दिनांक, बेस्ट बिफोर, मुदतबाह्य दिनांक, बॅच नंबर इत्यादी तपासून खरेदी करावेत. अन्न पदार्थ बनविण्यासाठी पिण्यायोग्य पाण्याचाच वापर करावा. उघड्यावरील व माशा, कीटक, धूळ बसलेले अन्न पदार्थांचे सेवन करण्यात येऊ नये. हॉटेल, रेस्टॉरंट, नाश्ता सेंटर येथे अन्न पदार्थ बनविण्यासाठी चांगल्या प्रतीचेच खाद्यतेलाचा वापर करावा. खाद्यतेल हे २-३ वेळाच अन्नपदार्थ तळण्यासाठी वापरावे. शिळे, बुरशी आलेले, विटलेले अन्न पदार्थांचे वितरण करू नये वा सेवन करू नये. अन्न पदार्थांची योग्य विल्हेवाट लावावी. दुध व दुग्धजन्य अन्नपदार्थ हे ताजे व योग्य तापमानात साठवणूक केलेले आहेत याची खात्री करूनच खरेदी करावी. (दुध, बासुंदी,रबडी, श्रीखंड, दही इत्यादी) दुध व दुग्धजन्य अन्नपदार्थ हे ताजे व योग्य तापमानात साठवणूक केलेले योग्य कालावधी मध्येच सेवन करावे.अन्न विषबाधा होणार नाही याची खबरदारी घ्यावी.बर्फ युक्त पेये पिण्याचे टाळावे.सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करु नये, तंबाखू/गुटखा/पानमसाला इत्यादीचे सेवन करुन सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये, असेही आवाहन देसाई यांनी केले आहे.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; सम जायला सोपी; अशी असे असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख
राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

**अलकः- (१७) विस्तार**

सरसंघचालकपदी विराजमान झालेल्या सर्वांनीच या हिंदू संघटनेला अपार विस्तार मिळावा म्हणून अथक प्रयत्न केले आहेत. धार्मिक शैक्षणिक सामाजिक राजकीय सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रात संघाच्या अनेक संघटना स्थापन झाल्या आहेत. त्यांची ओळख आपण अलक मधून करून घेऊच. आज देश-विदेशात हिंदू संमेलने भरतात. १९६६ च्या विश्व हिंदू संमेलनात मठाधिपती- धर्माचार्य - हिंदू धर्म किंवा हिंदू दर्शनचे प्रतिनिधित्व करणारे- प्रमुख साधू एकाच व्यासपीठावर व एकाच मंडपात होते. तिथे गगनभेदी गडगडाटात न हिंदुः पतितो भवेत या मंत्राचे स्वागत केले. आजही शीख, वीरशैव, जैन, बुद्ध आदि धर्मगुरु एकाच व्यासपीठावर बसतात. व सारेजण एकात्मता मंत्र म्हणतात. तो मंत्र आहे.

**यं वैदिका मंत्रदृशः पुराणा इन्द्रं यमं मातरिश्वानमाहुः ।**
**वेदान्तिनोऽनिर्वचनीयमेकं यं ब्रह्मशब्देन विनिर्दिशन्ति ।।१।।**
**शैवायमीशं शिवइत्यवोचन् यं वैष्णवा विष्णुरिति स्तुवन्ति।**
**बुद्धस्तथार्हन्निति बौद्धजैनाः सत्-श्री-अकालेति च सिक्खसन्तः ।।२।।**
**शास्तेति केचित् प्रकृतिः कुमारः स्वामीति मातेति पितेति भक्त्या।**
**यं प्रार्थयन्ते जगदीशितारं स एक एव प्रभुरद्वितीयः ।।३।।**

**भावार्थ :** सर्वांचा प्रभू म्हणजे ब्रम्ह एकच आहे. फक्त प्रत्येक जण आपल्या प्रभूची वेगवेगळ्या नावाने पूजा करतो. या सर्व देवांना आम्ही भक्तीने वंदन करतो.

**क्रमशः**



# शिवतीर्थ पुरस्काराचे सोमवारी वितरण

**● ॲड. माने, सुरवसे, ठोकळ, पाटील, आ. खरे मानकरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**
मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या शिवतीर्थ पुरस्काराचे वितरण व तिळगुळ समारंभ येत्या सोमवारी १३ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ठीक ५:०० वाजता छत्रपती शिवाजी प्रशालेत होणार आहे. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या अध्यक्षतेखाली व माजी केंद्रीय गृहमंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या हस्ते पार पडणार आहे. यासंगी हभप प्रकाश बोधले महाराज हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी कै. ॲड. एकनाथ तुळशीराम माने व कै. अंबादास दाजीबा सुरवसे (मुकादम) यांना मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कार तर माजी आमदार निर्मलाताई शंकरराव ठोकळ, माढ्याचे आम दार अभिजीत धनंजय पाटील, आ. राजू खरे यांना शिवतीर्थ समाजभूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या कार्यक्रमास सम ाज बांधव व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान संस्थेचे जनरल सेक्रेटरी प्रा. महेश माने व सांस्कृतिक कमिटी चेअरमन ज्ञानेश्वर सपाटे यांनी केले आहे.




# शिंदे कॉलेजतर्फे दिव्यांग शक्ती प्रोग्राम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**
सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ क्रीडा आणि शारीरिक शिक्षण विभाग यांच्या सहकार्याने पी.एम.उषाअंतर्गत दिव्यांग शक्ती हा कम्युनिटी आउटरीच प्रोग्राम सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, नेहरू नगर या महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला होता.

यावेळी विद्यापीठचे शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अतुल लकडे हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून तर मागास समाज सेवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष चव्हाण हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून तर संस्थेचे उपाध्यक्ष विवेक चव्हाण उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. कलाश्री देशपांडे, प्रा. नागनाथ पुदे, प्रा. विजय तरंगे, प्रा. कोकणे, केतन चव्हाण व स्किल इंडिया कौन्सिल महाराष्ट्राचे नोडल ऑफिसर सुनिल राठोड उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिल राठोड यांनी केले आणि आभार प्रकटन विवेक चव्हाण यांनी मानले. यासंगी डॉ. अतुल लकडे, सुभाष चव्हाण, सुनिल राठोड यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



# दयानंद महाविद्यालयात रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जानेवारी-**
दयानंद महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागातील, रसायनशास्त्र मंडळातर्फे रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. रक्तदान शिबीर रक्तपेढी, सिव्हील हॉस्पीटल यांच्या सहाय्याने घेण्यात आले. या शिबीरात २० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

याचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ.एल.बी.दामा, विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ. नलिनी टेंभेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रशासक प्रा. डॉ. व्ही. पी. उबाळे, दयानंद शिक्षण शास्त्रचे प्राचार्य. डॉ. बी.एच. दाम जी, कला व शास्त्रचे रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एस.वाय. जाधव हे उपस्थित होते. शिबीर पार पडण्यासाठी के.जे. महाजन, प्रा. डॉ. आर. जी. गवळी, एस.व्ही. राजमाने, प्रा.डॉ. एस. पी. देशमुख, प्रा. डॉ. एस. आर. पुजारी, एस.एस. कुंभार, आडकी, कदम, सुतार, आळंद, श्रीमती हिरेमठ आणि श्रीमती पाटील आदींचे सहकार्य लाभले.

# ऑटो रिक्षा संघटनेच्यावतीने उद्या महामेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**
सोलापूर : सोलापूर शहर व जिल्हा ऑटोरिक्षा संघटनेच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता उपलप मंगल कार्यालय, सातरस्ता, सोलापूर येथे ऑटो चालकांचा राज्य स्तरीय मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष अतिश शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा. प्रणिती शिंदे या राहणार आहेत. तर प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्रनाथ भंडारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज मुलाणी, माजी महापौर महेश कोठे, राज्यव्यापी नोंदणीकृत ऑटोरिक्षा संघटना संयुक्त महासंघाचे राज्य अध्यक्ष महेश चौगुले (सांगली), राज्य कार्याध्यक्ष चरणदास वानखेडे, राज्य म हासचिव मच्छिंद्र कांबळे, राज्य उपाध्यक्ष त्र्यंबक स्वामी, सचिन वैराट, राज्य कोषाध्यक्ष राजेश रसाळ, राज्य संघटक राजेंद्र खांडेकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यावेळी ज्येष्ठ ऑटो रिक्षा चालक व महिला चालकांना सन्मानित करण्यात येणार आहे. ऑटोरिक्षा संघटना संयुक्त म हासंघाचे राज्य अध्यक्ष महेश चौगुले यांच्या नेतृत्वाखाली हा राज्यस्तरीय मेळावा होणार आहे. या मेळाव्यास विविध जिल्ह्यातून रिक्षाचालक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत, असे संस्थापक अध्यक्ष अतिश शिंदे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस विकास काळे, गजानंद लोणार, दिनकर जगदाळे, दिलीप गायकवाड आदी उपस्थित होते.

# मल्लिकार्जून हायस्कूलमध्ये स्वसंरक्षण प्रशिक्षणाचा समारोप

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**
श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय, हत्तुरे नगर सोलापूर व सखी सावित्री मंचच्या अंतर्गत प्रशालेतील विद्यार्थ्यांना लाठी-काठी स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.



हा कार्यक्रम प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. यासंगी वैभव कुलकर्णी, प्रशिक्षक नितीन शेलार, पुजा शेलार यांचा सत्कार करण्यात आला. नितीन शेलार, पूर्णा शेलार यांनी लाठी-काठी प्रशिक्षणाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. कार्यक्रमास पर्यवेक्षक रमेश डिंडोरे, बसवराज कोरे, भारत राऊत, प्रा. लक्ष्मीकांत पनशेट्टी, श्रीनिवास कोलप्याक, संतोष स्वामी, गणेश कोरे, रमेश आगवणे, प्रिया पसारे सहभागी झाले होते. सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले तर आभार अनिलकुमार गावडे यांनी मानले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - लालबहादूर शास्त्री पुण्यदिन |
| दि. ११ जानेवारी २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८०-८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४६ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - पौष | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| शु. द्वादशी - (०८.२१) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - शिशिर | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - रोहिणी (१२.२९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - शुक्ल (११.४८) | |
| करण - कौलव (१९.२६) | |

### राशीभविष्य

**मेष :** बिकट परिस्थितीतही आपण सावरू शकतो. सम ाजाकडून मान : सन्मान मिळेल, प्रतिष्ठा वाढेल, धन : संपत्ती मार्ग सुचतील. स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता, प्रवास होईल.

**वृषभ :** विचारविनिमय करण्यास वेळ मिळेल. कार्य, धंद्यात गती चांगली राहील. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल. विनाकारण दुसऱ्या भानगडीत पडण्यापासून मुक्त रहा.

**मिथुन :** काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता. उद्योग:धंद्यात वाढ.

**कर्क :** स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही.

**सिंह :** लाभ व मान-सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे.

**कन्या :** चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता. कर्जापासून अंतरान राहावे.केलेल्या कामावर खुशी राहील.

**तुळ :** मोठी हानी होण्याची शक्यता. शारीरिक स्वास्थ्यावर लक्ष दया. सांभाळून व गोड बोला. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

**वृश्चिक :** राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थिती सामान्य राहील किंचित वाढेल.

**धनु :** आळस करू नका, नवीन ओळखीचा फायदा होईल. उद्योग:धंद्यात आपला विजय निश्चित मानला जातो.

**मकर :** जवळच्याकडून सावधानता बाळगून कामे करा. प्रगतीच्या होईल.धनलाभ संभवतो. उद्योगधंदा चांगला होईल.

**कुंभ :** आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीनीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल. जिवनात यश मिळेल. आनंदी रहाल.

**मीन:** योजना फायद्याची राहील. दिवस मागे केलेल्या कामांमुळे चांगला, प्रगतीकारक बनवेल.






# हातावर पोट असलेल्या गरीबाघरच्या लेकरांनी लुटला कारमधून सहलीचा आनंद

## रोटरी कलब ऑफ एमआयडीसीचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**
हातावर पोट असलेल्या गरीब कुटुंबातील लेकरांना प्रसंगी शालेय साहित्य मिळविण्यासाठी वाट पहावी लागते. या कुटुंबातील लेकरांच्या दृष्टीने शालेय सहल जणू दुरापास्त असते. ही गोष्ट लक्षात घेवून रोटरी कलब ऑफ एम आयडीसीने या गरिबाघरच्या लेकरांना कारमधून सहलीचा प्रवासाचा आनंद लुटायला लावले.

श्री मार्कंडेय प्रशाला, लक्ष्मीबाई तिपण्णा दासरी प्राथमिक शाळा, रामुलम्मा नागप्पा म णिकेरी प्राथमिक शाळा, रामव्वाबाई रामय्या बुर्ला प्राथमिक शाळा या शाळांमधील २५० विद्यार्थ्यांना ४० कारमधून श्रीक्षेत्र कुडल संगम, भीमा व सीना नदीकाठचा परिसर आदी ठिकाणी सहलीला नेण्यात आले.

### चादरीचे जॅकेटस् आणि प्लास्टिकमुक्तीचा संदेश

रोटरीचे सदस्य सोलापुरी चादरीपासून बनविलेले जॅकेटस् घालून या सहलीत सामील झाले होते. स्थानिक उत्पादन म्हणून सोलापुरी चादरीचाच वापर करणे. तसेच प्लास्टिक मुक्तीसाठी कापडी पिशव्या वापर करणे याबाबत जनतेमध्ये संदेश पोहोचविण्याची शपथ रोटरीचे सदस्य, शिक्षक व विद्यार्थ्यांनी या सहलीच्या निमित्ताने घेतली.

प्रत्येक कारला रंगीबेरंगी फुग्यांनी सजविण्यात आले होते. या प्रवासादरम्यान विद्यार्थ्यांना द्राक्षे, राजगिरा लाडू, चिक्की देण्यात आले. विविध स्थळांना भेटी, अंबादास कनकट्टी यांचा नकलाचा कार्यक्रम आणि हग्गी, हुरडा, कडक भाकरी, शेंगाचटणी, गरमागरम भात, आमटीचा आस्वाद घेताना विद्यार्थी हरखून गेले होते. सोलापूर जिल्हा यंत्रमागधारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, रोटरीचे सहायक प्रांतपाल सुहास लाहोटी, अध्यक्ष अंबादास गड्डम, सचिव नरसिम्हा कनको, प्रकल्प संचालक सत्यनारायण गुर्रम, सहाय्यक संचालक सिध्देश्वर गड्डम यांच्या हस्ते सर्व कारचे पूजन करून सहलीस प्रारंभ करण्यात आला. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी परशुराम रापेल्ली, रमेश कमटम, सनी दौलताबाद, प्रा.स्वामीनाथ कलशेट्टी, प्रा. विठ्ठल वंगा, गणेश इराबत्ती, गोवर्धन चव्हाण, व्यंकटेश बिटला, श्रीनिवास नंदाल, चार्वाक बुर्गुल, श्रीनिवास बिंगी, ॲड. श्रीनिवास कटकूर, काशीनाथ कुंटला, श्रीनिवास इडुम, प्रदीप पडघे, प्रशांत अपराध, सनी मद्दूर, श्रीधर चव्हाण, निर्मलकुमार काकडे, यल्लप्पा दंडी, व्यंकटेश जिल्ला, चेतन गुर्रम, राहुल माणकरी, आदित्य गुर्रम, विकी गड्डम, मयुरेश कनकी आदींनी परिश्रम घेतले.



# विद्यापीठ परीक्षेतील त्रुटी दूर करण्यासाठी कुलगुरु डॉ. प्रकाश महानवरांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परीक्षा प्रक्रियेदरम्यान झालेल्या विविध त्रुटींकडे लक्ष द्यावे अशी मागणी अधिसभा सदस्य प्रा. डॉ. जैनोद्दीन मुल्ला यांनी कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी केली आहे.

विद्यापीठ परीक्षा प्रक्रियेदरम्यान प्रश्नपत्रिका काढणे, मूल्यमापन प्रक्रिया आणि निकाल जाहीर करण्याच्या प्रक्रियेतील विविध त्रुटींमुळे विद्यार्थी तसेच संलग्नित महाविद्यालयात तणाव निर्माण होऊन, विद्यापीठाच्या नावलौकिकास तडा जात आहे. या समस्या ओळखण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी एक पद्धतशीर दृष्टीकोन सुनिश्चित करण्यासाठी, सर्वसमावेशक मानक कार्यप्रणालीचा विकास आणि अंमलबजावणी करण्याचे निवेदन प्रा.डॉ. मुल्ला यांनी दिले.या परीक्षेशी संबंधित त्रुटी कमी करण्यासाठी आणि निष्पक्षता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी एक मानक म्हणून काम करेल. याची अंमलबजावणी करून विद्यापीठ आपल्या परीक्षांचा दर्जा वाढवू शकते. विद्यार्थ्यांच्या हिताचे रक्षण होऊ शकते. कुलगुरु प्रा.डॉ. महानवर यांनी यासंदर्भात सकारात्म क प्रतिसाद दिला. निवेदनाची प्रत कुलगुरु प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, परीक्षा नियंत्रक डॉ. श्रीकांत अंधारे यांनाही देण्यात आली. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड व देवानंद चिलवंत, सिनेट सदस्य प्रा.डॉ. भगवान अधटराव, सुटा उपाध्यक्ष प्रा.डॉ. शिवानंद भांजे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# महात्मा बसवेश्वर स्मारकासाठी जनआंदोलन उभारणार

## श्रीशैल हत्तुरे : मंगळवेढा येथे शिवयोग पदयात्रेचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १० जानेवारी-**

राज्य सरकारने मंगळवेढा येथील महात्मा बसवेश्वर स्मारकाच्या जागेसह निधी उपलब्ध करून द्यावे, अन्यथा स्मारकासाठी मंगळवेढा येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे यांनी दिला.

मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वर स्मारक जागृती अभियान आयोजित रेवणसिद्धेश्वर मंदिर येथून शिवयोग पदयात्रेस श्रीशैल हत्तुरे यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला, यावेळी हत्तुरे बोलत होते.

यावेळी हत्तुरे म्हणाले की, जगात प्रथमतः लोकशाहीची मुळे रुजविणारे व सर्वधर्म समतेचे प्रतीक असणारे महात्मा बसवेश्वर यांच्या स्मारकाचे काम पंधरा वर्षापासून प्रलंबित आहे. सरकारकडून स्मारकाचे काम पूर्ण होण्यासाठी हालचाल होताना दिसत नाही. त्यामुळे लिंगायत बांधवांच्या भावना दुखावल्या आहेत. त्यामुळे सरकारने त्वरित महात्मा बसवेश्वर स्मारकाचे काम मार्गी लावावे, अन्यथा मंगळवेढा येथे जनआंदोलन उभारणार असल्याचे हत्तुरे यांनी सांगितले.

यावेळी शिवयोग पदयात्रेचे संयोजक शिवानंद हैबतपुरे म्हणाले की, शिवयोग पदयात्रेच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वर यांचे सामाजिक कार्यासह त्यांच्या स्मारकाविषयी जनजागृती करण्यात येणार आहे. या पदयात्रेसाठी तेलंगणा, नांदेड, लातूर यासह जिल्ह्यातील विविध शहरातून लिंगायत शरणार्थी उपस्थित आहेत. यावेळी श्रीशैल मामा हत्तुरे, संयोजक नेतृत्व बसवकथाकार शिवानंद हैबतपुरे, दहीवाडीचे अण्णासाहेब पाटील, बसवराज पनशेट्टी, बसवराज गुडपे, विरूपाक्ष चिवरे, प्रशांत वाटणकर, साईनाथ भांडेकरी तेलंगणा, बसवराज स्वामी, आकाश मडिवाळ, चंद्रकांत शेटकर, धम्मपाल माशाळकर, शाम कुंभार, साईनाथ चंदापुरे, बापूसाहेब मेटकरी, विवेक खिल्लारे, किसन गजले, कैलास राखे, बालाजी गजले, दादाराव पाटील, माधव येरगे, लिंगायत महासभा तालुकाध्यक्ष अमोल म्हमाणे, शिवानंद पाटील आदी उपस्थित होते.




### दहा दिवस चालणार यात्रा

ही पदयात्रा शुक्रवार १० जानेवारी रोजी सुरू होऊन बोराळे, भंडारकवठे, मंद्रुप, वडकबाळ, सोरेगावमार्गे सोलापूरच्या सिद्धेश्वर समाधीपर्यंत पोहोचणार आहे. लिंगायत शरणार्थींनी पदयात्रेत सहभागी होण्याचे आवाहन हैबतपुरे यांनी केले.

## कर्नल रणधीर सतिश यांची यशवंतराव चव्हाण महाविद्यालयास सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १० जानेवारी-**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील एन.सी.सी. विभागास दिनांक ८ जानेवारी २०२५ रोजी ९ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. सोलापूर येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल रणधीर यांनी प्रशासकीय भेट दिली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील यांनी स्वागत केले. महाविद्यालयातील कॅडेटसने गार्ड ऑफ ऑनर करून त्यांना मानवंदना दिली. सदरच्या भेटीमध्ये त्यांनी एन.सी.सी. कडेट्सशी महाविद्यालयाच्या विजयश्री सभागृहामध्ये संवाद साधला. बी आणि सी सर्टिफिकेट परीक्षेच्या संदर्भात व एन.सी.सी. मधून मिळणाऱ्या करिअर संदर्भात मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगतातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी. पाटील यांनी कॅडेट्सला आपल्या अंगी असलेले शिस्त समाजातही कशी रुजवता येईल याविषयी प्रयत्न कसे करावेत, तसेच एन.सी.सी. कॅडेट्स म्हणून आपल्याकडे सकारात्मक भावना, देशाप्रती अभिमान असणे गरजेचे आहे याविषयी मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील कॅडेटसला वेळोवेळी विद्या विकास मंडळाचे सचिव विलासरावजी घुमरे सर, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, संस्थेचे सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, उपप्राचार्य संभाजी किर्दाक याचे एन.सी.सी. कडेट्सना मार्गदर्शन लाभते. यावेळी सुभेदार तानाजी चव्हाण व हवालदार बाळासाहेब पठाडे व एन.सी.सी. कॅडेट्स उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे कॅप्टन डॉ. विजया गायकवाड व आभार प्रदर्शन सि.टी.ओ. प्रा. राम काळे यांनी केले.



## गाडीला कट मारल्याच्या कारणावरुन बेदम मारहाण

### चौघांविरुद्ध गुन्हा दाखल; दुधनी परिसरातील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० जानेवारी-**

तालुक्यातील दुधनी रेल्वे फाट्याच्या पुढे मुगळी जाणाऱ्या रोडजवळ दुधनी येथे सहा जानेवारी रोजी दुपारी ४ वा. च्या सुमारास गाडीला कट मारण्याच्या कारणावरून आठ लोकांनी शिवीगाळ, दमदाटी करुन हाताने, लाथाबुक्क्याने तसेच लोखंडी टॉमीने हातावर, पाठीवर, पायावर मारहाण करुन जखमी केले. याबाबत दक्षिण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

संशयित आरोपी रवि राठोड, राजू राठोड, शंकर राठोड, बाबू राठोड (सर्व रा. किणीमोड तांडा, ता. अक्कलकोट) व इतर चार अनोळखी लोक यांच्या विरोधात दक्षिण पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला. फिर्याद अजय ऊर्फ अजित सुभाष राठोड यांनी दिली. दुधनी रेल्वे फाट्याच्या पुढे मुगळी जाणाऱ्या रोडजवळ फिर्यादीच्या गाडीला पाठीमागून जोराने धडक दिली. फिर्यादी चालकाने गाडी निट बघून चालविता येत नाही का असे विचारले असता एकता गाडीतून खाली उतरुन तूच माझ्या गाडीस कट्ट मारुन आम्हालाच विचारतो का असे म्हणून त्या सर्वांनी शिविगाळ, दमदाटी करुन हाताने, लाथाबुक्क्याने मारहाण करण्यास सुरुवात केले.

फिर्यादी त्यांना शिवी देऊ नका असे म्हणत असताना, शंकर राठोड याने सदर गाडीतून लोखंडी टॉमी बाहेर काढून हातावर, पाठीवर, पायावर मारहाण करुन जखमी केले म्हणून तक्रार आहे. अधिक तपास पोहेकॉ पाटील हे करीत आहेत.



# रामोत्सवानिमित्त संत तुकाराम महाराजांचे श्रीरामाविषयीचे चिंतन

**दि. २२ जानेवारी २०२४ रोजी आयोध्या येथे प्रभूरामचंद्राची प्राणप्रतिष्ठा संपन्न झाली त्यावेळी पौष शुध्द द्वादशी तिथी होती. तिथीनुसार आज १० जानेवारी २०२५ रोजी प्राणप्रतिष्ठा होऊन एक पूर्ण होत आहे. यानिमित्ताने श्री संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या अभंग गाथेतील रामाविषयीच्या अभंगाचा अभ्यास केला असता त्यांचे द्रष्टेपण दिसून येते.**

**ऐसा कर घर आवे राम । सब धंदा छोर ही काम ।।**
**इतने होते काहे खाता । जब तू अपना भूल न जाता ।।**
**अंतरजामी जानत साचा । मन मे एक और उपर बाचा।।**
**तुका प्रभू देश बिदेश । भरिया खाली नही लेश ।। (३४९५)**

हा अभंग संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे गाथेतील हिंदुस्तानी पदे या विभागातील ३४९५ क्रमांकाचा अभंग आहे. या अभंगातून संतश्रेष्ठ तुकाराम महाराज सूचित करीत आहेत भगवान श्रीरामाचे आयोध्येतील मंदिरात किती साली श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा होणार? मंदिराचे निर्माण कार्य केव्हा पूर्ण होणार? याचे संकेत अभंगातील क्रमांकातून देत आहेत. तसेच राम मंदिर निर्माण करणेसाठी काय करणे आवश्यक आहे ते सुचित करीत आहेत.

संत तुकाराम महाराज हे दृष्टे महात्मे होते. त्यांना रिद्धी सिद्धी प्राप्त होत्या. त्यांचे त्यांनी अवडंबर केले नाही. परंतु छत्रपती शिवरायांच्या विषयी आवश्यकता भासली त्यावेळेस त्यांनी प्रचिती आणून दिली. वरील अभंगातील

**ऐसा कर घर आवे राम । सब धंदा छोर ही काम ।।**

या पहिल्या चरणात घरात राम येईल असं कर. यामध्ये आपल्या शरीरातील हृदय मंदिरात श्रीराम यावेत हा अध्यात्मिक अर्थ झाला. परंतु संत तुकाराम यांना आध्यात्मिक अर्थाबरोबर त्याचा वेगळा अर्थ सुचित करावयाचा आहे. आपल्या घरात श्रीरामाला बोलवायचे म्हणजे घरात श्रीरामाची मूर्ती स्थापन करावी असा त्याचा अर्थ नसून श्रीरामाचे घरात राम येण्यासाठी कार्य कर असा त्याचा अर्थ आहे.

श्रीरामाची मंदिरे सर्व गावात आहेत. तीर्थक्षेत्रात आहेत. तेथे त्याची मूर्तीही आहे. त्यामुळे श्रीरामांचे घर, मंदिर आहे ते आयोध्येतच आहे. जसे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे सर्व गावात आहेत परंतु मुख्य स्थान पंढरपूर हे आहे. त्यामुळे अयोध्येतील घरात मंदिरात श्रीराम यावे त्यासाठी संत तुकाराम महाराज म्हणतात,

सब धंदा छोर ही काम । याचा अर्थ सर्व धंदा इतर गोष्टी व 'काम' सोड. म्हणजे श्रीराम घरात येतील. आपल्या चित्तातील काम आपल्या नष्ट झाला म्हणजे हृदयात राम प्रकट होतो. सर्वांच्या हृदयात राम प्रकट व्हावा म्हणजे राम राज्य निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. या ठिकाणी सब धंदा छोर ही काम असे तुकाराम महाराज म्हणत आहेत.

संत ज्ञानेश्वर माऊली हरिपाठातील अभंगात

**असूनी संसारी जिव्हे वेगु करी । वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ।।**
**ज्ञानदेव म्हणे व्यासाचीये खुणे । द्वारकेचा राणा पांडवा घरी ।।**

नुसते नाम घेऊन परमेश्वर आपल्या घरी येतो असे ज्ञानदेव या अभंगात म्हणतात. दोन संतांच्या शिकवणीतून अंतर दिसून येत असले तरी त्यात संत तुकाराम महाराजांचा काळ आणि ज्ञानदेव महाराजांचा काळ यातील अंतर आहे. संत तुकाराम महाराजांना नुसता हृदयाची राम आणणे हे अभिप्रेत नव्हते तर अनुकरण करणारा समाज निर्माण होणे अपेक्षित होते. हिंदुस्थानभर यवनी सत्ता प्रस्थापित होत होती. त्याचा प्रतिकार करणारा समाज निर्माण व्हावा हा त्यांचा हेतू होता. सर्वच ठिकाणी मुस्लिम सत्ताधीश होते. त्यांना महाराष्ट्रात सत्ता स्थापन करावयाची होती.

आपण पारतंत्र्यात जाण्याचे कारण संत तुकाराम महाराज पुढच्या चरणात सांगतात

**इतने गोते का हे खाता । जब तू अपना भूल ना जाता ।।**

अध्यात्मिक अर्थाने इतक्या गटांगळ्या खातो आहे त्याचे कारण आपण आपले संस्कार, आपली परंपरा सर्व विसरलो. म्हणून ही दशा झाली आहे. समाजासाठी त्याचा अर्थ - असा हिंदू समाज आपली वीरवृत्ती विसरला, इतिहास पुराण सर्व विसरला, म्हणून यवनी सत्ता प्रस्थापित होऊ शकली. श्रीराम, श्रीकृष्ण यांचे आदर्श घेतले असते तर असे झाले नसते. त्यांना तू विसरलास श्रीरामांनी वाली वध करताना झाडामागून बाण मारला. त्याचा वध केला. तो वालीचा वध नसून दुष्टांचे निर्दालन रामाने केले आहे. यज्ञा सारख्या शुभकार्यात सुबाहू , मारीच, त्राटिका यासारख्यांचा वध केला. श्रीरामांनी महिला आहे म्हणून त्राटीकेला सोडून दिले नाही. या गोष्टी आपण म्हणजे त्या वेळचे राज्यकर्ते विसरले. १५२६ साली बाबराने हिंदुस्तानवर आक्रमण केले. रजपुतांशी युद्ध झाले. रजपूत राजा राणासंगा याने बाबराचा पराभव केला. बाबर पळून गेला व तीर्थक्षेत्रात लपला म्हणून राणासंगाने त्याला सोडून दिला. बाबराने पुन्हा सैन्य जमवून राणासंगाचा वध केला आणि १५२८ मध्ये बाबराने अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या ढाच्यात मशीद निर्माण केली. काही रजपूत राजांच्या क्षमाशील वृत्तीचा फटका हिंदुस्तानला अनेक वर्ष भोगावा लागला. श्रीराम व श्रीकृष्णांनी शत्रूचे निर्दालन करण्यासाठी व धर्म संस्थापनेसाठी अवतार घेतला होता हे विसरले. आपण आपला सुवर्ण इतिहास विसरलो म्हणून ही वेळ आली. यासाठी आपल्यातीलच काही महाभाग संधी साधू कारणीभूत आहेत. त्यासाठी संत तुकाराम महाराज पुढील चरणात म्हणतात,



**आंतरजामी जानत साचा । मन मे एक और उपर बाचा ।।**

वरपांगी सर्व देखावा केला जातो. धर्माच्या नावाने मनात एक असते वरपांगी वेगळेच असते जशी म्हण आहे.

**मुह मे राम बगल मे छुरी ।**

तुकाराम महाराज त्यावेळच्या सामाजिक राजकीय परिस्थितीवर भाष्य करत आहेत. रजपूत राजे असतील, हिंदुस्थानातील इतर सत्ताधीश असतील, महाराष्ट्रातील सत्ताधीश असतील हे सर्व हिंदू असूनसुद्धा मुस्लिम सत्ताधीशांशी जवळीक साधून होते. हिंदुस्थानातील सर्व राज्यांनी एकत्रितपणे मुस्लिमांविरुद्ध, इंग्रजांविरुद्ध युद्ध केले असते तर .... हा जर तर चा विषय झाला, परंतु एकत्रित झाले नाहीत, काही रजपुतराजांनी तर मुघलांशी नातेसंबंध जोडले. या सर्वात छत्रपती शिवाजी महाराजांनी मात्र रामाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच स्वराज्य निर्माण केलेले दिसून येते. सध्याच्या परिस्थितीतसुद्धा काही शिवभक्त, शिवमुद्रा संसदेत दाखवून अहिंसेचा उदो उदो करताना दिसतात. ते ज्यांची शिकवण म्हणून महात्मा गांधींचा उल्लेख करतात ते महात्मा गांधी अहिंसा परमो धर्माः। म्हणतात. महाभारतातील हा अर्धवट श्लोकच ते सांगतात. खरे म्हणजे हिंदूंचे सर्व देवी देवता सशस्त्रधारी आहेत. महाभारतातील मूळ श्लोक अहिंसा परमो धर्मः । धर्म हिंसा तदैवच । याचा अर्थ अहिंसा मानवाचा श्रेष्ठ धर्म आहे. परंतु धर्म रक्षणासाठी हिंसा करणे त्याहूनही श्रेष्ठ आहे. अर्धवट श्लोक घेऊन हिंदूंचे नुकसान करण्याचे कामच यामागे दिसून येते. परवा एका भा.ज.पा. च्या कार्यकर्मात या महात्मा गांधींची 'रामधून' म्हटली गेली. त्याला विरोध झाला. महात्मा गांधींनी मूळ लोकप्रिय रामधून राम भजनातील पहिली ओळच घेतली व त्यामध्ये आपल्या मानसिक मनवृत्तीचा समावेश केला. त्यामुळे आपले लोक मूळ रामधून, रामभजन विसरले. रघुपति राघव राजाराम पतित पावन सिताराम ।

या मूळ भजनात ईश्वर अल्ला तेरो नाम, सबको सन्मती दे भगवान।। ही ओळ जोडली आहे. त्यामुळे सर्व लोक मूळ रामभजन विसरले हीच रामधून समजून गाऊ लागले. याचा विरोध भाजपा कार्यक्रमात झाला. मीडियात याची चर्चा झाली. मूळ रामधून

**रघुपती राघव राजाराम । पतित पावन सिताराम ।।**
**सुंदर विग्रह मेघश्याम । गंगा तुलसी शालिग्राम ।।**
**भद्र गिरीश्व र सीताराम । भगत जनप्रिय सीताराम ।।**
**जानकी रमणा सिताराम । जय जय राघव सीताराम ।।**

अशी आहे. सध्याच्या काळात सुद्धा जनुवेधारी ब्राह्मण झाले आहेत. काही जण चुनावी हिंदू झाले आहेत. या सर्वांच्या तोंडी मुहमे राम बगल मे छुरी असा व्यवहार दिसून येतो.

अंतिम चरणामध्ये संत तुकाराम महाराज म्हणतात,

**तुका प्रभू देश बिदेश । भरिया खाली नही लेश ।।**

जळी स्थळी काष्टी पाषाणी सर्वच ठिकाणी प्रभू भगवान आहेत. कुठेही टिचभर जागा शिल्लक नाही. हे केव्हा शक्य आहे ज्यावेळी सर्व समाजामध्ये रामाचा आदर्श निर्माण होईल. राज्यकर्ते प्रभू रामचंद्राच्या आदर्शांचे अनुकरण करतील. समाज आपल्या मनातील काम नष्ट करतील यावेळेस समाजमनात, घरात श्रीराम अवतीर्ण होतील. हे संत तुकाराम महाराज आपल्या अभंगातून सांगत असताना अयोध्येतील श्रीराम मंदिराचे निर्माण केव्हा होणार हे त्यांनी ३५० वर्षांपूर्वी आपल्या अभंग क्रमांकातून सुचित केले असावे. १५२८ साली मीर बाकी याने आयोध्येमधील श्रीराम मंदिराचे विवादीत ढाच्याचे मशीदीत रूपांतर केले. १५२८ सालापासून राम मंदिराचा लढा सुरू होता. भारत स्वतंत्र झाल्यानंतर सन १९४९ मध्ये श्रारामाची मुर्ती विवादीत ढाच्यामध्ये अवतीर्ण झाली. त्यावेळी न्यायालयात खटला सुरू झाला. त्यावेळेपासून विवादीत ढाच्यात श्रीरामाची पुजा सुरू झाली. सन १९२८ पासून एकूण ७६ लढाया झाल्या. त्यामध्ये ३ ते ४ लाख लोकांचे बलिदान झाले. १९८४ पासून विश्वहिंदू परिषद व धर्माचार्य यांनी राममंदिरासाठी आंदोलन सुरू केले. दि. ३० सप्टेंबर १९८९ पासून देशभरात ४० दिवस शिलापूजनाचे कार्यक्रम झाले. अडीच लाख गावांमध्ये शिलापूजन झाले. दि. ९ नोव्हेंबर १९८९ रोजी आयोध्येत शिलान्यास झाला आणि ६ डिसेंबर १९९२ रोजी विवादीत ढाचा उध्वस्त करणेत आला. ९ नोव्हेंबर २०१९ रोजा न्यायालयाने रामाच्या बाजूने निर्णय दिला. ५ ऑगस्ट २०२० रोजी श्रीराम मंदिराचे भूमिपूजन आदरणीय पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संपन्न झाले. संत तुकाराम महाराजांच्या अभंग क्र. ३४९५ यातील पहिले तीन अंक म्हणजे ३४९ हे 'शिवशकाचे साल' दाखवते. २२ जानेवारी २०२४ ला ३४९ हे शिवशक होते. शेवटचे तीन अंक ४९५ हे बाबरी मशीद निर्माण झालेले साल १५२८ मध्ये मिसळल्यास २०२३ हा आकडा येतो. सन २०२३ रोजी मंदिर निर्माणाचे काम पूर्ण झाले होते. मुहूर्त २२ जानेवारी २०२४ होता म्हणून त्या तिथीली प्राणप्रतिष्ठा केली.

३४९५ या अंकाची बेरी केली असता २१ येते. ५ ऑगस्ट २०२० रोजी श्रीराम मंदिराचे जरी भूमिपूजन झाले असले तरी सन २०२१ रोजी मंदिर निर्माण कार्यास सुरूवात झाली. गायत्री मंत्रामध्ये २४ अक्षर आहेत. वाल्मिक रामायण हे २४ हजार श्लोकाचे आहे. वाल्मिकी रामायणातील दर हजार श्लोकातील आद्याक्षर हे गायत्री मंत्रातील आहे. आता हा रामोत्सवाच्या वर्षपूर्ती निमित्त संत तुकाराम महाराज यांच्या दृष्टेपणाला शतशः नमन.

**- काशिनाथ थिटे-पाटील,**
विश्वस्त, श्री विठ्ठल-रूक्मिणी पादुका मंदिर विसावा, पंढरपूर

## संक्षिप्त वृत्त



### पोथरेच्या जि. प. प्राथमिक शाळेत फातिमाबी शेख यांची जयंती साजरी

**करमाळा, दि. १० जानेवारी-**

पोथरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत फातिमाबी शेख यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक गुरव, शगुफ्ता हुंडेकरी-शेख यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थिनींनी आपली मनोगते सादर करताना आम्ही आमचे शिक्षण अर्धवट न सोडता पूर्णतः स्वावलंबी बनून देशसेवा करु व भविष्यात देखील मुलींच्या शिक्षणासाठी हातभार लावून फातिमामाईंना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली वाहू अशी प्रतिज्ञा केली. आभार सविता शिरसकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाबिरा मिर्झा व लहू जाधव यांनी सहकार्य केले.



### करमाळ्यात नामदेवराव जगताप यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**करमाळा, दि. १० जानेवारी-**

विद्या विकास मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देशभक्त नामदेवराव जगताप यांची १०५ वी जयंती यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामध्ये संपन्न झाली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विन्रम अभिवादन केले. याप्रसंगी विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड यांनी नामदेवराव जगताप यांनी करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी उजनी धरण, मांगी धरण, कुकडी प्रकल्प कशा पद्धतीने राबवले. त्याचबरोबर तालुक्यातील गोरगरिब शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी विद्या विकास मंडळाचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाची स्थापना केली असे आपल्या मनोगतातून स्वर्गीय नामदेवरावजी जगताप यांच्या विषयी गौरवोद्गार काढले. यावेळी विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, संस्थेचे सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. वंदना भाग्यवंत यांनी केले. आभार प्रा. हनुमंत भोंग यांनी मानले.




### वैराग येथे संशोधन, विविध स्पर्धेत यश मिळविलेल्यांचा सन्मान

**वैराग, दि. १० जानेवारी-**

साई आयुर्वेद कॉलेज सासूरे फाटा, वैराग येथे संशोधन, डॉक्टरेट तथा विविध स्पर्धा परीक्षामध्ये यश मिळविलेल्या प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. साहेबराव गायकवाड होते. यावेळी साई चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा डॉ. मीरा सूर्यवंशी, स्मार्ट सिटी सोलापूरचे माजी सीईओ त्रिंबक ढेंगळे-पाटील उपस्थित होते. डॉ.सुरेश व्यवहारे आणि त्यांच्या टीमला भारत सरकारचे पेटंट मिळाल्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा. डॉ. दत्तात्रय पिसाळ, प्रदिप जाधव यांनी पीचडी प्राप्त केल्याबद्दल त्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. डॉ. अश्विनी गायकवाड यांची एमपीएससीमध्ये सहयोगी प्राध्यापकपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. प्रीतम इंगळे यांनी केले.

### दुधनीत विवाहितेचा छळ; पतीसह चौघांवर गुन्हा दाखल

**अक्कलकोट, दि. १० जानेवारी-**



तालुक्यातील दुधनी येथे २२ मे २०११ पासून ते २२ डिसेंबर २०२४ रोजी ११ वा. पर्यंत विवाहित महिलेस पती, सासू, नणंद व नणंदचा नवरा या सर्वांनी माहेरहून एक लाख रुपये व एक तोळे सोने घेऊन ये, मग तुला नांदवयास घेतो, पैसे व सोने घेऊन नाही आलीस तर तुला जीवंत ठेवणार नाही असे म्हणून शिवीगाळ, दमदाटी करुन उपाशी पोटी ठेवून मानसिक त्रास दिल्याबद्दल अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. आरोपी पती शांतलिंग बसण्णा सोन्नद, सासू हिराबाई बसण्णा सोन्नद, नणंद संगीता सुधीर गुनापुरे, नणदंचा पती चौडप्पा उर्फ सुधीर नाहप्पा गुनापुरे (दोघे रा. अफजलपूर) यांच्या विरोधात अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला.विवाहित महिला राणी शांतलिग सोन्नद हिने फिर्याद दिली. तपास पोहेकॉ पाटील हे करीत आहेत.

### पुरी हद्दीत विटाचा टेम्पो पलटी होऊन एक ठार, दोघेजण गंभीर जखमी

**बार्शी, दि. १० जानेवारी-**

बार्शीहून घारीकडे विटा घेऊन निघालेला टेम्पो पुरी हद्दीमध्ये पलटी झाल्याने एकजणाचा मृत्यू झाला असून, दोघेजण गंभीर जखमी आहेत. जखमींवर बार्शी येथील रुग्णालयामध्ये उपचार चालू असल्याची माहिती समोर आली आहे. सदरची घटना रात्री घडली आहे. टेम्पोचे टायर फुटल्यामुळे तो पलटी झाला आणि विटाखाली सापडून एकजण जागीच ठार झाला तर दोनजण गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी बार्शीतील रुग्णालयात दाखल केले आहे. या घटनेचा अधिक तपास पांगरी पोलीस करत आहेत.

## वुशू अजिंक्यपद स्पर्धेत बार्शीच्या नेहा घाडगेचे यश




**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० जानेवारी-**

नांदेड येथे दि. ७ व ८ जानेवारी रोजी झालेल्या ऑल महाराष्ट्र वुशू असोसिएशनच्या मान्यतेने व ऑल नांदेड जिल्हा वूशू असोसिएशन आयोजित २२ वी राज्यस्तरीय सीनियर (महिला व पुरुष) वुशू अजिंक्यपद स्पर्धा २०२५ स्पर्धेत बार्शीच्या ज्योतिर्लिंग स्पोर्ट्स क्लबची खेळाडू नेहा घाडगे हिने महिला गटात झालेल्या राज्यस्तरीय वुशू स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावल्याबद्दल तिचे अभिनंदन केले. नेहा घाडगे हिला संस्थेचे अध्यक्ष भगवान जाधव सर, वूशू प्रशिक्षक फुलचंद जावळे, सचिव सविता जाधव, उपाध्यक्ष गणेश रोडे, संचिती जाधव, स्नेहल रोडे यांचे तिला मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. नेहाच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### टेंभुर्णीत पत्रकारांचा सत्कार

**टेंभुर्णी, दि. १० जानेवारी-**

पत्रकार दिनाचे औचित्य साधून पत्रकार बांधवांचा अमोल धोत्रे मित्र परिवाराच्या वतीने मानसन्मान करण्यात आला. यावेळी मी वडार महाराष्ट्राचे पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्ष अमोल धोत्रे, अमरसिंह शेंडे, हरिश्चंद्र गाडेकर, सचिन पाटील, राहुल तिपाले, नितीन पाटील, अमोल पाचंगे, रोहित ढावरे, विकी गोंदिल, विलास कोठावळे, विरांग मेथा, गणेश थोरात, सोमनाथ पावसे, अमोल मदने, अक्षय मेथा, शुभम मस्के, कईस मोमीन, ओम पोतदार, धनंजय मोरे, सज्जन शिंदे, गणेश पोळ, सतीश काळे, सचिन होदाडे, संतोष वाघमारे, अण्णा पवार, संतोष पाटील, अनिल जगताप, सिद्धेश्वर शिंदे, विष्णू बिचकुले, सोपान ढगे, सतीश चांदगुडे, सुहास साळुंखे, धनंजय भोसले, सूरज देशमुख, नाथा सावंत, दीपक देशपांडे, सचिन जगताप, गणेश भोसले, सज्जन शिंदे उपस्थित होते. प्रास्ताविक अमोल धोत्रे यांनी केले. कार्यक्रमासाठी कृष्णा धोत्रे, आकाश धोत्रे, सुनील पवार, मनेष धोत्रे, गोपाळ पवार, कालिदास पवार, बापू चव्हाण, प्रकाश धोत्रे, अक्षय मुसळे, यश जाधव, लखन गायकवाड, दादा माने, स्वप्निल कुंभार, जॉकी सुर्वे, विकास माने, ओंकार चव्हाण, बाप्पा पवार, सिद्धेश्वर इंगोले, आनंद स्वामी, रोहन जाधव, दीपक मासुळे, शंभू तांदळे, बालाजी जगताप, प्रेम जगताप, शुभम माने, सौरभ घोडके, भाऊ माने, विशाल चांगुने, योगेश साळुंखे, अजित गोंदिल, दादा पवार, लहु पवार, सचिन जगताप, नवा पाचंगे, गणेश आरडे, विवेक वाघमोडे, चेतन मुसळे, बाबा काळे, जय सदाफुले, गणेश सुर्वे, भाऊ लोंढे, परवेज शेख, मयूर माने, भागवत यमपुरे, खुशाल साळुंखे, भाईजान मुलाणी यांनी परिश्रम घेतले.



### उत्तर पोलिस ठाण्यातर्फे पत्रकारांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १० जानेवारी-**

पत्रकारांमुळे अनेक समस्यांचा व जटील प्रश्नांचा उलगडा होतो. पत्रकारांमुळे प्रशासनावर नैतिक दबावाचा अंकुश असतो. लोकशाहीचा चौथा स्तंभ पत्रकारिता अबाधित राहणे आवश्यक असल्याचे प्रतिवादन अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशन पोलीस निरिक्षक राजेद्र टाकणे यांनी केले. पत्रकार दिनानिमित्त उत्तर पोलीस स्टेशन अक्कलकोट यांच्या वतीने पत्रकारांचा सत्कार करण्यात आला, याप्रसंगी ते बोलत होते. दक्षिण पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक महेश स्वामी, गजानन शिंदे, उपाध्ये, मंगरुळे, कुंभार उपस्थित होते. ज्येष्ठ पत्रकार बाबा निंबाळकर, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद शाखा अक्कलकोट तालुकाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, डिजीटल मिडिया संघटना तालुकाध्यक्ष मारुती बावडे, प्रविण देशमुख, स्वामीराव गायकवाड, राजेश जगताप, बबलू पठाण, रमेश भंडारी, शिवानंद फुलारी, चेतन जाधव, योगेश कबाडे, अरविंद पाटील, सैदप्पा इंगळे, विरुपाक्ष कुंभार, बसवराज बिराजदार, दयानंद दणुरे, शिवा याळवार, आदित्य अंबुरे, गणेश भालेराव, सोमशेखर जमशेट्टी उपस्थित होते.



### कवठेकर प्रशालेत फुले जयंती साजरी

**पंढरपूर, दि.१० जानेवारी-**

पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या द.ह. कवठेकर प्रशालेत आद्य शिक्षिका, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून संपन्न झाली. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी, उपमुख्याध्यापक एस. एस. रुपनर, ज्येष्ठ शिक्षिका माळी, व्ही. पी. मोरे यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक कलाशिक्षिका पूनम दळवी यांनी केले. माळी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा परिचय करून दिला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी होते. ज्येष्ठ शिक्षक डी. बी. पाटोळे यांनी भारतीय संविधानाची माहिती दिली व संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन घेतले. याप्रसंगी अनुष्का पाटोळे, दीक्षा भोसले, शर्वरी म्हेत्रे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन एस. एस. फडके यांनी केले तर आभार स्वाती शिंदे यांनी मानले. एम.बी. कुलकर्णी यांचे सहकार्य लाभले.

### सरकारी कामात अडथळा: आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर

**बार्शी, दि. १० जानेवारी-**

बार्शी येथील सत्र न्यायाधीश श्री. चव्हाण साहेब यांनी सरकारी कामात अडथळा केल्याच्या गुन्ह्यात संशयीत आरोपी किशोर मांजरे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला.यात अधिक माहिती अशी की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सुनिल हेळकर यांनी किशोर मांजरे यांचे विरुध्द कार्यालयात येऊन शिवीगाळ करुन सरकारी कामात अडथळा केल्याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली. सदर फिर्यादीनुसार किशोर मांजरे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने किशोर मांजरे यांनी बार्शी सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला. अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी होऊन सत्र न्यायाधीश चव्हाण साहेब यांनी दि. ८ जानेवारी रोजी किशोर मांजरे यांचा अटकपूर्व जामीन मंजूर केला. सदर अटकपूर्व जामीन अर्जाचे काम ॲड. अमोल अलाट व ॲड. विशाल गोणेकर यांनी पाहिले.

# वैराग भागातच वाघोबाचा घरोबा

### चार दिवसांपासून जनावरांवर हल्ले सुरुच; नागरिक भयभीत, बंदोबस्त करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १० जानेवारी -**

वैराग भागामध्ये सलग चौथ्या दिवशी वाघाचे हल्ले सुरूच असून शुक्रवारी पहाटे लाडोळे हद्दीतील बनू सावंत यांच्या गाईवर हल्ला करून ठार मारले आहे. दरम्यान गेल्या चार दिवसांपासून वाघाचे हल्ले सुरू असल्यामुळे शेतकऱ्यांसह ग्रामस्थ भयभीत झाले असून लवकरच वाघास ताब्यात घ्यावे अशी मागणी करू लागले आहेत.

मुंगशी (आर), सासुरे, राळेरास आणि लाडोळेमध्ये सलग दोन दिवस वाघाने हल्ले करून पाच जनावरांना ठार केले असून एकास गंभीर जखमी केले आहे. दरम्यान शुक्रवारी लाडोळे येथील साठवण तलावाशेजारी बनू सावंत यांच्या जनावरांच्या गोठ्यामध्ये बांधलेल्या गाईवर हल्ला करून गाईस ठार मारले आहे. बनू सावंत हे शेतामध्ये गाईंच्या धारा काढण्यासाठी सकाळी सहा वाजता गेले असता त्यांना गाईवर हल्ला केल्याचे दिसून आले. यावेळी मोठा प्रकाश आणि साऊंड सिस्टिम शेतकऱ्याने चालू ठेवली होती. मात्र तरीदेखील वाघाने शिकार साधलीच. त्यामुळे वन विभागाने दिलेल्या सूचना निष्क्रिय ठरत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या घटनेचा पंचनामा सुरू असतानाच तेथून अवघ्या दीडशे मीटर अंतरावर केळीच्या बागेमध्ये गवत काढण्यासाठी गेलेल्या महिलेला वाघ दिसल्याचे समोर आले आहे. दरम्यान गावामध्ये वाघ दिसू लागल्याने शेतात काम करण्यासाठी आलेल्या महिला दुपारीच काम सोडून घरी परतल्या सध्या



कांदा, तुरी काढणीचे काम असून हरभरा खुरपणी सुरू आहे. सध्या शेतामध्ये कामे सुरू असल्याने मजुरांची रेलचेल आहे. मात्र वाघाच्या दहशतीमुळे शेतामध्ये मजूरच काय मालकदेखील फिरकायला जात नसल्याचे चित्र आहे. त्यानंतर लाडोळे गावाशेजारी असलेल्या हळदुगे येथील गोवर्धन आगलावे यांच्या शेतामध्ये तोडणी सुरू असताना पवन गाडेकर या ऊस तोडणी कामगाराच्या समोरच वाघाने दर्शन दिल्यामुळे ऊस तोडणी कामगारांसह मुकादमाने शेतातूनच पळ काढला. यावेळी घटनास्थळी वनपरिक्षेत्र अधिकारी अलका करे, वन परिमंडल अधिकारी धनंजय शिदोळकर, वनपाल गणेशपुरी यांच्यासह वन कर्मचाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली.

> ज्या गावांमध्ये वाघाचा वावर आढळला आहे. त्या गावांमध्ये रात्रीऐवजी दिवसा वीज देण्यासंदर्भातला निर्णय घेण्यात आला असून आज किंवा उद्यापासून वीज दिवसा सुरू होईल.
>
> **-एस. व्ही. कुराडे,**
> कार्यकारी अभियंता, महावितरण

> गेल्या चार दिवसांपासून वाघ आमच्या परिसरामध्ये वावरत आहे. मात्र वनविभाग केवळ पंचनामा करण्या व्यतिरिक्त काहीही करत नाही. त्यामुळे आम्हाला मानसिक दडपणासोबत भीतीचाही सामना करावा लागत आहे.
>
> **-मेजर सुखदेव जगताप,**
> हळदुगे



## सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त मोफत वह्यांचे वाटप

### माढा येथील महात्मा फुले प्रतिष्ठानच्या वतीने सावित्रीच्या लेकींसाठी उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १० जानेवारी-**

महात्मा फुले प्रतिष्ठान माढा यांच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने शहरातील जिल्हा परिषदेच्या मुलींच्या शाळेमध्ये सर्व मुलींना मोफत वह्याचे वाटप केले.प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष तथा नगरसेवक अजिनाथ माळी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

याप्रसंगी नगराध्यक्षा ॲड. मिनल साठे, उपनगराध्यक्ष कल्पनाताई जगदाळे, गटनेत्या संजीवनी भांगे, महात्मा फुले प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ हनुमंत क्षीरसागर ,सचिव लक्ष्मण राऊत, सदस्य धनाजी वसेकर नगरसेविका सुनीता राऊत अर्चना राऊत विद्या शिरसागर निर्मला थोरात शबाना बागवान, रेश्मा लंकेश्वर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन साठे मुख्याध्यापक सुरेश माळी यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका उपस्थित होते. याप्रसंगी नगराध्यक्षा ॲड. मिनल साठे, डॉ. विद्या क्षीरसगाकर, लक्ष्मण राऊत, चार्टर्ड अकाऊंटंट अंकिता भांगे, दीप्ती कदम यांनी मार्गदर्शन केले. चार्टर्ड अकाउंटंटपदी निवड झालेल्या सावित्रीच्या लेकी अंकिता भांगे व दीप्ती कदम यांचा सन्मान करण्यात आला. तिसरीतील विद्यार्थिनी कृष्णप्रिया चव्हाण आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वेशभूषेतील मानसी डोईफोडे यांनी साकारलेली भूमिका लक्षवेधक ठरली. सूत्रसंचालन नीता गिरी व विजया पवार, आभार वैजिनाथ मोगल यांनी मानले.

## ज्योतिष शास्त्र, वास्तूविशारद डॉ. शरद आहेर यांनी घेतले सहकुटुंब स्वामींचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० जानेवारी-**



नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंतचे रहिवासी व देशातील सुप्रसिद्ध ज्योतिष शास्त्र व वास्तु विशारद डॉ. शरद आहेर यांनी येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन सहकुटुंब श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले.

याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी डॉ. शरद आहेर व कुटुंबीयांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी बोलताना डॉ. शरद आहेर यांनी आपला जन्म हा अमेरिका, इंग्लंड, युरोप, ऑस्ट्रेलिया, रशिया इत्यादी पाश्चात्य व पौर्वात्य खंडात झाला नसून तो पवित्र भारत मातेच्या भूमिवर झालेला आहे. साधू संतांची व महात्म्याची ही भारतभूमी आहे. या भारत भूमीवर श्री.स्वामी समर्थ महाराजांची थोर महिमा आहे. यामुळे या वर्षात व्यसनी नागरिकांना स्वामींनी सद्बुद्धी द्यावी, व्यसनमुक्त व निरोगी भारत घडावा याकरिता आज येथील श्री वटवृक्ष स्वामींचे दर्शन घेऊन स्वामींच्या चरणी व्यसनमुक्त भारताचा संकल्प सोडला असल्याचे मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी प्रथमेश इंगळे, व्यंकटेश पुजारी, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, श्रीपाद सरदेशमुख, सिद्धाराम कुंभार आदिसह भाविक भक्त उपस्थित होते.

## ग्रामपंचातींसह सर्व निवडणुका भाजपा ताकदीनिशी लढविणार

### माळशिरसला माजी आ. राम सातपुते यांनी केले लक्ष्य

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १० जानेवारी-**



देशात व राज्यात सध्या भाजपाप्रणित महायुतीचे सरकार सत्तेत आहे. यामुळे आगामी सर्व माळशिरस तालुक्यातील निवडणुका अगदी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगरपंचायत, नगरपरिषद पूर्ण ताकदीनिशी लढविणार असल्याचे माळशिरस तालुक्याचे माजी आ. राम सातपुते यांनी सांगितले.

पिलीव येथे विकासकामांची पाहणी करण्यासाठी ते आले असता त्यांनी सर्वच निवडणुका भाजप तसेच महायुती माळशिरस तालुक्यात पूर्ण ताकदीनिशी लढविणार असल्याचे सांगितले. देशात व राज्यात भाजपचे सरकार असल्याने विकासकामांना निधी अजिबात कमी पडू देणार नाही. पिलीव-माळशिरस रस्ता, महालक्ष्मी देवी मंदिर परिसर यासाठी अजून निधी उपलब्ध करुन देणार, पिलीव येथे सुसज्ज असे बसस्थानक यासाठी निधी उपलब्ध करुन देणार तसेच झिंजेवस्ती-पिलीव कनॉलवरील दादर पुलासाठी एक कोटी रुपयांचा निधी लवकरच उपलब्ध करुन देणार आहे. सध्या निवडून आलेले लोकप्रतिनिधी विकास कामाचे बोलण्याऐवजी वायफळ बोलीत आहेत. त्यांना जनतेने संधी दिली आहे. विकासकामे करावीत असा टोला लगाविला. पिलीव गाव विकासकामांसाठी मी दत्तक घेतो असे आश्वासन त्यांनी दिले. तर मी मंजूर केलेल्या कामाचे उद्‌घाटन सुद्धा मीच करणार असे त्यांनी सांगितले. राम सातपुते यांनी भाजपासारख्या मोठ्या राष्ट्रीय पक्षाचे आपण मोठ्या संख्येने सभासद होण्याचे आवाहन केले.

> **तिरंगी निवडणुकांचे संकेत**
>
> राम सातपुते यांच्या पिलीव येथील दौऱ्यामुळे आगामी पिलीव ग्रामपंचायत भाजपा-महायुती लढविण्याचे संकेत दिल्याने आगामी निवडणूक तिरंगी होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. याचा फटका सत्ताधारी जहागिरदार पार्टीला बसणार की विरोधी नागरी आघाडीला हे येत्या निवडणुकीत स्पष्ट होईल.



## श्री विठ्ठल-रूक्मिणीमातेच्या चरणी सहा लाखांचे सोन्याचे दागिने अर्पण

**पंढरपूर, दि. १० जानेवारी-**

श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरे समितीस सुमित मोरगे या दानशुर भाविकांकडून ६ लक्ष किंमतीने सोने-चांदी दागिने अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. यामध्ये गोफासह लिंग, बेलपान, मंगळसुत्र, बाजूबंद इत्यादी ८१ ग्रॅम वजनाचे सोने वस्तू तसेच ७५ ग्रॅम वजनाचे चांदीची करंडे, वेढणे जोड वस्तू दान केली आहे. संबंधित भाविक हे नांदेड येथील रहिवाशी असून, श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे निस्सिम भक्त आहेत. त्यांनी यापूर्वी मंदिर समितीस श्री विठ्ठल गाभारा व श्री रूक्मिणी गाभारा येथील मेघडंबरीला चांदी लावून दिलेली आहे.

## पंढरपुरात २२ जानेवारीपासून वक्तृत्व स्पर्धा, कलोत्सव

### कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या वतीने विवेकानंद जयंतीनिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १० जानेवारी-**

गेली सतरा वर्षे पंढरीत कार्यरत असणाऱ्या कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या वतीने पंढरीतील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे म्हणून प्रतिवर्षी विवेकानंद जयंती निमित्त वक्तृत्व स्पर्धेचे व कलोत्सव २०२५ च्या अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. सदर स्पर्धा विविध शालेय गटात घेतल्या जाणार आहेत. रोख रक्कम, संस्थेचे मानचिन्ह, सहभाग प्रमाण पत्र असे पारितोषिकाचे स्वरुप आहे. सदर स्पर्धा दिनांक २२ व २३ जानेवारी २०२५ रोजी पांडुरंग भवन, कालिका देवी चौकाजवळ संपन्न होणार आहेत.

वक्तृत्व स्पर्धेचे विषय व गट या प्रमाणे (अ गट- इयत्ता १ली ते ४ थी), माझी आवडती सहल, माझी ताई, मला आवडलेली स्वामी विवेकानंदांची गोष्ट, माझी शाळा, माझी बाग, माझा आवडता प्राणी (ब गट--इयत्ता ५ वी ते ८वी)१) माझा आवडता कवी २) मातृभक्त विवेकानंद, शिवरायांचा गनिमी कावा, देशभक्त भगतसिंग, माझा आवडता छंद, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पद्मभूषण कै. झाकीरभाई हुसेन. (क गट--इयत्ता ९वी ते १२वी)- विज्ञाननिष्ठ स्वातंत्र्यवीर सावरकर, उदंड झाले पुरस्कार, मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व, रतनजी टाटा एक आदर्श उद्योजक, सातासमुद्रापार स्वामी विवेकानंद, शिवाजी महाराज मॅनेजमेंट गुरु, जीवनाला आकार देणारी कला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कलासाधनाचे अध्यक्ष श्रीकांत बडवे महाजन यांच्यासह मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. विनायक परिचारक, ज्ञानेश्वर मोरे, अमरसिंह चव्हाण सर, अभियंता राजेंद्र माळी साहेब, रणजीत पवार, अरिहंत कोठाडिया, अक्षय अनिरुद्ध बडवे, डॉ. किरण बहिरवाडे, अभिराज बडवे, प्रा. राजेंद्र मोरे, राजकुमार शहा, जगदीश खडके, राजकुमार आटकळे, बसवराज बिराजदार, महेश अंबिके, भिमराव औसेकर, विष्णुकांत बोंबलेकर, अमृतभाई शहा, अनंता नाईकनवरे, महेश देशपांडे, नारायण बडवे, मंदाकिनी देशपांडे, डॉ. मैत्रेयी केसकर, प्रतिभा यादव, आरती बोरखेडकर, वैष्णवी देशपांडे, गौरी देशपांडे, सागर विश्वासे आदी कलासाधनाचे सदस्य विशेष प्रयत्नशील आहेत.

> **विविध स्पर्धाही होणार**
>
> या सोबतच सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, नृत्य स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, विविध वेशभूषा याही स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## चाकूचा धाक दाखवून महिलेवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जानेवारी -**



चाकूचा धाक दाखवून एकटी असणाऱ्या एका महिलेवर नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना कळंब तालुक्यातील एका गावात घडली. कळंब तालुक्यातील एका गावातील एक ३९ वर्षीय महिला (नाव- गाव गोपनीय) ही दिनांक ७ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास घरात एकटी होती. त्यावेळी एका तरुणाने तिच्या घरात घुसून तिला चाकूचा धाक दाखवून तु माझ्यावर केस केलीस तर तुला संपवून टाकतो अशी धमकी देवून तीच्यावर लैंगीक अत्याचार केला.

पिडीत महिलेने दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं. कलम ६४,३३३, ३५१(२) अन्वये आरोपी तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## भाजपा, महिला मोर्चा सदस्य नोंदणी अभियान

**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महिला मोर्चा प्रदेश अध्यक्षा तथा आ.चित्राताई वाघ, संघटन पर्व सदस्यता अभियानाचे महाराष्ट्र राज्य प्रभारी रवींद्र चव्हाण तसेच तुळजापूरचे आ.राणाजगजितसिंह पाटील, मा.आ.सुजितसिंह ठाकूर यांच्या नेतृत्वात जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य-पाटील, प्र.का.सदस्य अनिल काळे, सदस्य नोंदणी अभियान जिल्हा प्रमुख इंद्रजीत देवकते यांच्या मार्गदर्शनात आयोजक मिनाताई सोमाजी यांच्या वतीने सदस्यता नोंदणी अभियान राबविण्यात आले. यावेळी प्रमुख भा.ज.पा.चे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत नोंदणीस प्रारंभ करण्यात आली. यावेळी भाजप महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष नंदाताई पूनगडे, नगरसेविका हेमा कदम, रूपाली घाडगे, लता सोमाजी, सविता भोसले, लता हरवळकर, अरुणा कावरे, राधा घोगरे, शिला कदम, नमिता डावखरे या कार्यक्रमासाठी शहरातील असंख्य महिला व भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ठेवीदारांनी आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क साधावा

**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

राजस्थानी मल्टीस्टेट को.ऑपरेटीव्ह केडीट सोसायटी लि. परळी वैजीनाथ शाखा उमरगा येथे ज्या ठेवीदारांनी ठेवी ठेवल्या आहेत, त्यांचे ठेवीची मुदत संपल्यानंतर ठेवीच्या रक्कमा परत मिळालेल्या नाहीत.तसेच ज्यांचे बचत खात्यावरील/पिग्मी खात्यावरील रक्कम परत मिळालेल्या नाहीत अशा ठेवीदारांनी ठेवी ठेवलेल्या ठेवीचे प्रमाणपत्र,पास बुक व आधारकाई यांचे छायांकित प्रतीसह आर्थिक गुन्हे शाखा,पोलीस अधीक्षक कार्यालय,धाराशिव येथे संपर्क साधावा,असे आवाहन आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक गणेश कानगुडे यांनी केले आहे.

## सैन्य पूर्व प्रशिक्षणाची मोफत संधी

**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलात अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Combined Defence Dervice (CDS) या परीक्षेची पूर्व तयारी करुन घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र,नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी २० जानेवारी ते ४ एप्रिल २०२५ या कालावधीत उऊड कोर्स क्रं.६४ आयोजित करण्यात आले आहे.कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थीना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते. जिल्हयातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, धाराशिव येथे १६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता मुलाखतीस हजर रहावे. पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येताना सोबत घेऊन यावेत एस.एस.बी वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे उमेदवार लोकसंघ आयोग नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येणाऱ्या सी.डी.एस. या परीक्षेकरिता ऑनलाईन द्वारे अर्ज केलेला असावा. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी,छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड,नाशिक यांचाईमेल आयडी : training. petcnashikgmail.com व दुरध्वनी क्रमांक ०२५३ -२४५१०३२ किंवा व्हाटसअप क्र. ९१५६०७३३०६ असून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, धाराशिव यांनी केले आहे.

# तुळजाभवानीस शेषशाही अलंकार महापूजा

## शाकंभरी नवरात्र महोत्सव : चौथ्या माळेनिमित्त देवीजींची पुजा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१० जानेवारी -**



शाकंभरी नवरात्र महोत्सवातील चौथ्या माळेनिमित्त १० जानेवारी रोजी श्री आई तुळजाभवानी देवीस शेषशाही अलंकार महापूजा मांडण्यात आली होती.

श्री.तुळजाभवानीच्या आज नित्योपचार पुजा आणि अभिषेक पूजेनंतर देवीस शेषशाही अलंकार महापूजा मांडण्यात आली. या दिवसाचे महत्व भगवान विष्णू क्षिरसागरामध्ये शेष शैयावरती विश्राम घेत असताना मातेने त्यांच्या नेत्र कमलात जावून विश्राम घेतला. यावेळी भगवान विष्णू यांच्या दोन्ही कानातून निघालेल्या मला (मळ) पासून दोन दैत्य उत्पन्न झाले. त्यांची नावे शुंभ व निशुंभ आहेत. ते उत्पन्न होताच शेष शैयावरील विष्णूवरती आक्रमण करण्यास जाऊ लागले. त्यावेळी नाभी कमलात विराजमान असलेल्या ब्रम्हदेव यांनी विष्णूच्या नेत्र कमलात विश्राम घेणाऱ्या देवीची स्तूती करुन श्रीस जागविले व विष्णूवरती आक्रमण करणाऱ्या दैत्यांचा वध श्री तुळजाभवानी मातेने केला म्हणून विष्णूने आपले शेष शैया श्रीस विश्राम करण्यासाठी दिले. त्यामुळे ही शेषशाही अलंकार महापूजा तुळजाभवानी देवीस मांडण्यात येते.अशी आख्यायिका सांगितली जाते.

शाकंभरी नवरात्र महोत्सवात दररोज नियमित श्री तुळजाभवानी देवीचे विविध धार्मिक विधी पारंपरिक पद्धतीने विधीवत पार पाडले जातात. आज पाचव्या माळेनिमित्त देवीची भव्य जलयात्रा काढण्यात येणार आहे.

सुहासिनी आणि कुमारीका मोठ्या संख्येने या जलयात्रेमध्ये सहभागी होतात. दरम्यान, काल गुरुवारी रात्री श्री देवीची वाहनावरून छबिना मिरवणूक काढण्यात आली. त्याचवेळी मंदिरातील देवीच्या गाभाऱ्यात प्रक्षाळ पूजेसाठी शहरातील नागरिकांनी गर्दी केली होती.

छबिनासाठी पुजारी, भाविक-भक्त आणि मंदिर कर्मचारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागरीकांच्या तक्रारीना सर्वोच्च प्राधान्य द्या

### खा.ओमप्रकाश राजेंनिंबाळकर यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

जिल्हयातील नागरीकांच्या प्रशासनाकडील तक्रारीच्या अनुषंगाने तालुकास्तरीय आढावा बैठकीचे आयोजन ऑगस्ट महिन्यात सर्व तालुक्याच्या ठिकाणी करण्यात आले होते. या आढावा बैठकीदरम्यान भुम(१५९ तक्रारी), परांडा (६७ तक्रारी), तुळजापुर (९९ तक्रारी), उमरगा (१५१ तक्रारी), लोहारा (९७ तक्रारी), वाशी (८२ तक्रारी), कळंब (४८ तक्रारी) तसेच आज फेर आढावा बैठकामध्ये (२५० तक्रारी) एकुण ९५३ प्राप्त झालेल्या नागरीकांच्या तक्रारीचा फेर आढावा खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आ. कैलास पाटील, आ. प्रविण स्वामी यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी सचिन ओम्बासे, जिल्हा परीषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष यांच्यासह नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, धाराशिव येथे आज घेण्यात आली. नागरीकांच्या तक्रारीचे निवारण करत असताना सर्वसामान्य नागरीकांच्या कामास प्राधान्य देण्याबाबत अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आल्या. बैठकीदरम्यान प्राप्त झालेल्या ९५३ तक्रारीपैकी ५७२ तक्रारींचे तात्काळ निवारण करुन नागरीकांना दिलासा देण्याचे काम खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केले. उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, तालुका कृषी अधिकारी, विविध राष्ट्रीयकृत बँकाचे व्यवस्थापक तसेच महाराष्ट्राचे विद्युत वितरण कंपनी व सर्व खात्याचे जिल्हास्तरीय अधिकारी व संबंधीत अधिकारी समवेत घेण्यात आली.

## कवितेच्या भावविश्वात महाविद्यालय रमले

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१० जानेवारी -**

माऊली रुक्माई तुळसाई प्रतिष्ठान, व कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग, यांच्या संयुक्त विद्यमाने 'आई' एक दिवसीय साहित्य संमेलन थाटात संपन्न झाले. संमेलनाचे हे चौथे वर्ष आहे.

कार्यक्रमाची सुरुवात कमल नलावडे यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनाने झाली. ग्रंथदिंडी डॉ. सुलभा देशमुख यांच्या शुभहस्ते काढण्यात आली. ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पुजन झाले. यावेळी प्राचार्य. डॉ.सुभाष राठोड, प्रा.रणजित दांगट, डॉ.सुभाष जोगदंडे, डॉ.हशमबेग मिर्झा, डॉ.दयानंद भोवाळ, डॉ.तुळशिराम दबडे, डॉ. दिपक जगदाळे, अधिक्षक धनंजय पाटील, शिवाजीराव घुगे अणदुर यांची प्रमुख उपस्थिती होती.

मातोश्री पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये डॉ.सुलभा देशमुख (माजी प्राचार्य), डॉ.रेखा ढगे (कवयित्री), तृप्ती काटकर यांचा समावेश होता. तर सुरभी बी. के. (गीतकार), प्रा.डॉ.दिपक जगदाळे नळदुर्ग यांना विशेष सन्मान देऊन गौरविण्यात आले. या संमेलनात आई विषयावर घेतलेले कवी संमेलन अतिशय रंगतदार झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शिवाजी गायकवाड हे होते.तर प्रमुख पाहूणे डॉ.रेखा ढगे, अरविंद हंगरगेकर हे उपस्थित होते. या संमेलनातील सहभागी कवी डॉ.मधुकर हजरे, नागोराव सोनकुसरे, रुपेशकुमार जावळे, सुरभी भोजने, गणेश मगर, बाळासाहेब मगर, महाविद्यालयीन विद्यार्थीनी शिवानी जगताप, स्नेहल जाधव, निकिता घुगे, निकिता जाधव, प्रज्ञा सुरवसे यांनी कविता सादर केल्या. आईच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित कार्यक्रमाचे आयोजन रमेश पुदाले, विनायक पुदाले, सुनील उकंडे, कविता पुदाले, डॉ.अरविंद हंगरगेकर, डॉ.रुपेशकुमार जावळे, डॉ.सुभाष जोगदंडे, डॉ.डी.जी.जाधव, डॉ. एच.एम.मिर्झा, डॉ.पी.एस.गायकवाड, प्रा.अशिष हंगरगेकर डॉ.संतोष पवार, सदस्य माऊली रुक्माई तुळसाई प्रतिष्ठान यांनी केले होते.

## शिक्षणावर खर्च करणे महत्वाचे : प्राचार्य जयप्रकाश कोळगे

**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

प्रत्येक आई-वडिलांची मुलांचा वाढदिवस साजरा करण्याची इच्छा असते. त्यावर खर्चही मोठ्या प्रमाणात करतात. मात्र वाढदिवसानिमित्त करण्यात येणाऱ्या खर्चापेक्षा शिक्षणावर खर्च करणे महत्वाचे आहे. शिक्षण घेतले तर त्यांचे भविष्य घडेल, असे प्रतिपादन प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी केली. ते रुईभर येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

विदर्भातील सुनील वडाळ विद्यालयास सदिच्छा भेट देण्यासाठी आले होते. यावेळी त्यांनी इ.१० वी व इ.१२ वीच्या प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास २१ हजार रुपयाची शिष्यवृत्ती देण्याची इच्छा व्यक्त केली. यांप्रसंगी माजी जि.प.सदस्य रामदास कोळगे, माजी ग्रा.पं.सदस्य राजनारायण कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, श्री स्वामी समर्थ कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, इंदिरा गांधी प्राथमिक प्रशालेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक डोंगरे के.ए,भारती वडाळ, राहुल कडू, मयुरी कडू, रमेश कडू,शिला कडू, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**धाराशिव :** लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या पत्नी अमिता ओम बिर्ला यांनी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. त्यांनी आई तुळजाभवानी मातेची विधीवत पूजा पुजारी लखन छत्रे यांनी केली. यावेळी मंदिर कर्मचारी अधिकारी देवी गाभाऱ्यात उपस्थित होते.

## उपप्रादेशिक परिवहन कार्यालय येथे नेत्र तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जानेवारी -**



रस्ता सुरक्षा अभियान २०२५ प्रवाह अंतर्गत परिवहन कार्यालय धाराशिव येथे नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अपघाताचे प्रमाण कमी करण्याकरीता विविध कार्यक्रम राबविले जातात. त्यामध्ये चालकांची नेत्र तपासणी शिबीरे घेतले जातात. डॉ. ज्योती कानडे नेत्ररोग तज्ञ व डॉ.श्रीकांत कल्याणी यांनी आपल्या जीवनामध्ये डोळ्यांचे जडआजाराचे उपचाराबददल मार्गदर्शन केले. वाहन चालकांची दृष्टि चांगली असणे जरूरी आहे. कारण आपले जीवन त्यांच्या हातात आहे. वाहन चालकांची अनेक आजारामुळे दृष्टि कमी होत चालली आहे त्यामध्ये मोतीबिंदूचे प्रमाण जास्त असल्याने दृष्टि कमी होते म्हणून वाहनांचे कंट्रोल आपल्या हातून सुटू शकते.

शिबीरामध्ये चालक-मालक वाहतूक संघटनेचे अध्यक्ष यांनी वाहन चालकांनी महिन्यातून एकदा तरी आपले डोळे व बी.पी. तपासणी करावा व वाहन चालविताना सीट बेल्ट, हेल्मेट या वापर करावा व बिगर लायसन्स न घेता वाहन चालवू नये, स्कूल बस वाहतुक संघटनेचे अध्यक्ष दादाराव गवळी व त्यांचे सहकारी यांनी रस्ता सुरक्षेच्या अनुषंगाने शाळेतील मुलांना स्कूल बसमध्ये चढताना उतरताना सुरक्षिततेबाबत प्रशिक्षण देत आहोत. पालकांनी पण लक्ष द्यायला हवे की, आपले पाल्य शाळेत सुरक्षित जातो की नाही याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.


अजमेरा रोटरी नेत्र रूग्णालय धाराशिव येथील नेत्र सहायक शिवरूद्र इसाके व जिल्हा रुग्णालयाचे लॅब ॲसिस्टंट एस.बी.शिंदे यांनी शिबीर कार्यालयामध्ये ७५ चालकांची नेत्र तपासणी करण्यात आली.

शिबीरास कायालर्यातील मोटार वाहन निरीक्षक त्रिवेणी गालिदे, सतिश धुंदे, सहा. मोटर वाहन निरीक्षक सागर काशविद, कुणाल होले, अजित पवार तसेच कार्यालयातील कार्यालयाचे मुख्यलिपीक धनंजय लोंढे व त्यांचे सहकारी कर्मचारी वरिष्ट लपीक आर. जी.कुलकर्णी, आर.पी.नाईकवाडी, डी. सी पुदाले, ए.आर.राऊत व कनिष्ठ लिपीक बालाजी वाघमारे, अरविंद गरड, संध्याराणी गवाड, करीष्मा लोहार, अपर्णा राठोड व शिपाही दत्तू सरपे आदी उपस्थित होते. सदरील शिबीर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा. मोटार वाहन निरीक्षक अजित पवार यांनी केले. कुणाल होले सहा. वाहन मोटार निरीक्षक यांनी आभार प्रदर्शन केले.

# वीज पुरवठा वेळेवर होईना; पपई पिकाकर नांगर फिरवण्याची वेळ

### विजेचा कमी हॉल्टेजवर एक दिवसाआड पुरवठा... पाण्याअभावी दीड एकर पपई पीक गेले वाया...

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१० जानेवारी -**



यंदा राज्यात चांगला पाऊस पडला त्यामुळे विहीर, बोरला मुबलक पाणीसाठा आहे. मात्र महावितरणच्या ढिसाळ आणि मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांना पिकाला पाणी देता येत नसून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. अनेक शेतकऱ्यांवर जीवापाड जपलेल्या पपईच्या फळबागेवर नांगर फिरवण्याची वेळ आहे.

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील महावितरण सबस्टेशनचा प्रश्न गंभीर बनला आहे. वीज वितरण उपकेंद्रातून वीज पुरवठा खंडित झाल्यास दोन ते चार दिवस सुरळीत चालू होत नाही. जरी वीज पुरवठा सुरळीत झाला तरी दोन तासही तो व्यवस्थित चालत नाही. त्यामुळे ग्रामस्थ तसेच शेतकरी त्रस्त झाले आहेत.

तेरखेडा सबस्टेशन मधून खामकरवाडी, सटवाईवाडी, कडकनाथवाडी, वडजी, इंदापूर, बोरी या गावांना वीज पुरवठा केला जात आहे. परंतु यातील एकाही गावचा वीज पुरवठा सुरळीत चालत नाही. अचानक वीज गेल्यास नागरिकांना रात्रभर अंधारात राहावे लागत आहे. तर अंधाराचा फायदा चोर देखील घेत आहेत. तसेच विजेच्या लपंडावामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान होत आहे. अनेक शेतकऱ्यांनी केळी, ऊस, टरबूज, खरबूज, पपई यासारख्या बागायती पिकाची लागवड केली आहे. परंतु महावितरणच्या भांगळ कारभारामुळे पिके वाळू लागली आहेत.

महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे त्याच्या उलट झाले आहे. शेतकऱ्यांवर आता कर्जाचा डोंगर वाढला आहे. पपई पिकाची लागवड करत असताना ठिबक, खत, रोपे, फवारणी तसेच लागवडीसाठी मोठा खर्च आला आहे. यातून चार पैसे मिळतील आणि कर्ज फेटल अशी अपेक्षा होती. ती अपेक्षा तेरखेडा उपकेंद्राने भंग केली. शेतीला एक दिवस आड वीज पुरवठा सोडला जातो आहे. त्यात कमी होल्टेज आणि सतत महावितरणचा घोटाळा त्यामुळे विद्युत पंप व्यवस्थित चालत नाहीत. लाईट गेल्यास अनेक तास वाट पाहावी लागत असल्याने पाण्याअभावी पपई पीक वाळू लागले असून शेतकऱ्याचे लाखो रुपये नुकसान झाले आहे. सध्या पिकाला पाणी देण्याची सूघी चालू आहे. शेतकऱ्याकडे मुबलक पाणीसाठा उपलब्ध असून देखील महावितरणच्या मनमानी कारभारामुळे पिकांना पाणी देता येत नाहीये. शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होत असताना महावितरणचे अधिकारी मात्र, कुंभकर्ण झोपेत आहेत. अधिकाऱ्यांना कधी जाग येणार आणि सबस्टेशनचा लाईट प्रश्न कधी मिटवणार असा सवाल शेतकरी विचारत आहेत.

### शेतकऱ्यांना दुहेरी कात्री...

शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास वाया जाऊ नये म्हणून बरेच शेतकरी जनरेटर भाड्याने लावून बागायती पिकास पाणी देत आहेत. तसेच अनेक शेतकऱ्यांना हे जनरेटरही भाड्याने मिळत नसल्याने पिके आणि बागा वाळून जात आहेत. असा दुहेरी कात्री शेतकऱ्याच्या खिशाला लागत आहे.

मी दीड एकर पपई पिकाची लागवड केली आहे. यासाठी मला मोठा खर्च आला आहे. बोरला पाणी देखील भरपूर आहे. परंतु महावितरण मुळे मोठे नुकसान झाले आहे. लाईट व्यवस्थित चालत नसल्याने पपई पिकाला वेळेवर पाणी मिळत नाही. त्यामुळे पपई वाळू लागली आहे. आता पपई पिकावर नांगर फिरवल्या शिवाय पर्याय नाही. **: विजय उकरंडे, शेतकरी, तेरखेडा**

## लोकशाही दिनाची प्रभावी अंमलबजावणी करा : ओंबासे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवस कार्यक्रमाअंतर्गत जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय लोकशाही दिनाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबतचे निर्देष देण्यात आलेले आहेत.या निर्देशांचे काटेकोर पालन करावे,अशा सुचना जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बसे यांनी दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात दरमहा पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. तसेच तालुकास्तरावर दर महिन्याचे तिस-या सोमवारी तालुकास्तरावर लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. तथापि या दिवशी सार्वजनिक सुटटी असल्यास त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस लोकशाही दिन म्हणून पाळण्यात येईल,असे नमुद केले आहे.

नागरिकांचे प्रश्नाचे निराकरण करणेसाठी प्रत्येक महिन्याचे तिस-या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन तहसिलदार यांनी करावे.तसेच लोकशाही दिनाचे नियोजन व संचलन कार्यपध्दती ही संदर्भ क्र.0१ व २ मध्ये दिलेल्या शासन परिपत्रकानुसार होणे अत्यंत आवश्यक आहे.

तालुका स्तरावरील लोकशाही दिनाची नियमितपणे तिस-या सोमवारी तहसिलदार यांनी प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.

सर्व कार्यालय प्रमुख स्वतः उपस्थित राहतील याबाबत दक्षता घ्यावी.प्रत्येक लोकशाही दिनाचे इतिवृत्त तात्काळ जिल्हाधिकारी कार्यालयास पाठवावे, याबाबत कुठल्याही प्रकारे दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व तहसलिदार यांनी तालुकास्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन करून जास्तीत जास्त नागरीकांच्या प्रश्नांचे निराकरण करावे.उपविभागीय अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील तहसिल कार्यालय स्तरावरील लोकशाही दिनास एका तालुक्यात उपस्थित राहुन लोकशाही दिनास मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. तसेच सर्व नागरिकांनी आपल्या अडीअडचणीबाबत लोकशाही दिनास उपस्थित राहुन आपले प्रलंबित प्रश्न प्रशासनाकडुन कार्यवाही करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

# माहूर तहसीलदारांची वाळू तस्करीविरोधात धडक मोहीम

- ९ महिन्यात ३० वाहने जप्त
- १५ लाखाचा दंड वसूल
- तब्बल ५० लाखाचा महसूल जमा



**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १० जानेवारी**

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, नांदेड व सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली,किनवट यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार किशोर यादव, माहूर यांनी आतापर्यंत गत नऊ महिन्यांमध्ये वाळू चोरी व तस्करी विरोधात धरपकड, जप्ती व दंडात्मक कारवाईचा बडगा उगारत धडाकेबाज कारवाया करत वाळू चोरी करणारी तब्बल ३० वाहने जप्त करून त्या माध्यमातून १५ लाखांचा दंड वसूल केला आहे.परिणामी वाळू चोरी शून्यावर आली असतानाच आणखी १५ वाहनांकडून १५ ते २० लाख रुपये दंडाची रक्कम वसूल करत जप्त वाळू साठ्याच्या लिलावातून २० लाख रुपयांचा महसूल जमा करून एकंदरीत ५० लाख रुपये शासन दरबारी जमा करत असल्याची अशाप्रकारची जिल्ह्यातील ही विक्रमी कार्यवाही ठरल्याने तहसीलदार यादव यांनी आपल्या सहकाऱ्यांसह वाळु चोरी विरोधात उघडलेल्या या धाडसी व धडक मोहिमेचे प्रशासनासह, नागरिकांमधून अभिनंदन करण्यात येत आहे.

शासनाकडून माहूर तालुक्यातील वाळू घाटांच्या जाहीर लिलावाचे कार्य विचाराधीन असल्याने ते दिर्घ कालावधीपासून रखडल्याने घरकुल बांधकाम करणारे लाभार्थी व इतर सर्वसामान्य गोरगरिबांना घर व इतर बांधकामासाठी स्वस्त वाळू मिळणे दुरापास्त झाले होते.या गोष्टीची जाणीव झाल्याने तहसीलदार किशोर यादव यांनी वाळू तस्करांनी नदीपात्रात वाळू चोरीच्या उद्देशाने जमा केलेल्या वाळूची जप्ती करून या जप्त वाळूचा गोरगरिबांना फायदा व्हावा यासाठी सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली यांच्याकडे तसे प्रस्ताव पाठवले होते. तहसीलदार यादव यांच्या या जनकल्याणकारी प्रस्तावाची दखल घेत सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांनी तातडीने लिलाव जाहीर करून दिनांक ६ रोजी जप्ती घेणाऱ्यांना वाळूचे लिलावात बोली मंजूर करून त्यांना स्वस्त दरात गोरगरिबांना वाळू विक्री करण्याचे आदेश दिले असून, लवकरच तालुक्यातील ९ वाळू घाटांवर गोरगरिबांना आता स्वस्त दरात वाळू मिळणार आहे.

जिल्हाधिकारी डॉ.अभिजीत राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांच्या कणखर भूमिकेमुळे तहसीलदार किशोर यादव तथा महाकाल उर्फ नायब तहसीलदार कैलास जेठे, नायब तहसीलदार डॉ, राजकुमार राठोड यांनी वाळू चोरांची वाहने पकडण्याचा सपाटा लावत धडाकेबाज कारवाईची मोहीम हाती घेतली असल्याचे पाहून वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहे.परिणामी आता वाळू तस्करी १००% बंद झाली असल्यामुळे नागरिकांना वाळू मिळणे दुरापास्त झाले होते. त्यामुळे सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांनी दिनांक १ रोजी पासून ते ११ पर्यंत मौजे लिंबायत शिवारात १६० ब्रास जप्त वाळूचा लिलाव प्रवीण चोले यांना दिला. यामुळे नागरिकांना सहजपणे वाळू मिळाली.सोबतच दिनांक ६ रोजी तालुक्यात ९ ठिकाणी वाळू साठे हराशीमुळे नागरिकांना आता आणखी स्वस्त दरात वाळू मिळणार असल्याने नागरिकांनी हर्राशी घेतलेल्यांशी संपर्क साधून वाळू उपलब्ध करून घ्यावी! असे आवाहन तहसीलदार किशोर यादव यांनी केले असून, त्यांनी जप्त केलेल्या वाहनातून सुमारे ५० लाख रुपये महसूल शासन दरबारी जमा होणार असल्याने त्यांनी केलेल्या या धडाकेबाज कारवायामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# श्री. गुरुगोबिंद सिंघजी जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० जानेवारी**

श्री. गुरुगोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्र शिक्षण संस्था विष्णुपुरी नांदेड येथे दि. ६ जानेवारी रोजी श्री . गुरुगोबिंद सिंघजी यांची जयंती (गुरुपूरब) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

श्री गुरुगोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्र शिक्षण संस्था विष्णुपुरी नांदेड येथील या कार्यक्रमाची सुरुवात गुरु ग्रंथ साहिब या ग्रंथाचे एका सजलेल्या खास वाहनातून संस्थेच्या प्रांगणात मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमासाठी नांदेड भूषण संत बाबा बलविंदर सिंघजी, गुरुद्वारा लंगर साहेब ट्रस्ट, नगीना घाट, नांदेड तसेच मुख्य गुरुद्वारा येथील मित जत्थेदार ज्योतिन्दर सिंघजी, संस्थेचे नियमक मंडळाचे सदस्य तथा गुरुद्वारा नानकसर साहेबचे प्रमुख संत बाबा सुखविंदर सिंघजी व इतर अनेक पंचप्यारे, शिख समुदायातील वरिष्ठ संत, संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे, संस्थेचे नियमक मंडळाचे सदस्य डॉ. डी. डी. डोये, डॉ. जे. व्हि. मेघा, संस्थेतील विविध अधिष्ठाता, विभाग प्रमुख, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीस गुरु ग्रंथ साहिब या धर्म ग्रंथास पुष्पहार व पुष्प अर्पण करून यथोचित पूजन करण्यात आले. याप्रसंगी संत बाबा बलविंदर सिंघजी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना म्हणाले की, श्री. गुरु गोविंद सिंघजी यांच्या चरण स्पर्शाने पावन झालेल्या पुण्यभूमीत त्यांच्याच नावाने असलेल्या तंत्र शिक्षण संस्थेत आपण शिक्षण घेत आहात. तुम्ही भाग्यवान आहात आपण चांगले शिक्षण घेऊन संस्थेचे नाव व आपले नाव उज्वल करा.

यावेळी कथाकार, भाई सरबजीत सिंघजी निर्मले यांनी आपल्या अभ्यासपूर्ण शैलीत श्री गुरुगोबिंद सिंघजी यांच्या चरित्रावर सखोल मार्गदर्शन केले. संस्थेचे संचालक डॉक्टर मनेश कोकरे यांनी गुरुगोबिंद सिंघजी यांच्या जीवनातील विविध पैलू वर प्रकाश टाकला श्री. गुरुगोबिंद सिंघजी यांनी सांगितलेली विविध तत्वे सांगून त्या तत्त्वाचे संस्थेच्या विद्यार्थ्यांनी व सर्वांनी पालन करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमानंतर सर्वासाठी लंगर (प्रसाद) चे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी शीख समुदायातील संत व नागरिक यांचेसह संस्थेतील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील विद्यार्थी सरदार हरजितसिंघ ढिल्लो, सरदार धन्नासिंघ ढकणे, इतर विद्यार्थी प्रतिनिधी, प्राध्यापक व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

## संक्षिप्त वृत्त



### माजी सैनिकांचे शासकिय सेवेतील कार्य उल्लेखनीय आहे : आनंद देऊळगावकर

**मुदखेड**-प्रशासकीय सेवेमध्ये काम करताना मोठी तत्परता दर्शवावी लागते त्यातच अनेक जण शासकीय निमशासकीय सेवेमध्ये आपले कर्तव्य बजावतात तुलनात्मक दृष्टीने विचार केला तर माजी सैनिकांचे शासकीय सेवेतील कार्य हे उल्लेखनीय नियोजनबद्ध आणि प्रामाणिक पणाचे राहिले असून त्यांच्या देशसेवा आणि कर्तव्यनिष्ठता या बाबी कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी मराठवाडा माजी सैनिक फेडरेशन चे अध्यक्ष माजी सैनिक न.प. उपाध्यक्ष लक्ष्मणराव देवदे यांच्या वतीने माजी सैनिक संघटनेच्या प्रांताध्यक्षपदी नव्याने निवडून आलेले मंडळ अधिकारी हयून पठाण यांचा सत्कार व दर्पण दिनानिमित्त पत्रकारांच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलताना केले. यावेळी नायब तहसीलदार मारोतराव जगताप, समीर पोहणे, कॉंग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष प्रतापराव देशमुख ,शहराध्यक्ष कैलास गोडसे ,तलाठी गोपाळ माने यांची प्रमुख उपस्थिती होती. भोकर तालुक्यातील पांढुर्णा येथील मूळ भूमिपुत्र हयून पठाण यांचा कौटुंबिक वारसा सैनिकाचा असून देशसेवेमध्ये त्यांचे मोलाचे योगदान असल्याचे गौरवोद्गार देखील मान्यवरांच्या वतीने यावेळी बोलताना व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकातून मुख्य संयोजक माजी सैनिक फेडरेशनचे मराठवाडा अध्यक्ष लक्ष्मणराव देवदे,यांनी आयोजनाची सविस्तर भूमिका विशद केली. यावेळी माजी सैनिक संघटनेचे तालुका अध्यक्ष चंद्रकांत लोलगे,देवराव चौदंते,मारोती गुंठे,जिल्हा मार्गदर्शक प्रभु घोंगडे,संघटक राजाराम हाळदे,जेष्ठ माजी सैनिक माधव पवार,शशिकांत मोडवान, चांद साब, वीर सैनिक संघटनेचे ग्रुप अध्यक्ष विकास बल्फेवाड,बालाजी गव्हाणे,तालुका संघटक सुनिल चौदंते,साईनाथ राठोड, साहेबराव वने विद्याधर तहकीक, शेख फारुख ,गोवींद तेलंगे देवीदास पवार फारुख शेख या माजी सैनिकासह ज्येष्ठ पत्रकार अजगर हुसेन, जयराम वने, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, पत्रकार संतोष पाटील गाडे ,मनोज कमटे, प्रल्हाद मस्के अतिक अहमद, शेख शमशोदिन, धम्मदाता कांबळे, अब्दुल रजाक, साहेबराव गागलवाड, संतोष दर्शन वाड ,साहेबराव हौसरे, हाफिस कुरेशी ,यांच्यासह अन्य पत्रकार व कार्यकर्त्यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार संजय कोलते यांनी केले तर आभार राजाराम हळदे यांनी मानले.

### आर्य चाणक्य सेने तर्फे स्वेटर वाटप



**नांदेड**-आर्य चाणक्य सेना नांदेड यांच्या वतीने वेद विद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना स्वेटर चे वाटप करण्यात आले श्री क्षेत्र कारंजा लाड वेदमूर्ती दिनेश गुरुजी व कळमनुरी येथे वेदमूर्ती प्रसाद पाठक गुरुजी या ठिकाणी अध्यापक आहेत या ठिकाणी वेद विद्यालयात शेकडो विद्यार्थी वेद पठण करून त्याचा अभ्यास करत आहेत . यावर्षी थंडी खूप मोठ्या प्रमाणात पडलेली असून पाठशाळेमध्ये लहान लहान मुले अध्ययन करत आहेत पाठशाळामध्ये पहाटे लवकर उठून स्नान संध्या वंदन करून वेध अध्ययन करण्यासाठी बसावं लागत असतं त्यामुळे त्यांचा थंडीपासून बचाव व्हावा या उद्देशाने कृष्णा बेरळीकर जिल्हाध्यक्ष आर्य चाणक्य सेना यांच्या वतीने स्वेटर व उबदार वस्त्रांचे वाटप करण्यात आले यावेळी पाठशाळेचे व्यवस्थापक अध्यापक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. वरील बातमी आपल्या सुप्रसिद्ध दैनिकात प्रसिद्ध करावी ही नम्र विनंती.

### प्रा. डॉ. संग्राम आंदे यांना साहित्य रत्न पुरस्कार प्रदान



**नांदेड**-मुखेड महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील प्रा डॉ संग्राम आंदे यांना माणूसकी फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे त्यांना हा पुरस्कार सुप्रसिद्ध साहित्यिक राजापूरे साहेब यांच्या हस्ते साहीत्य क्षेत्रातील सर्वच्च पुरस्कार साहित्य रत्न पुरस्कार बुलडाणा याठिकाणी प्रदान करण्यात आला. त्यांनी आतापर्यंत अनेक पुस्तकाचे लिखाण केले आहे अनेक अग्रलेख लिहिले आहेत अनेक पुरस्कार प्राप्त केले आहेत अनेक काव्यसमेलनात सहभाग आणि साहित्य क्षेत्रातील प्रभावी लेखन संशोधनात्मक लिखाणावर प्रभाव सर्व कार्याची दखल घेऊन साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च आदर्श साहित्य रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला हा पुरस्कार मिळाल्याबद्दल महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अडकीणे एस बी साहेब प्राचार्य डॉ मस्के सर प्राचार्य डॉ गोणे सर प्रा डॉ नेटके सर इत्यादी नी अभिनंदन केले आहे.

# चार आरोपींची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १० जानेवारी**

मुदखेड तालुक्यातील मौजे वाडी मुक्ताजी येथे झालेल्या मारहाण प्रकरणातील चार आरोपींना मुदखेड न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे.

सविस्तर माहिती अशी आहे कि तालुक्यातील मौजे वाडी मुक्ताजी येथे दि. १५ जुन २०१८ रोजी मारहाण झालेल्या प्रकरणात मुदखेड पोलिस ठाण्यात भादवी कलम ३२६,३२४,३२३,५०४,५०६,३४ अंतर्गत चार जणांनवर गुन्हा नोंदवून आरोची करून अटक करण्यात आली होती. या खटल्यात सरकारी पक्षाने एकुन आठ साक्षीदार तपासले असता त्यांना आरोपी विरुद्ध सबळ पुरावा सादर करण्यास सरकार पक्षाला अपयश आले.

पुराव्याअभावी गुन्हा सिद्ध न झाल्याने मुदखेड न्यायालयाने दि.८ जानेवारी २०२५ राजी यातील चारही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात आरोपी गुलाब देशमुख, गोपीराज इंगोले, अवधुत इंगोले, व श्याम इंगोले, यांची बाजु अँड. माधव हाटकर यांनी प्रभाविपणे मांडली, अँड. हाटकर यांना अँड. तेजस्विनी मुंगल यांनी सहकार्य केले. सरकारी पक्षाचे सर्व आरोप फेटाळून लावत त्यांनी आरोची निर्दोष असल्याचे सिद्ध केले.




**नांदेड-मीमांसा फाउंडेशन, दैनिक समीक्षा, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मंथन क्रिएटिव्ह ग्रुप, पत्रकार प्रेस परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकारिता पुरस्कार सोहळा २०२५ च्या वृत्तपत्र क्षेत्रातील तिसरा डोळा उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार छायाचित्रकार नरेंद्र गडप्पा यांना विधान परिषदेचे गटनेते आ. हेमंत पाटील व खा. प्रा. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर, हिंदुस्तान टाइम्स मुंबईचे सुरेंद्र गांगण, मॅक्स महाराष्ट्र मुंबईचे मनोज भोयर, जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके, संपादक रुपेश पाडमुख आदी उपस्थित होते.**

# हु. ज.पा. महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत विविध स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर ,दि. १० जानेवारी**

येथील हु.ज.पा.महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, मराठी विभाग, इंग्रजी विभाग, हिंदी विभाग आणि ग्रंथालय यांच्यातर्फे दि. ०१ ते १५ जानेवारी दरम्यान वाचन संकल्प महाराष्ट्राचा या पंधरवडा कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यानिमित्ताने दि. १० जानेवारी रोजी महाविद्यालयामध्ये या तिन्ही विभागाद्वारे पुस्तक परीक्षण व लेखन स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेमध्ये सुरुवातीला महाविद्यालयातील प्रा. डॉ. उज्वला सदावर्ते यांच्या हस्ते जयवंतराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व त्यानंतर मंचावरील मान्यवरांचे ग्रंथ भेट देऊन स्वागत करण्यात आले त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व रूपरेषा ग्रंथपाल बोंबले राजू यांनी सांगितली तसेच अध्यक्षीय मनोगत महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.उज्वला सदावर्ते यांनी केले, त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथ वाचनाचे फायदे सांगून प्रत्येकाने पुस्तक वाचली पाहिजे वाचन संस्कृती जपली पाहिजे असा सल्ला दिला व विविध कादंबरी पुस्तकाविषयी नालंदा विद्यापीठातील ग्रंथालय विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, भाषा विभाग प्रमुख मराठी, हिन्दी, इंग्रजी व ग्रंथालय विभाग ग्रंथपाल व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने कार्यक्रमासाठी उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.एल. एस. पवार यांनी केले तर आभार डॉ.आशिष दिवडे यांनी मानले.

# उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी केले संगमेश्वर पन्नासेचे कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,१० जानेवारी**

तालुक्यातील गडगा येथील सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या वडीलांच्या पुण्याईची जाण ठेवीत सर्व साधारण परिस्थितीवर मात करीत संगमेश्वर पन्नासे ने जिद्द, चिकाटी अथक परीश्रमाच्या बळावर पहील्याच प्रयत्नात नगर विका स विभागात नुकतीच नौकरी मिळविली असुन. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली.अगोदर उपमुख्यमंत्री शिंदे यांचा यथोचित सत्कार करण्यास पुढे सरसावलेल्या संगमेश्वरचा उपमुख्यमंत्र्यांनी शाल, पुष्पगुच्छ देवून कौतुक केले.

तालुक्यातील गडगा येथील शिवसेना पक्षाचे(एकनाथ शिंदे गटाचे)सामाजिक कार्यकर्ते शिवाजी पन्नासे गेल्या अनेक वर्षापासून समाजातील मानवाच्या आरोग्यविषयक व विविध सामाजिक क्षेत्रात सातत्याने उपक्रम राबवितात. सध्या पुणे येथील महानगर विकास प्राधिकरण विभागात कार्यरत आहेत. नूकतीच काही दिवसांपूर्वी वडीलासमवेत



त्यांनी ठाणे येथील रक्त दान शिबीर कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. नियमानूसार त्यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे स्वागत करताना वडील शिवाजीराव पन्नासे यांनी हा माझा जेष्ठ चिरंजीव आहे असे सांगताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संगमेश्वरला पुढील यशस्वीतेसाठी अभिनंदन करुन शुभेच्छा देतो असे म्हणत शिंदे यांनी संगमेश्वर पन्नासेचे शाल, व पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी ठाण्याचे खासदार नरेश मस्के, आमदार रवींद्र फाटक, माजी मुख्यमंत्र्याचे सचिव मंगेश चिवटे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष तथा डॉ.श्रीकांत फाऊंडेशनचे राज्य कक्षप्रमुख नरहरी राऊत, डॉ. सिध्देश्वर पन्नासे आदींची उपस्थिती होती.

# माँ. जिजाऊ स्मारक परिसर साफ सफाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,१० जानेवारी**

येथील जिजाऊ स्मारक परिसरात प्रचंड घाणीचे साम्राज्य झाले असून माँ. जिजाऊ स्मारकास झाडा-झुडपांचा विळखा झाला आहे. सदरील हि बाब गेली अनेक महिन्यापासून परिसरात घाणीचे साम्राज्य होत असून याकडे दुर्लक्ष होताना दिसत असल्याने हा परिसर साफ सफाई करण्याचे निवेदन मराठा सेवा संघाच्या वतीने ९ रोजी न.प. मुख्यधिकारी तथा प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी अनुष्का शर्मा यांच्याकडे केली आहे.

येथील माँ. जिजाऊ स्मारक परिसरात मोठ्याप्रमाणात अस्वच्छता दिसत आहे. १२ जानेवारी हा दिवस माँ. जिजाऊ यांची जयंती असून या परिसरात सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील नागरिक अभिवादन करण्यास येतात त्यामुळे परिसरात स्वच्छता करून पथदिवे लावण्यात याव, विद्युत रोषणाई करावी अशी मागणी यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष नामदेव कुटे, तालुका अध्यक्ष अंकुश कदम, बी.टी. कदम, रमेश लुंगारे, प्रदीप इंगोले, पांडुरंग कदम, केशव जाधव, माणिक कदम, बाबू पाटील, पांडुरंग गायकवाड आदी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत उमरी नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांचे घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. १० जानेवारी**

जिल्हास्तरीय नगरपरिषद/ नगरपंचायत क्रिडा स्पर्धा सांस्कृतिक महोत्सवात उमरी नगरपरिषद येथील कर्मचारी यांनी विविध स्पर्ध्येमध्ये क्रमांक मिळविला

जिल्हाधिकारी नांदेड अभिजित राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद प्रशासन विभागातर्फे दिनांक ३ ते ४ जानेवारी २०२५ रोजी जिल्हास्तरीय नगरपरिषद/ नगरपंचायत क्रिडा स्पर्धा सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील विविध नगरपरिषदेतील कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला आहे. त्यामध्ये उमरी नगरपरिषद कार्यालयातील कर्मचारी कु.कांचन पडलवार, करनिर्धारण अधिकारी यांनी रांगोळी या स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच विनोद उत्तमराव सावंत, संगणक अभियंता यांनी पोहोण्यामध्ये तृतीय क्रमांक मिळविला आहे. तर शंकर प्रकाश माने, लिपीक यांनी लांब उडी या स्पध्येमध्ये प्रथम क्रमांक मिळविला तर माधव गणपत जाधव यांनी ४०० मीटर व १०० मी अंतरावर धावण्यामध्ये तृतीय क्रमांक मिळविला आहे.

सदर क्रीडा स्पर्धेत उमरी नगर परिषदेतील मुख्याधिकारी निलम कांबळे यांच्यासह लेखापाल बालाजी चवरे, विनोद सावंत, कैलास येमेलवाड, विशाल बाराते, कांचन पडलवाड, गणेश मदने, सचिन गंगासागरे, चंद्रकांत श्रीकांबळ, सूर्यकांत माळवतकर, गंगाधर पवार, शंकर माने, माधव जाधव, आकाश खंदारे, सुनंदा खंदारे, शहनाज बेग, मीरा सोनकांबळे आदी कर्मचारी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# जलजिवन मिशन अंतर्गत होत असलेल्या बोगस कामाची चौकशी करा : काशिनाथ शिंदे

## आमरण उपोषण करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. १० जानेवारी**

इस्लापूर येथे होत असलेल्या जलजिवन मिशन अंतर्गत च्या बोगस व निकृष्ट दर्जाच्या कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कायद्याचा बडगा उगारावा. अशी मागणी भाजपाचे जिल्हासचिव काशिनाथ पाटील शिंदे यांनी जलजिवन प्राधीकरण विभागाचे अधीक्षक अभियंता यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली असून, तात्काळ चौकशी होवून दोषींवर कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्यात येईल. असा इशारा शिंदे यांनी दिला आहे.

अधीक्षक अभियंता प्राधिकरण विभाग नांदेड यांना दिलेल्या निवेदनात शिंदे यांनी म्हटले आहे की, शासनाकडून हर घर जल चे उद्दिष्ट राबविण्यात येत असून, या



अंतर्गत इस्लापूर येथे सन २०२२ ला ७ कोटी ६७ लक्ष ८६ हजार रूपये खर्चाची प्रभावी पाणी पुरवठा योजना मंजूर झाली. दि. १४ जुलै २०२२ ला तांत्रिक मान्यता मिळून दि. २७ डिसेंबर २०२२ ला कार्यारंभ आदेश काढण्यात आला. या मध्ये अप्रोच चॅनल, आवक विहिर, जोड घर विहिर, जोडपूल,अशुद्ध पंपिंग मशीन, जलशुद्धीकरण केंद्र, शुद्ध जल पंपिंग मिशन, पाण्याच्या उंच दोन टाक्या, गावात पाईपलाईन, घरोघरी नळजोडण्या आदि महत्त्वपूर्ण कामे करणे अपेक्षित होते.

परंतू संबंधित यंत्रणेने शासनाच्या अंदाज पत्रकाला बासनात गुंडाळून हि सर्व कामे, जे की,पाईपलाईन अंदाज पत्रकात दिल्या प्रमाणे खोल न खोदता केवळ अर्धा एक ते दोन फूट खोल खोदून जमिनीत बुजविण्यात आली आली आहेत. घर घर नळ जोडण्या करण्यात आल्या नाहीत, जवळपास एक वर्षापुर्वी गावातील सर्व मुख्य रस्ते खोदून त्यात पाईप टाकले ते खड्डे बुजवून रस्त्याची दुरूस्ती केली नसल्याने सध्या या अंतर्गत रस्त्यावरून पायी चालणे ही अवघड होवून बसले आहे. वाहणे चालविणे तर जिवघेणे ठरत आहेत.

सदरील कामावर जल प्राधिकरण विभागाचा एक ही अभियंता येत नसल्याने ठेकेदार मनमानी पद्धतीने बोगस व निकृष्ट दर्जाचे काम उरकून जनतेच्या माथी मारल्या जात आहे. संबंधित ठेकेदार व कामचुकार प्राधिकरण विभागांच्या अभियंत्यांवर कायदेशीर कारवाई करावी. अशी मागणी भाजपचे जिल्हासचिव काशिनाथ पाटील शिंदे यांनी अधिक्षक अभियंता यांची भेट घेऊन दिलेल्या निवेदनात केली असून, प्रशासकीय यंत्रणेकडून कारवाईस टाळाटाळ अथवा विलंब झाल्यास लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्यात येईल. असा इशाराही काशिनाथ शिंदे यांनी दिला आहे.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, 'ज्ञानतीर्थ' परिसर, विष्णुपुरी, नांदेड.**

**दीक्षान्त समारंभ सूचना**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा सत्ताविसावा दीक्षान्त समारंभ बुधवार दि. २९ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११:०० वा. दीक्षान्त मंचावर विद्यापीठाचे कुलपती मा. सी.पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. या समारंभास सन्माननीय अतिथी म्हणून प्रा. मा. भूषण पटवर्धन, माजी उपाध्यक्ष विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली हे उपस्थित राहणार आहेत. तसेच विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या उपस्थितीत हा समारंभ संपन्न होणार आहे.

सदरील दीक्षान्त समारंभा संबंधीची विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेली सर्व माहिती विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

स्वा/-
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# ना.पंकजाताई मुंडे मंत्री झाल्यानंतर प्रथमच परळीत ;यशःश्री निवासस्थान गर्दीने फुलले

## जनतेच्या समस्यांचे जागेवरच निराकरण

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१० जानेवारी**

राज्याच्या पर्यावरण, वातारणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे मंत्री झाल्यानंतर प्रथमच शहरात आगमन झाले,त्यांना भेटून समस्या मांडण्यासाठी यशःश्री निवासस्थान अक्षरशः गर्दीने फुलून गेले होते. ना. पंकजाताईंनी प्रत्येकाला वैयक्तिक भेटून त्यांची गाऱ्हाणी ऐकली व त्यांच्या प्रश्नांचा जागेवरच निराकरण केले.

ना. पंकजाताई मुंडे यांचे बुधवारी रात्री उशीरा शहरात आगमन झाले. मंत्री झाल्यानंतर प्रथमच आल्या तरी कुठलाही गाजावाजा, मोठा सत्कार करू नये अशा सूचना त्यांनी कार्यकर्त्यांना केल्या होत्या. आज सकाळपासूनच यशःश्री निवासस्थानी त्यांना भेटण्यासाठी जिल्हयातील तसेच जिल्हया बाहेरून नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. आलेल्या प्रत्येकांना भेटत, त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांनी जनतेच्या समस्यांचे जागेवरच निराकरण केले.

लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुण्याईचा वसा अन् वारसा जबाबदारीने पुढे नेण्याची प्रेरणा देणारी ही गर्दी होती.

परळीकर नागरिकांनी केलेले स्वागत नम्रतापूर्वक स्वीकारून पक्षाने सोपवलेल्या दायित्वाचा वापर तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेल असं त्या यावेळी म्हणाल्या.

सांत्वनपर भेट

भाजपचे कार्यकर्ते किशोर केंद्रे यांच्या वडिलांचे नुकतेच दुःखद निधन झाले होते.ना. पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी आज त्यांच्या पदमावती भागातील निवासस्थानी जाऊन केंद्रे परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले.



# 'दीनदयाळ' बँकेने दर्जेदार सेवा देत ग्राहक, ठेविदारांचा विश्वास संपादन केला–सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील

## सहकार मंत्री ना.पाटील यांची दीनदयाळ बँकेच्या अहमदपूर शाखेस सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१० जानेवारी**

'विश्वास, विकास आणि विनम्रता' या त्रिसूत्रीने आर्थिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या 'दीनदयाळ' बँकेने दर्जेदार बँकींग सेवा देत ग्राहक, ठेविदारांचा विश्वास संपादन केला असे प्रशंसोद्धगार महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी काढले. ते दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या अहमदपूर शाखेस दिलेल्या सदिच्छा भेट प्रसंगी बोलत होते.

महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांनी नुकतीच दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाईच्या अहमदपूर शाखेस सदिच्छा भेट दिली. बँकेच्या सर्वांगिण कार्याची माहिती घेतली. मनोगत व्यक्त करताना मंत्री महोदयांनी बँकेचे मनःपूर्वक कौतुक केले. अल्प कालावधीत बँकेने केलेल्या शाश्वत प्रगतीचा अहवाल घेऊन समाधान ही व्यक्त केले. पारदर्शकता, स्वयंनिष्ठा, भारतीय रिझर्व बँकेचे नियम निकष कायदे कानून याचे पालन करीत संस्था आपली प्रगती साधत असल्याबाबत प्रशंसोद्गार काढले. मागील २८ वर्षांतील प्रगती अत्यंत आदर्श असून ८५० कोटींचा व्यवसाय अल्प कालावधीत करणे तेही सर्व निकषांचे पालन करून ही तारेवरची कसरत असतानाही बँकेने आपला ठसा उमटविला व अहमदपूर शहरात बँकेने चांगले नांव कमावले असल्याचे त्यांनी म्हटले. भांडवल पर्यक्तता अन् उत्पादक कर्ज ठेव संकलन कर्ज वितरण यासाठी योग्य तंत्रज्ञानाचा वापर व एकसंघ काम करणारे संचालक मंडळ हे या प्रगतीचे गमक असून हे संचालक मंडळ बँकेचे उत्तरोत्तर प्रगती करेल बाबत त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. मात्र सध्याच्या युगात 'सायबर सिक्युरिटी' हा चिंतेचा विषय असून या सुरक्षा संदर्भात बँकेने काटेकोरपणे लक्ष देऊन लोकहित जोपासावे बाबत अश्वस्थ केले. राज्याचा सहकार मंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर आपण ही दीनदयाळ बँकेला दिलेली पहिलीच भेट असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. तर शासकीय पातळीवरील सहकार विभागाचे अखत्यारीत येणाऱ्या सर्व विषयांबाबत मंत्री महोदयांनी दीनदयाळ बँकेस सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल बाबत आश्वासीत ही केले. तसेच यावेळी त्यांनी 'दीनदयाळ' बँकेच्या कार्यप्रणाली बाबत प्रशंसोद्धगार काढून माननीय संचालक मंडळाचे कौतुक केले. व 'दीनदयाळ' बँकेने दर्जेदार, तत्पर, अद्ययावत, गतिमान बँकींग सेवा देत ग्राहक, ठेविदारांचा विश्वास संपादन केला आहे असे ते म्हणाले. बँकेचे स्थानिक सल्लागार देवेंद्र देवणीकर यांनी आग्रहाने मा.मंत्री महोदयांनी अन्य कार्यक्रमातून वेळ काढून आमंत्रण स्वीकारले व बँकेच्या शाखेस भेट दिली. त्याबद्दल बँकेच्या वतीने आभार मानले.प्रारंभी भारतमाता व दीनदयाळजी उपखध्याय यांच्या प्रतिमापूजन करून कार्यक्रमास सुरूवात झाली. समारोपपर भाषणात बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की यांनी बँकेच्या एकूण कार्यप्रणालीचा व एकसंघ सकारात्मक काम करण्यास संचालक मंडळ कार्यरत असल्याबाबत माहिती दिली. सोबत बँकेच्या सांख्यिकीय प्रगतीचा आलेख ही उपस्थितांसमोर मांडला. मंत्री महोदयांनी अगदी अल्पावधीतच केलेल्या विनंतीला मान देत आपले निमंत्रण स्वीकारून दीनदयाळ बँकेस भेट दिल्याबाबत ऋण व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून सहकार भारतीच्या वतीने प्रदेश कार्यकारणी सदस्य सौ.शरयूताई हेबाळकर (माजी अध्यक्ष व संचालिका) व कार्यकर्ते सनतकुमार बनवसकर यांनी मंत्री महोदयांचा सहकार भारतीची पुस्तके भेट देऊन सत्कार केला. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बँकेचे संचालक मकरंद कुलकर्णी (सोनेसांगवीकर) यांनी केले तर प्रास्ताविक देवेंद्र देवणीकर यांनी केले. उपस्थितांचे आभार बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी बँकेच्या संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर, संचालक मकरंद कुलकर्णी, किरण सुरेशकांबळे हे उपस्थित होते. तर अहमदपूर शहरातील प्रतिष्ठित दिलीपराव देशमुख, भरतराव चामे, शिवानंद हिंगणे, प्रताप पाटील, यशवंत केंद्रे, खेडकर व बँकेचा ग्राहकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्थानिक सल्लागार देवेंद्र देवणीकर, श्रीकांत भुतडा, तातोडे साहेब, बँकेचे शाखाधिकारी विनोद कान्हेगावकर, अधिकारी नवाडे व कर्मचारीवृंद यांनी पुढाकार घेतला.



# राजेंद्र मस्के यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

## आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीत विजयासाठी प्रयत्न करणार–राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार पक्षाच्या बीड जिल्हाध्यक्ष पदावर शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांची नियुक्ती करण्यात आली. यापूर्वी जिल्हाध्यक्ष पद आमदार संदीप क्षीरसागर यांच्याकडे होते. बीड विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर खासदार बजरंग बाप्पा सोनवणे व आमदार संदीप क्षीरसागर यांनी पक्षश्रेष्ठीकडे मागणी करून जिल्हाध्यक्ष पदाची धुरा राजेंद्र मस्के यांच्याकडे सोपवली.

राज्य विधानसभा निवडणुकी नंतर प्रथमच गेली दोन दिवसापासून मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठका चालू होत्या. आज पक्षाचे सर्वेसर्वा खा.शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांची बीड जिल्हा अध्यक्ष पदावर नियुक्ती जाहीर करून नियुक्तीपत्र देण्यात आले.



यावेळी प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बाप्पा सोनवणे, बीडचे आ. संदीप भैय्या क्षीरसागर, खा.निलेश लंके, प्रदेश युवा अध्यक्ष महेबूब शेख,माजी आ.पृथ्वीराज साठे,राजेसाहेब देशमुख, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.लोकसभा निवडणुकीनंतर राजेंद्र मस्के यांनी भाजपा जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा देऊन शरद पवार साहेबांचे नेतृत्व स्वीकारले. अत्यंत चुरशीच्या बीड विधानसभा निवडणुकीत आ. संदीप क्षीरसागर यांच्या विजयासाठी अथक परिश्रम घेतले. बीड जिल्ह्यात शरदचंद्र पवार साहेबांच्या राष्ट्रवादीने बीडचा गड राखला.या विजयात राजेंद्र मस्के व त्यांच्या मित्रमंडळाचे योगदान आहे.आगामी काळात मजबूत संघटन आणि पक्ष विस्तारासाठी राजकीय व सामाजिक कामाचा अनुभव लक्षात घेऊन राजेंद्र मस्के यांची बीड जिल्हा अध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली.या नियुक्ती मुळे जिल्हाभरात पदाधिकारी कार्यकर्ते हितचिंतक यांच्या कडून राजेंद्र मस्के यांचे अभिनंदन केले जात आहे.

# शिवछत्र परिवाराने क्रीडा क्षेत्राला न्याय दिला–शंकरराव देशमुख

## जयभवानी शिक्षण संकुलात खो –खो आणि बॅडमिंटन स्पर्धेचे शानदार उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१० जानेवारी**

शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांनी क्रीडा क्षेत्राच्या माध्यमातून गेवराई विधानसभा मतदारसंघाची एक वेगळी ओळख निर्माण करून दिली आहे. माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांचा शिवछत्र परिवार कायम राजकारणासोबतच समाजकारण आणि क्रीडा क्षेत्रामध्ये सक्रिय आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांच्या मुलांमध्ये क्रीडा गुणांना चालना देण्याचे काम या परिवाराने केलेले आहे रणवीर पंडित यांनी या क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून गेवराई तालुक्याची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. गेवराई तालुक्यातील विद्यार्थी खेळाडू क्रीडा क्षेत्रामध्ये करिअर करिअर करुन या तालुक्याचे नाव मोठे करतील असा विश्वास भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी व्यक्त केला. क्रीडा महोत्सवाच्या खो–खो आणि बॅडमिंटन स्पर्धेचे उद्धाटन करताना ते बोलत होते.



शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुक्यात होत असलेल्या क्रीडा महोत्सवामध्ये आज पाचव्या दिवशी मुलांच्या खो–खो स्पर्धेचे आणि बॅडमिंटन स्पर्धेचे उद्धाटन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, मतदार नोंदणी विभागाचे विधानसभा प्रभारी सुभाष कदम, विधानसभा समन्वयक विक्रम सानप, व्यापारी युनियनचे अध्यक्ष शरद खरात, ड. उद्धव रासकर, सरपंच विष्णूपंण घोंगडे, माजी सरपंच अंकुश गायकवाड, सरपंच गोपाळ शिंदे मोहनराव काकडे, सुदाम पवार, रामेश्वर गरड, नंदू गरड यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते

**खेळाडूंचे मैदानासी नाते जोडले – रणवीर पंडित**

जयभवानी जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत गेल्या तीन वर्षापासून हा क्रीडा महोत्सव यशस्वीपणे होत आहे. महोत्सवामध्ये वेगवेगळ्या स्पर्धा घेतल्यामुळे शाळेतील विद्यार्थी खेळाडू जिंकण्याची उर्मी ठेवून मैदानावर सराव करताना दिसून येत आहेत. विद्यार्थी खेळाडूंचे मैदानाशी नाते जोडले गेले आहे. यातूनच उत्कृष्ट खेळाडू तयार होतील. शारदा स्पोर्ट्स अकॅडमी आणि जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे असे क्रीडामहोत्सवाचे आयोजक रणवीर पंडित यांनी यावेळी सांगितले.

जयभवानी विद्यालयाच्या भव्य मैदानावर या खो–खो च्या स्पर्धा होत आहेत. बॅडमिंटन स्पर्धा इंडोर स्टेडियम मध्ये होत असून या स्पर्धेमध्ये संस्थेचे १८ संघातील विद्यार्थी खेळाडू सहभागी झाले आहेत. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली जयभवानी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सहप्रशासन अधिकारी प्रा.गोगुले, मुख्याध्यापक वसंत राठोड प्राचार्य डॉ.सरकटे, पर्यवेक्षक हरिभाऊ हाकाळे यांच्यासह शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी परिश्रम घेत आहेत यावेळी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे सर्व मुख्याध्यापक क्रीडा शिक्षक आणि विद्यार्थी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किल्ले रायगडावर संपन्न होणार क्रांतीसुर्य शंभूराजांचा राज्याभिषेक सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१० जानेवारी**

पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराजांचे जेष्ठ सुपूत्र युवराज संभाजी राजांचा १६ जानेवारी १६८१ रोजी किल्ले रायगडावर राज्याभिषेक संपन्न झाला आणि कर्तव्यनिष्ठ शंभूराजे स्वराज्याचे दुसरे छत्रपती म्हणून सिंहासनाधिष्टीत झाले.

मागील अनेक वर्षे विस्मरणात गेलेल्या या राज्याभिषेक सोहळ्याला पुनश्च दिव्यत्व प्राप्त करून देण्यासाठी काही मोजके शिवशंभू पाईक एकत्र येत दि. १६ जानेवारी २०१४ रोजी शंभूछत्रपतींच्या या राज्याभिषेक सोहळ्याचा श्री गणेशा केला आणि तो आजही अव्याहत पणे शिवशंभू पाईक तसेच पुरातत्व विभागाच्या सहकार्याने चालू आहे. यंदा राज्याभिषेक सोहळ्याचे दशकपुर्ती महोत्सव, या नमित्ताने एका विशेष संकल्पनेच्या माध्यमातून हा सोहळा साजरा केला जाणार आहे तो म्हणजेच क्रांतीसुर्य शंभूराजा. स्वातंत्र्यलढ्यात आपल्या जिवाची तमा न बाळगता लढा देणाऱ्या क्रांतीकारकांच्या वंशजाच्या हस्ते भारताच्या विविध राज्यातील पवित्र नद्यांच्या जलाभिषेकांने हा सोहळा संपन्न होणार आहे.

मागील दहा वर्षात स्वराज्यातील सरदारांचे वंशज, समाजातील कर्तृत्ववान महिला, वारकरींच्या भक्ती–शक्ती स्वरूप, रायगडावर वर्षानुवर्ष वास्तव्यास असलेले मावळे,कुस्तीचा फड गाजविणाऱ्या मल्लांचा 'मर्दानी राजा', शेतकऱ्यांचा 'पोशिंदा राजा' या समाजातील विविध घटकातील मान्यवरांच्या हस्ते हा सोहळा संपन्न होत आहे.




श्री शंभूछत्रपती राज्याभिषेक सोहळा समिती फक्त १६ जानेवारीला रायगडावर संपन्न होणाऱ्या सोहळ्यापुरते मर्यादित नसून या माध्यमातून वर्षभर राज्यातील विविध भागात होणाऱ्या सामाजिक कार्यातही अग्रस्थानी आहे, यामाध्यमातून होणारे रक्तदान शिबीर, शैक्षणिक साहित्य वाटप, पूरपरिस्थित अन्नधान्याचे वाटप, वृक्षलागवड आणि संवर्धन हि सगळी सामाजिक कामे वाखाणण्याजोगी आहेत.

जलाभिषेकांचे मानकरी

१)श्री.किरण जीत सिंग हुतात्मा सरदार भगत सिंग यांचे पुतणे

२)श्री.ॲड.भाई सुभाष भगवानराव पाटील क्रांतीसिंह नाना पाटील यांचे नातू

३)श्री. सत्यशिल कमलाकर राजगुरू हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांचे नातू

४)श्री. सज्ञनराव शामराव पाटील स्वातंत्र्य सैनिक गोवा मुक्ती संग्राम १९५५

५)श्री. गौरव किरण नायकवडी क्रांतिवीर डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी यांचे नातू

६)श्री. दिग्विजय सर्जेराव जेधे स्वातंत्र्यसैनिक देशभक्त केशवराव जिथे यांचे पणतू

७)श्री.संजीव जावळे सशस्त्र क्रांतिकारक सार्वजनिक गणेशोत्सवाचे आद्य संस्थापक श्रीमंत भाऊसाहेब रंगारी उर्फ भाऊ लक्ष्मण जावळे यांचे पणतू

# सायबर जनजागृती कार्यक्रमाचे स्वा.सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

आजच्या युगात मोबाईलचा वापर आवश्यक तसेच प्रत्येकजण सोशल मीडियाचा वापर करतो यामध्ये आपली फसवणूक होऊ शकते याबाबतीत सायबर जनजागृती व्हावी या उद्देशाने माननीय पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब, पोलीस निरीक्षक गात साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बीड पोलीस दलाच्या वतीने स्वा.सावरकर माध्यमिक विद्यालय सायबर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी प्रमुख मा.पोलीस हेड कॉन्स्टेबल पंचम वडमारे साहेब यांनी मार्गदर्शन करताना विविध प्रकारचे होणारे फसवणुकीचे प्रकार यामध्ये आर्थिक बाबतीत घडतात यासंबंधी माहिती दिली व प्रत्येकाने काळजीपूर्वक मोबाईलचा वापर करावा विविध प्स वापर सजगपणे करावा असे आवाहन त्यांनी केले तसेच पोलिस निरीक्षक मा.

संतोष घोडके साहेब यांनी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी व प्रत्येकाने मोबाईलचा वापर काळजीपूर्वक करावा अशा आवाहन केले यावेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती संतोष घोडके साहेब,पंचम वडमारे साहेब,पोलीस आमलदार अजय जाधव,अमोल दरेकर,कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्राचार्य विठ्ठल दत्तात्रय काळे, विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब साळवे,प्रा.दीपक देशमुख यांची उपस्थिती होती.अध्यक्ष समारोप प्रा.विठ्ठल काळे यांनी केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बाळासाहेब साळवे यांनी केले व आभार प्रदर्शन दीपक देशमुख यांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थी प्राध्यापक व इतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विद्यापीठस्तरीय अन्वेषणमध्ये दयानंदचे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० जानेवारी -** डी. वाय.पाटील,मुंबई येथे घेतल्या जाणाऱ्या वेस्ट झोन अन्वेषण-२०२४-२५ संशोधन स्पर्धेत सहभाग नोंदवण्याकरिता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत योग्य प्रकल्पाची निवड करण्यासाठी विद्यापीठस्तरीय संशोधन महोत्सव अन्वेषण-२०२५ स्पर्धेचे आयोजन दि.०७ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आलेले होते.या स्पर्धेत दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सात संघांनी सहभाग नोंदवला होता.स्पर्धेत सहभाग नोंदविण्याकरिता १. एग्रीकल्चर, २.बेसिक सायन्स, ३.इंजिनियरिंग,४. हेल्थ सायन्स, ५.सोशल सायन्स,६. इंटर्डिसीप्लिनरी या कॅटेगिरींचा समावेश होता.

दयानंद विज्ञान महाविद्यालयातील बी.एस्सी.बी.टी.द्वितीय वर्षातील अंबर जानवी जालिंदर या विद्यार्थिनीची एग्रीकल्चर या कॅटेगिरीमधून विद्यापीठस्तरावर निवड झाली आहे. तसेच बीसीएस द्वितीय वर्षातील अनुराग अनिलकुमारजी दायमा आणि श्यामकुमार भाऊसाहेब दीक्षित या विद्यार्थ्यांचा सोशल सायन्स हुमानिटी कॉमर्स अँड लॉ या कॅटेगिरीमधून विद्यापीठस्तरावर निवड झाली आहे.विद्यापीठ स्तरावर ५६ संघांचा विविध महाविद्यालयातून प्रवेश नोंदविला गेला होता.५६ संघांमधून दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या दोन संघाचे प्रकल्प विद्यापीठ स्तरावर निवडले गेले. त्यांच्या या यशाबद्दल विशाल लाहोटी व अजिंक्य सोनवणे यांच्या शुभ हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ. संध्या वाडीकर,डॉ.वैशाली पाटील,प्रा. अनिलकुमार माळी,प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनीही त्यांचे कौतुक केले.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## मनोज जरांगे, अंजली दमानिया यांच्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० जानेवारी -** शहरातील शिवाजीनगर पोलिस ठाण्यासमोर ओबीसी समाजाच्या वतीने गुरुवारी ठिय्या आंदोलन करण्यात आले.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे. मात्र या प्रकरणावरून काही मंडळी वंजारी समाजाविषयी चुकीचे भाष्य करीत आहेत. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात देण्यात आलेल्या तक्रारीवरून मनोज जरांगे-पाटील व अंजली दमानिया यांच्याविरुद्ध गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा तपास पोलिस करीत आहेत.

## मणिपुरात शांतता प्रस्थापित होण्यासाठी शांतीयात्रा काढणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० जानेवारी -** मणिपूरमधील संघर्ष थांबवून शांतता प्रस्थापित व्हावी तसेच तरुणांच्या हातातील शस्त्र जाऊन पुस्तक यावे यासह अन्य गंभीर समस्या सुटाव्यात म्हणून महात्मा गांधीजींची प्रेरणा घेऊन १५ जानेवारीपासून आपण मणिपूरमध्ये शांती यात्रा काढणार असल्याची माहिती ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा प्रगतशील शेतकरी विनायकराव पाटील कवठेकर यांनी पत्रपरिषदेत दिली.

यावेळी विनायकराव पाटील कवठेकर म्हणाले, गेल्या १९ महिन्यांच्या कालावधीत आपण मणिपूरमधील दंगलग्रस्त आदिवासी भागास चारदा भेट देऊन मदत केली. तेथील वास्तव फार भयावह व चिंताजनक आहे. दहा हजार मुले शाळेविना आहेत. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक भविष्य अंधारात सापडले आहे. गेल्या १९ महिन्यांमध्ये हजारो नागरिक रिलिफ कॅम्पमध्ये राहतात. त्यांचे खूप हाल होत आहेत. या नागरिकांना मायेचे घर मिळावे, मणिपूरमध्ये अखंडता आणि शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून म्यानमार देशाच्या सीमेपासून १५ जानेवारीपासून शांतीयात्रा काढणार आहे. या यात्रेदरम्यान, तेथील तरुण, कुटुंबीयांची भेट घेणार आहे. मानवतेच्या भावनेतून ही शांतीयात्रा काढणार असल्याचे विनायकराव पाटील कवठेकर यांनी सांगितले.

## दर्जेदार शिक्षण राष्ट्र विकासाची गुरुकिल्ली : प्रा. मनोहर कबाडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० जानेवारी -** दर्जेदार शिक्षण हा सर्वांचा अधिकार असून यातूनच राष्ट्राचा विकास होतो असे प्रतिपादन प्राध्यापक मनोहर कबाडे यांनी केले ते येथील महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील व्यक्तिमत्व विकास व स्पर्धा मार्गदर्शन केंद्र तर्फे आयोजित विशेष कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी समन्वयक प्राध्यापक विश्वनाथ स्वामी हे होते तर विचार मंचावर प्रा.रवींद्र सुरवसे ,डॉ. अश्विनी रोडे ,प्रा.शैलेश कानडे उपस्थित होते. प्रा. कबाडे पुढे म्हणाले की, केवळ माहिती मिळवणे म्हणजे शिक्षण नसून ज्ञान संपादन करणे, आपले विचार योग्य पध्दतीने इतरांना सांगणे, इतरांचे म्हणणे समजून घेणे म्हणजे खरे शिक्षण आहे. वाचन, लेखन भाषण या कौशल्याबरोबरच श्रवण कौशल्य विकसित केले पाहिजे. चांगले विचार श्रवण केल्याने उत्तम चारीत्र्य घडते. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषणात्मक संश्लेषणात्मक गुण विकसित होतो, विद्यार्थ्यांचा बौद्धिक,मानसिक, सामाजिक विकास होतो. यश संपादनासाठी विद्यार्थ्यांनी काळ, काम ,वेग याचे गणित आपल्या आयुष्यात आखणे महत्त्वपूर्ण आहे असेही ते म्हणाले .

## स्मार्टकार्ड नोंदणीसाठी पालिकेने दिली २० जानेवारी पर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० जानेवारी -** लातूर शहर महानगरपालिका, लातूर च्या वतीने महिलांसाठी मोफत प्रवास बस योजना हातूर शहर बसमध्ये सध्या चालू आहे. शहर बस प्रवास करणा-या महिलांचा प्रवास सुखकर व्हावा व त्यांना अधिकाअधिक सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने लातूर शहर महानरपालिका, मार्फत महिला शहर बस पास (स्मार्ट कार्ड) योजना चालू करण्यात आली आहे. तरी सदर योजनेचा लाभ घेणेसाठी महानगरपालिका हद्दीमधील राहणा-या महिलांनी आपल्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत व सोबत फॉर्म भरून देण्याचे आवाहन पालिकेने केले आहे.

# सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही

### सहकार मंत्री पाटील यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० जानेवारी -** शिक्षणाने मनुष्य ज्ञानी, विचारी, प्रगल्भ होतो. सर्वच क्षेत्रात तो नावलौकीक संपादित करू शकतो. त्यामुळे मानवी जीवनात सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ पुणेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी बाबासाहेब पाटील बोलत होते. हे शैक्षणिक संमेलन लातूर येथे लोकनेते विलासराव देशमुख नगरीत पार पडत आहे. यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी शालेय शिक्षण मंत्री वसंत पुरके, आमदार विक्रम काळे, संमेलनाध्यक्ष बाबुराव जाधव, कार्याध्यक्ष हनुमंत शेषेराव साखरे, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब आवारी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून संमेलनाचे उदघाटन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते संमेलनाच्या अनुषंगाने काढण्यात आलेल्या ज्ञानतीर्थ स्मरणिकेचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. संयोजकांच्या वतीने प्रारंभी सर्व प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनाच्या आयोजनाचा बहुमान शैक्षणिक पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लातूरला दिल्याबद्दल, लातूरचा सुपुत्र या नात्याने आपण संयोजकांचे आभार मानतो, असे सांगितले. परिवर्तन हा निसर्गाचा, प्रकृतीचा नियम आहे, असे म्हटले जाते. आज शिक्षण क्षेत्रातही अमुलाग्र परिवर्तन होताना दिसत आहे. यामागे शिक्षण क्षेत्रात अनमोल योगदान देणाऱ्या शिक्षकवृंदांचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळेच आजमितीस जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांतूनही अनेक डॉक्टर, इंजिनिअर, यशस्वी उद्योगजक घडताना दिसत आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या माध्यमातूनही अतिशय चांगले शिक्षण देण्यात येत आहे, ही बाब अत्यंत महत्वाची आहे. यापुढील काळातही विद्यार्थी मोठ्या संख्येने जिल्हा परिषद शाळांकडे वळले पाहिजेत असे ते यावेळी म्हणाले. संमेलन यशस्विकरण्यासाठी प्रकाश देशमुख, शिवराज म्हेत्रे, कालिदास शेळके, उपाध्यक्ष रमेश मदरसे, सचिन साबणे, उमेश पाटील, श्रीमती जयश्री ढवळे , मार्गदर्शक दिलीप धुमाळ, धनराज चिद्रे , सुवर्णा जाधव, दत्तात्रय पारवे ,अनिल कारभारी, रामेश्वर कदम, बालाजी मुंडे, जयश्री पाटील आदी परिश्रम घेत आहेत.

## महात्मा बसवेश्वर चौकातील पुतळ्याची संरक्षक भिंत ढासळली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० जानेवारी -** शहरातील महात्मा बसवेश्वर



चौकातील महात्मा बसवेश्वर पुतळ्याच्या संरक्षक भिंतीची दुरावस्था झाली असून संरक्षक भिंत कोसळली आहे. याकडे महापालिका प्रशासन अक्षम्य दुर्लक्ष करीत आहे. यावर तत्काळ कार्यवाही न केल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा बसवंतप्पा भरडे यांनी दिला आहे.

शहरातील महात्मा बसवेश्वर चौकातील महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्याची दुरावस्था झाली असून याकडे महापालिका प्रशासन डोळेझाक करीत आहे. या पुतळ्याभोवताली असलेली संरक्षक भिंत अनेक ठिकाणी ढासळली आहे. निम्म्यापेक्षा अधिक भिंतीची पडझड झाली आहे. वारंवार अशी पडझड होत असताना थातूरमातूर दुरूस्तीचे नाटक महापालिकेकडून केले जाते. ही संरक्षक भिंत पूर्णपणे नव्याने बांधण्यात यावी. पुतळा परिसरात स्वच्छता करावी. आतील भागात सुशोभीकरण करावे, या सर्व बाबींवर तत्काळ कार्यवाही न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

## रोटरीच्या चित्रकला स्पर्धेचे बक्षिस वितरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० जानेवारी -** रोटरी क्लब ऑफ मिडटाऊनच्या वतीने घेण्यात आलेल्या भव्य चित्रकला स्पर्धाचे बक्षीस वितरण डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आयोजित कार्यक्रमात संपन्न झाले.



या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणुन चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य अविनाश सातपुते, जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी एस.व्ही. क्षिरसागर,माजी प्रांतपाल डॉ. हरिप्रसाद सोमानी हे उपस्थित होते.

डिसेंबर महिन्यात झालेल्या या स्पर्धेत शहर व जिल्ह्यातील १५० शाळांनी सहभाग नोंदवला होता. साडेतीन हजार विद्यार्थ्यांनी स्पर्धेत चित्रे रेखाटली.यातील विजेत्यांना प्रायोजक कुणाल सायकल वर्ल्ड यांच्या मार्फत एकूण १२ सायकली बक्षीस म्हणून दिल्या गेल्या.त्यात पहिली ते दहावीच्या वर्गासाठी प्रत्येकी एक व मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी दोन सायकल देण्यात आल्या. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षण हेच जीवनात अंतिम नाही,ते गरजेचे तर आहेच पण ५९ कलापैकी एखादी कला करा असे प्रतिपादन माजी पंतप्रधान डॉ.हरिप्रसाद सोमाणी अध्यक्षीय समारोप करताना केले. चित्रकलेमध्ये पुढे जाऊन करिअरच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यावसायिक संधी याबद्दल प्राचार्य अविनाश सातपुते यांनी मार्गदर्शन केले.एस.व्ही. क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांमध्ये क्रमांकासाठी स्पर्धा न घेता त्यांच्या कौशल्याचे मूल्यमापन करून त्यामध्ये सुधारणा कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी,पालक कलाशिक्षक व विविध शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित राहिल्याबद्दल प्रोजेक्ट चेअरमन रमेश चिल्ले यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सचिन मालु यांनी केले. क्लबचे अध्यक्ष चेतन पंढरीकर, सचिव गिरीश पेन्सलवार, श्रद्धानंद आपशेट्टी, जगदीश कुलकर्णी, अमोल दाडगे ,सतीश कडेल,पवन मालपाणी,कलश मुंदडा,अनुप देवणीकर,श्रवण बियाणी,मनोज सुर्यवंशी, किशोर दाताळ,पवन मालपाणी,प्रशांत भाटगावे, ओमप्रकाश झुरुळे,योगेश काळे, गोविंद कुंचमवार, मोतीलाल वर्मा आदी उपस्थित होते.

## पोलिसांच्या क्रीडा स्पर्धेत लातूर, नांदेडचा दबदबा

### उपमहानिरीक्षक उमाप यांच्या हस्ते बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० जानेवारी -** येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या नांदेड परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेचा मंगळवारी सायंकाळी समारोप झाला. या क्रीडा स्पर्धेत पुरुष गटाचे सर्वसाधारण विजेतेपद लातूरला तर महिलांचे सर्वसाधारण विजेतेपद नांदेड संघाने पटकाविले. या स्पर्धेत लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील पोलीस संघांनी सहभाग घेतला होता.




या क्रीडा स्पर्धांमध्ये अनेक सामने अटीतटीचे झाले. मंगळवारी स्पर्धेच्या अंतिम दिवशी विजेत्या संघास उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. यावेळी लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, हिंगोलीचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, नांदेडचे पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार, परभणीचे पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी तसेच प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्राचे विजय मगर यांची उपस्थिती होती.

या स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या पोलीस खेळाडूंना ठाणे येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेत सहभागी होता येणार आहे.

पोलीस दलात काम करताना बौध्दीक तत्परतेसह शारीरिक कसरत, तंदुरूस्ती असणे गरजेचे आहे. त्यामुळेच पोलीस दलातील पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांनी गुन्हे तपास, कायदा व सुव्यस्था राखण्यासोबतच खेळाची आवड जपणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येकाने जमेल तसे वेगवेगळ्या खेळांत व स्पर्धेमध्ये भाग घेणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी परिक्षेत्रातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार उपस्थित होते.

## शिक्षण धर्मनिरपेक्ष असावे, असा महात्मा गांधीजीचा आग्रह होता


**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० जानेवारी -** शिक्षणसंस्था मधून कोणत्याही एका विशिष्ट धर्माचे शिक्षण न देता विद्यार्थ्यांना नैतिक मूल्यांचे शिक्षण द्यावे, नीती शिक्षणाशिवाय समाजामध्ये विवेकशील, संवेदनशील आणि जबाबदार तरुण पिढी घडणार नाही. नीती शिक्षणातून आपली सुटका नाही, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. यामुळे शिक्षण हे धर्मनिरपेक्ष असावे, असा राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा आग्रह होता, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ नागोराव कुंभार यांनी केले.

ते सर परशुरामभाऊ महाविद्यालय, महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद आणि इंडियन कौन्सिल ऑफ फिलॉसॉफिकल रिसर्च, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेच्या ४०व्या राष्ट्रीय अधिवेशनामध्ये संमेलनाध्यक्ष म्हणून महात्मा गांधीजींची शिक्षणविषयक संकल्पना या विषयावर बोलत होते.

पुढे ते म्हणाले की, गांधीजींच्या मते शिक्षण म्हणजे केवळ शब्दाचे ज्ञान नव्हे. शिक्षणाचे मुख्य प्रयोजन व्यक्तीच्या चारित्र्याची जडणघडण करणे हे आहे. शिक्षणातून व्यक्तीला तिच्या कर्तव्याचे ज्ञान झाले पाहिजे, तिला स्वतःच्या इंद्रियावर नियंत्रण ठेवता आले पाहिजे, तिच्यामध्ये इतरांची सेवा करण्याची आणि त्यागाची वृत्ती विकसित झाली पाहिजे. खरे शिक्षण व्यक्तीने स्वतःचे मन, विचार आणि आचार शुद्ध व स्वच्छ ठेवण्यामध्ये असते. शिक्षणातून व्यक्ती निर्भय बनली पाहिजे असे ते यावेळी म्हणाले. कार्यक्रमास अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

## सात कलमी कृती कार्यक्रमाचा सर्वसामान्य नागरिक केंद्रबिदू : जिल्हाधिकारी ठाकूर



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० जानेवारी -** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर होण्यासाठी अर्थात ईज ऑफ लिव्हिंगसाठी सात कलमी कृती कार्यक्रमाची घोषणा केली आहे. सर्वसामान्य नागरिक केंद्रबिदू असलेल्या या कृती कार्यक्रमाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी नियोजनबद्ध आणि समन्वयाने काम करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. पुढील शंभर दिवसात राबवायच्या सात कलमी कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित सर्व शासकीय विभागांच्या जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत त्या बोलत होत्या.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, सार्वजानिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्यासह सर्व तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीला उपस्थित होते.

राज्यात प्रशासनाला येत्या शंभर दिवसांत प्राधान्याने करावयाची कामे याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांवर काय कार्यवाही केली, याबाबत १५ एप्रिल २०२५ रोजी आढावा घेतला जाणार आहे. आपल्या कार्यालयाचे संकेतस्थळ सुसज्ज करणे, माहिती अधिकार कायद्यानुसार मागितली जाईल अशी सर्व माहिती अगोदरच संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे, संकेतस्थळ सायबरदृष्ट्या सुरक्षित करणे, शासकीय कार्यालयांची स्वच्छता करणे, अनावश्यक कागदपत्रे काढून टाकणे, खराब आणि वापरात नसलेली वाहने निर्लेखित करणे, शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह स्वच्छ राहतील, हे सुनिश्चित करणे आदी बाबींचा या सात कलमी कृती कार्यक्रमात समावेश असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

## ३५ हजार मालमत्ताधारकांनी केला ५० कोटींचा कर भरणा

### शास्ती माफी योजनेचा घेतला नागरिकांनी लाभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० जानेवारी -** महापालिकेच्या कर संकलन विभागाने दमदार कामगिरी करीत जानेवारीपर्यंत ५० कोटी रुपयांचे कर संकलन केले आहे. एकूण ३५ हजार मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला आहे. १० जानेवारी हा ७५ टक्के शास्ती माफी योजनेचा शेवटचा दिवस होता.

महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागांनी २०२४-२५ या वर्षाच्या सुरूवातीपासूनच १०० टक्के मालमत्ता कर वसुलीचे लक्ष्य ठेऊन मालमत्ताधारकांसाठी विविध उपक्रम राबविण्याचे निर्देश आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी प्रशासनास दिले होते. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारची शास्ती माफीची योजना लागू करण्यात आली होती. तसेच लोकअदालतमध्येही प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यानंतरही काही थकबाकीदार कर भरत नसल्याचे निदर्शास आल्याने जप्ती, नळ खंडन आदी कार्यवाही करण्यात आली होती. परंतु, पुन्हा शास्ती माफी योजना लागू करावी, अशी मागणी करण्यात आल्याने या वर्षातील शेवटची संधी म्हणून २५ डिसेंबर ते १० जानेवारी २०२५ पर्यंत शास्तीमध्ये ७५ टक्के माफी देण्याचा निर्णय आयुक्त मनोहरे यांनी जाहीर केला. या आर्थिक वर्षात ३५ हजार मालमत्ताधारकांकडून ५० कोटींचे कर संकलन हे अवघ्या काही महिन्यात कर संकलन विभागातील वसुली लिपिक, पर्यवेक्षक, कर अधीक्षक, क्षेत्रीय अधिकारी यांनी केले आहे. शुक्रवार हा ७५ टक्के शास्ती माफीचा शेवटचा दिवस होता. यानंतर पुन्हा माफी लागू होणार नाही व धडक जप्ती मोहीम सुरू होणार आहे. उर्वरित थकबाकीदार मालमत्ताधारकांनी कर भरून जप्तीसारखी कटू कार्यवाही टाळावी, असे आवाहन उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

